
चंगळ खुसखुशीत फराळाची
नाजूक रांगोळी दारी काढली
आकाशकंदील अन आतिषबाजी
लक्ष लक्ष दिव्यांची दिवाळी आली...
कलाविष्कार
ई~दिवाळी अंक
ऑक्टोबर २०११

संपादकाच्या लेखणीतून ...

कलाविष्कार, ई दिवाळी अंक, नोव्हेंबर-२०१० या पहिल्या आवृत्तीला मिळालेल्या प्रतिसादानंतर यंदा कलाविष्कारचा दुसरा ई-दिवाळी अंक प्रकाशित होतोय. गतवर्षीच्या अंकाप्रमाणेच या अंकातदेखील भरगच्च साहित्याचा खजिना आहे आणि समस्त वाचक मायबापांपर्यंत तो पोहोचावा ही माफक अपेक्षा. यंदाच्या अंकासाठी टंकलेखनास सहाय्य केलेल्या सौ. शारदा परेलकर, श्री. विनायक फडके आणि करुणा सोरटे यांचे विशेष आभार. कलाविष्कारला साहित्य मिळावे यासाठी ज्यांनी मोलाचा हातभार लावला आणि कलाविष्कारचे जाहिर आवाहन सबंधित साहित्यिकांपर्यंत पोहोचवले अशा तमाम मंडळींच्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपुर्वक आभार.

कलाविष्कारला साहित्यरुपी बहरवणारे साहित्यिकच हेच त्याचे खरे शिलेदार आहेत. कलाविष्कर ई दिवाळी अंक त्याच्या अमूल्य योगदानाशिवाय आपल्यासमोर कदाचित आलाच नसता. कलाविष्कार परिपूर्ण करणाऱ्या या शिलेदारांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. गतवर्षीप्रमाणेच यंदाचा अंकही पी डी एफ या प्रकारातच काढला आहे. यंदा कोणत्याही Background image चा वापर करणे प्रकर्षाने टाळले, म्हणूनच १५० पानांपेक्षा जास्त हा अंक ४ mb ही पेक्षाही कमी साइज मध्ये उपलब्ध झाला.

आपण वाचत असलेल्या या संपादकीय लिखाणा आणि शुभेच्छा पत्रकानंतर पुढील पानावर प्रार्थना आहे.पुढील पान क्रमांक २ आणि ३ वर अनुक्रमणिका आहे. आपल्याला हव्या असलेल्या साहित्यावर थेट जाण्यासाठी संबंधित साहित्याच्या शीर्षकावर क्लिक करा, पुन्हा अनुक्रमणिकेकडे परतण्यासाठी पान क्रमांक १ पासून पुढे प्रत्येक पानाच्या शेवटी(footer ला) मध्यभागी अनुक्रमणिका असे लिहिले आहे त्यावर क्लिक केले की अनुक्रमणकिचे पान दिसेल. तसेच प्रत्येक साहित्याच्या सुरुवातीला संबंधित साहित्यिकाचे नाव दिलेले आहे, ज्यावर क्लिक करुन आपण आपली प्रतिक्रिया थेट त्यांच्यापर्यंत पोहोचवू शकता.

अंक आपल्याला कसा वाटला ? आपल्या आपल्या बहुमुल्य सुचना, अभिप्राय, मतं आणि प्रतिक्रिया आम्हाला kalaavishkaar@gmail.com या पत्त्यावर ई मेल द्वारे कळवा किंवा फेसबुकवरील कलाविष्कार ई दिवाळी अंकाच्या पेजवर शेअर करा.

आपल्याला आणि आपल्याला समस्त परिवाराला कलाविष्कार, ई-दिवाळी अंकातर्फे हार्दिक शुभेच्छा. ही दिवाळी आपल्याला आरोग्यदायी, सुखी, समृद्धी, भरभराटीची जावो हीच सदिच्छा! फटाके वाजवताना स्वतःची आणि इतरांची काळजी घ्या. लहान मुलांची आणि ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घ्या. दिवाळी आनंदाने साजरी करा स्वतःही या दिवाळीचा आनंद घ्या आणि इतरांच्या आनंदाचाही भाग बना !


पणतीने उजळू दे तुमचे घर

विचारांनी प्रकाशमय होवो तुमचे जीवन

दिवाळीच्या या आनंदी क्षणाला

कलाविष्कारचे आपल्याला हेच अभिष्टचिंतन

-------------------------------------------------------------------संपादन, प्रकाशन,मांडणी, मुखपृष्ठ, मलपृष्ठ आणि कलाविष्कार लोगो



प्रथमेश सुरेश शिरसाट

www.lekhaankan.co.cc





- © या ई दिवाळी अंकातील सर्व साहित्यांचे आणि कलाकुसरींचे सर्व हक्क संबंधित साहित्यिकांच्या स्वाधीन
- कलाविष्कार या ई दिवाळी अंकात मांडलेल्या विचारांशी आणि मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही
- © मुखपृष्ठ, मलपृष्ठ आणि कलविष्कार लोगोचे सर्व अधिकार प्रकाशकांच्या स्वाधीन

# प्रार्थना

निर्मला कलंबी

तूच करी उद्धार देवी तूच करी उद्धार ||धृ||

मातेसमं मजं माया देशी

रात्रं दिन मज छाया देसी

आपत्काली धैर्य ही देशी

सदैव होशी उदार देवी, सदैव होशी उदार ||१||

कृपावती तू करूणासागर

भव्य दिव्य तेजाचे आगर

तरून जाऊ हा भवसागर

तूच खरी आधार देवी, तूच खरी आधार ||२||

नानाविध तुझी रुपे असती

शांतादुर्गा, लक्ष्मी, सरस्वती,

महाकाली, शारदा, पार्वती

करते जयजयकार देवी, करते जयजयकार ||३||

तूच देसी मजं सदैव शक्ती

मनोमनी मी करते भक्ती

मुळीच मजला नसे आसक्ती

होई साक्षात्कार देवी, होई साक्षात्कार ||४||

# अनुक्रमणिका

➢ **गद्य विभाग**


- कृष्ण परमात्मा — संकेत भंडारी
- नोट पाचशेची बनावटवाली — कांचन कराई
- जहाँ मेरी कश्ती डुबी — धुंद रवी
- गुळाचा खडा — रामचंद्र सोनू जाधव
- हे सारे आपल्या भल्यासाठी ...! — अरूण देशपांडे
- नातं — देवेंद्र चुरी
- असेल रंभा घायळकर...पण नाद नाय करायचा — धुंद रवी
- आयुष्य — राहूल आराध्ये आणि प्रथमेश सुरेश शिरसाट
- मोठ्यांचा आदर — रामचंद्र सोनू जाधव
- चला राजे आपल्याला महाराष्ट्र दाखवतो... — अतूल शिवाजी देखणे
- असा साजरा होतो आपल्याकडे प्रत्येक सण — पूजा गद्रे आणि प्रथमेश सुरेश शिरसाट
- सखी — सुपर्णा कुलकर्णी
- नतमस्तक — महेंद्र कुलकर्णी
- सेकण्ड इनिंग्स... — कुलस्य जोशी
- वास्तुवैरी — रामचंद्र सोनू जाधव
- नागालँड- प्राचीन ते अर्वाचीन — मकरंद केतकर
- महती वर्डप्रेसची — श्रेया रत्नपारखी
- न्यायमुर्ती कै. रामचंद्र शंकर वझे
  आद्य मराठी ऩाडीग्रंथ शोधक — विंग कमांडर (नि) शशिकांत ओक
- फेसबुक – मी, आम्ही,तू ,तुम्ही, ते, त्या, ती, सर्वांसाठी — विनायक फडके
- पुस्तक परीक्षण - नाडी ग्रंथ भविष्य {आवृत्ती ५वी} — विंग कमांडर (नि) शशिकांत ओक
- गडदुमा — रामचंद्र सोनू जाधव
- अभूतप्रेम — तनवीर सिद्दिकी
- गाण्यांचा खजिना आणि १ जीबीचा खेळ — प्रथमेश सुरेश शिरसाट
- चप्पलपुराण — सुनिल पाटकर
- मैत्रीचे नाते जपून बघा — विशाखा मशानकर
- भेट — रवींद्र दंतकाळे

- **कलादालन**
- ग्राफीटी
- छायाचित्र
- कलाकुसर
- **पद्य विभाग**
- आरसा ______ रुपेश पेवेकर
- नशा (गझल) ______ अतुल उमाळे
- चुकलंच सालं ______ आल्हाद महाबळ
- आयुष्याचे गणित ______ सौ. प्रियांका पाटणकर
- ए आई ...तू बरोबर केलं ______ तनवीर सिद्दिकी
- कुणीतरी आहे तो ______ पूनम पिंगळे
- एकटी ______ पूनम पिंगळे
- एक कळी ______ पूनम पिंगळे
- मुल्यशिक्षण ______ शुभांगी विठ्ठल गोरे
- सोनेरी क्षण !! तुझे आलिंगन ______ अतुल उमाळे
- शब्द ______ जान्हवी सारंग
- शस्त्र ______ जान्हवी सारंग
- डोक्यात जाणाऱ्या चारोळ्या (Read @ your own risk) ______ प्रथमेश सुरेश शिरसाट
- दिवाळी ______ प्रमोद दलाल
- चारोळ्या ______ सुनिल खांडेकर, शुभांगी गोरे आणि प्रथमेश सुरेश शिरसाट
- पुन्हा नियतीने तिथेच आणले ______ प्रथमेश सुरेश शिरसाट
- **चवीने खाणार त्याला ....**
  - उकडीचे मोदक ______ सारिका भंडारे
  - साबुदाणा वडा ______ सारिका भंडारे
  - करंजी ______ सारिका भंडारे
  - चकली ______ सारिका भंडारे
  - तांदळाची उकड ______ पूजा गद्रे
  - गुलाबी चिरोटे ______ पूजा गद्रे
  - अनारसे ______ पूजा गद्रे
  - गोयकार पाककृती : मडगणं (चण्याच्या डाळीची खीर) ______ श्रीमती. स्नेहल सुरेश शिरसाट
  - गोयकार पाककृती: सुजी (गुळवणी) ______ श्रीमती. स्नेहल सुरेश शिरसाट
  - गोयकार पाककृती: कालइले फोव्ह (कालवलेले पोहे) ______ श्रीमती. स्नेहल सुरेश शिरसाट
  - बटाट्याचे सॉंग ______ श्रीमती. स्नेहल सुरेश शिरसाट
  - भरली वांगी ______ सुष्मा कदम
  - गोयकार पाककृती : कच्च्या केळयाची किसमूर (कोशिंबीर) ______ प्रथमेश सुरेश शिरसाट

# कृष्ण परमात्मा

संकेत भंडारी

कृष्ण, म्हणजे काळा, ह्या कृष्णाला सावळा पण म्हटलं गेलंय, मदन-मोहन गोपाळ, हा गुराखी, गायींना सांभाळणारा, गोविंद आहे , तर कधी रास लीला करणारा मुरलीधर आहे.

कृष्णावर बरेच जणं डाग लावतात की, कृष्ण चरित्रहीन होता, रासलीला करायचा, रात्र रात्र जागवून स्त्रियांसोबत खेळायचा, चाळे करायचा , पण कृष्ण गोकुळात वयाच्या १३व्या वर्ष पर्यंतच वास्तव्यास होता, त्या नंतर कंस वध केल्यावर तो मथुरेतच राहिला. मग द्वारका वसवली एवढ्या बालवयात अशी गोष्ट शक्यच नाही. तो त्याच्या निर्भेळ मैत्रीच्या शाश्वत प्रेमाचा अविष्कार होता. पुन्हा १६००० स्त्रियांशी त्याचा विवाह झाल्याचे सांगितलं गेलंय आणि प्रत्येक स्त्रीपासून कृष्णाला अपत्य झाले असे सांगितले गेले आहे, जे पूर्णपणे चुकीचे आहे. कृष्णाचा विवाह १६००० स्त्रियांशी झाले हे निर्विवाद सत्य आहे. नरकासुर नावाच्या बलिष्ट, महाक्रूर, दुराचारी शासकाने "प्रगजोतीष्पूर" म्हणजे आत्ताचे आसाम येथे त्याचे राज्य स्थापून देशातील विविध प्रांतांमधून १६००० स्त्रिया जमवल्या होत्या, त्यांचा पुरेपूर उपभोग ह्या नरकासुराने केला होता, ह्या १६००० स्त्रियांचे आयुष्य ज्याने नरका समान केले त्याला नरकासुर म्हणणेच योग्य आहे. अशा अधर्म्यास कृष्णाने त्याच्या सत्यभामा नावाच्या पत्नी च्या सहाय्याने मारले. नरकासुर मेल्यावर त्या स्त्रियांना जरी त्यांच्या घरी पाठवले गेले असते, तरी त्यांना त्याकाळी मानाचे स्थान मिळाले नसते, त्या स्त्रियांची उपेक्षाच झाली असती, हे कृष्णाने नक्कीच जाणले असेल, ह्या स्त्रियांनी कृष्णाला नक्कीच विनंती केली असणार की, आता आमचे भविष्य तुम्हीच सावरा. म्हणूनच ह्या स्त्रियांचे सामुहिकरित्या पाणिग्रहण करून त्यांना मानाचे स्थान कृष्णाने दिले, ही त्या काळच्या प्रथेनुसार क्रांतीच म्हणायला हवी.

द्वापारयुगात कृष्णाचं कार्य खरंच खूप महत्वपूर्ण आहे, त्याला लोकांनी परमात्मा मानले, गोपांनी देव मानले, सखा मानले. पण खरंच कृष्ण त्यांच्यासाठी देवच होता, कृष्ण अती बलवान होता, वयाच्या आठव्या वर्षी त्याने गोवर्धन पर्वत उचलून त्याच्या अचाट सामर्थ्याची जाणीव इतरांना करून दिली. सोबत च्या गुराख्यांना आणि गोपांना गोवर्धन पर्वतास काठी लावायची संधी दिली पण, ज्यावेळी ह्या गोपांना वाटू लागतं की कृष्णाने फक्त करंगळी लावली आहे, आपल्या काठ्यांनी पर्वत उभा आहे, त्यावेळी तोच कृष्ण गोपांचे अंतरंग जाणून गोवर्धन पर्वतास जरासा धक्का देतो आणि गोपांच्या लक्षात येते की आपण नावाला काठ्या लावल्यात सगळा भार तर त्यानेच उचलला आहे. आपल्या दैनंदिन जीवनात पण परमात्मा आपले ओझे उचलत असतो, पण ते आपल्याला दिसत कधीच नसत. कृष्ण practically जगणारा होता एवढं नक्की, कारण त्याने इंद्राच्या पूजेस विरोध करून ज्या पर्वतामूळे गोकुळातील निसर्गचक्र सुरळीत चालू आहे, त्या पर्वताची पूजा करण्यास सांगितले, इथे कृष्ण स्वतः परमात्मा असूनही स्वतःची पूजा करण्यास सांगत नाहीये.

कृष्णाचं कार्य खरच खूप मोठं आहे, practically जगणारा कृष्ण,कधी युद्ध सोडून जातो, तर भीमाच्या सहाय्याने जरासंधास मारतो, कंसाला प्रत्यक्ष मारतो, कित्येक आसुरी शक्तींना यमसदनी धाडतो. कृष्णात काहीतरी अलौकिक नक्कीच आहे, कारण तोच कुब्जा नावाच्या कंसाच्या दासीला रूपवान करतो, "रुप्जा" बनवतो, हे कृष्णाचे योगसामर्थ्य असू शकते.महाभारतात तर कृष्णानेच ठीक ठिकाणी पांडवांचे रक्षण केलंय. तो अभिमन्यूच्या पत्नीच्या गर्भाचे रक्षण ब्राम्हस्त्रापासून करतो. अश्वत्थामाला अमर करतो पण त्याने केलेलेल्या दुष्कृत्यांची शिक्षा प्रलयापर्यंत भोगण्यासाठी, आजही डोक्यावर कुजलेली जखम घेऊन अश्वत्थामाला बऱ्याच जणांनी बघितलंय. पण आताच्या so called विचारवंतांना कृष्ण हा राजाच होता, ही सगळी त्याच्या बद्दल मिथकेच आहेत, असा हट्ट धरतात, असो.

कृष्णाने गीतेचा उपदेश अर्जुनाला केला, आज गीतेमूळे कित्येक लोकांचे आयुष सुधारलेले आहे, ते मात्र ह्या नास्तिकांना दिसतच नाही.कृष्णा ला द्वारकाधीश असेही म्हंटले जाते, कृष्णाने आयुष्य भर युद्धच केलं, अगदी जन्मल्यापासूनच आणि शेवटी द्वारिका नागरी पाण्यात बुडवली,कारण कृष्णाचे जन्मल्या पासून, "विनाशाय च दुष्कृताम" हे ब्रीद राहिलेय, विश्वकर्मा कडून बांधून घेतलेली द्वारीका नागरी, स्वतः बुडवून घेतली, स्वतः च्या देशाच्या (द्वारीका ) रक्षणासाठी हा "काल-यवन " नावाच्या दुराचारी , महाबली, आणि स्वतःला परमात्मा म्हणवून घेवून इतरांकडून जबरदस्तीने स्वतःची पूजा करवून घेणारा राजा, त्याच्याशी युद्ध करत असताना युद्ध सोडून मुचकुंद नामक तपस्व्याची निद्रा भंग करवून काल-यवनास मारून टाकतो, आणि शेवटी त्याचे परब्रह्मरूप त्या तपस्व्यास दाखवतो, पण काही काळानंतर हाच कृष्ण त्याच्या देशाला म्हणजे द्वारीकेला पाण्यात बुडवतो, कारण त्याच्या लक्षात येते की आता आपली प्रजा धर्मपरायण राहिलेली नाही, आपला यादव वंश माजलाय, सत्तेने मुजोर झालाय आणि अशा माजलेल्या यादवांनी पवित्र ऋषी मुनींची चेष्टा सुरु केली, त्याचेच परिणाम म्हणून यादव वंश नाहीसा झाला, भक्तांचा शब्द हा सावळा कधीच खाली पडू देत नाही, आणि स्वतः साधारण व्याधाच्या बाणातून मृत्यू स्वीकारतो.

ठिकठिकाणी कृष्णाने कपट केले आहे, धर्म रक्षणासाठी,कृष्णाने कपटाने जरासंधास मारले, कपट करूनच रुक्मिणी'स पळवून आणले, कपट करूनच सुभद्रेचा विवाह अर्जुनाशी लावला, कपट करूनच लाक्षा-गृहातून पांडवांची सुटका केली. महाभारताच्या युद्धात तर कृष्णाने कपटाची मालिकाच लावली, शिखंडीद्वारे भीष्माचा वध, द्रोणाच्यार्यांचा वध, अश्वत्थामा मेल्याची बातमी युधिष्ठीराकडून देऊन, नरोवा कुंजरोवा च्या वेळी शंख-नाद करून शिष्टाई केली, त्यावेळेस कृष्ण एकटा गेला होता. दुर्योधनाची पत्नी, त्याचे १६ भाऊ ह्यांनी सीमेवर येऊन कृष्णाचे स्वागत केले, पण कृष्णाने स्पष्ट पणे नकार दिलं, की तुम्ही माझे आप्त नाही. जरी असलात तरी तुमचे माझ्यावर अजिबात प्रेम नाही,हा माझा ठाम विश्वास आहे, उलट रात्रीच्या भोजनाचा नकार कळवून, कृष्ण विदुराच्या घरी गेला. उरलेल्या कण्या, केळयाची साले खाल्ली, तृप्त झाला, समाधानी झाला. एखाद्या राज्यात दूत म्हणून जायचं, राज्याच्या पाहुणचाराला नकार देऊन, राज्याचा अपमान करून, विरोधी असणाऱ्या

विदुराकडे जाऊन जेवायचं, एवढं सामर्थ्य एकट्या कृष्ण कडेच होतं.

कृष्णाच्या जन्माचे बिंग :

कृष्णाच्या जन्माचे मूळ कारण कंस वध आहे, असे ग्रंथ सांगतात, कंस फक्त दुराचारी राजा होता, असे मानले तर कित्येक दुराचारी राजे होऊन गेले त्या प्रत्येकांसाठीच भगवंताला यावे लागले असते,म्हणजे कंसाने नक्कीच काहीतरी जास्त भयंकर केलेलं असणार.काही ठिकाणी असं पण सांगितलं जातं की कंसाची पापे वाढवण्यासाठी त्याच्या हातून देवकीच्या ६ गर्भांची हत्या घडवून आणली गेली, किती चुकीच्या प्रकारे सांगितलं जातं.

"कंस हा अंधाराचा उपासक होता, जरासंध हा कंसाचा सासरा, आणि कंस हा जरासंधाचा लाडका जावई, आणि शिष्य होता. जरासंध हा मृत जन्माला आलेला दोन्ही मातांच्या पोटी अर्धा-अर्धा, मेलेलं मूल, पाहून राजाने ते जंगलात फेकून दिले, आणि लहान बाळाचा वास घेत घेत, जरा नावाची राक्षशी ह्या मृत तुकड्यांपाशी आली.तिने हे तुकडे जवळ आणताच ते बालक सांधले गेले, आणि जिवंत झाले, जरेने सांधलेला म्हणून जरासंध असे नाव राजाने त्या बालकास दिले,

शुक्राचार्यांच्या आसुरी विद्येची उपासना या दोघांनी केली आणि वेगवेगळी सामर्थ्ये प्राप्त केलेली , म्हणजे हे मनुष्य रुपातले दैत्य असुर होते, पण कंसाने या विद्येत केलेल्या एका चुकीमुळे एका मानवी किशोर वय प्राप्त न झालेल्या बालकाकडून त्याचा मृत्यू सुनिश्चित होता. जरासंधाला कुठल्याही नवजात शिशूचा वध त्या बालकाच्या जन्म होण्याआधीच्या पहिल्या सूर्योदय होण्याच्या आत करण्याचे सामर्थ्य प्राप्त झालेले.मग तो बालक दैवी अवतार असला तरीही त्याला मारणे सहज शक्य होते, म्हणून कृष्ण जन्माला आला तेव्हा देवीने महामाया बनून सगळया मथुरा नागरीला गाढ झोपेत ठेवले, पण ह्या आवरणाचा प्रभाव सत्य-धर्मी वसुदेव आणि देवकी वर अजिबात झाला नाही, कृष्णाला गोकुळात नेले गेले आणि देवीने नंद कन्येचे रूप घेवून मथुरेत येणं केल," (संदर्भ डॉक्टर .अनिरुद्ध जोशी लिखित मातृ-वात्सल्यविंदानम ). कंसाने आपला डाव फसला हे लक्षात आल्यामुळे कर म्हणून अधिक प्रमाणात दुध-दही-लोणी गोकुळातून आणि इतर गावांमधून वसूल करायला सुरवात केली, त्यामुळे नाईलाजाने कृष्णाने आपल्या सवंगडयांसोबत मिळून लोण्याची-दही-दुधाची लयलूट केली. कारण १३ व्या वर्षी त्याला कंस वध करायचा होता, आणि त्यासाठी शरीर अतिशय बलदंड असणे गरजेचे होते, हे मूळ कारण आहे. म्हणूनच हा माखनचोर हि पदवी मिरवून घेतो.

प्राचीन महाभारत हे आत्ता आपल्या समोर जसं आहे तसं तंतोतंत नव्हता हे मी पण मान्य करतो कारण पिढ्यानपिढ्या संस्कृती सरकत असताना त्याच्यात बदल घडत असतातच, आपल्याकडून एखादी माहिती दुसरीकडे जाताना कित्येकवेळा शब्दांचा गोंधळ होतो, काहीवेळा पाठ्य-भेद केला जातो किंवा सांगणाऱ्याच्या संकुचित वृत्ती मूळे काही शब्द /कथा सत्य वगळले जाते, किंवा काही गोष्टी बाहेरून टाकल्या जातात.

मानलं तर देव आहे नाहीतर दगडच, कुठल्याही गोष्टीवर श्रद्धा ठेवल्याशिवाय यश येत नाही, शिकताना विद्यार्थ्यांनी शिक्षकांवर श्रद्धा ठेवली नाही तर त्यांना शिकवलेल्या गोष्टी नीट समजवून पण

समजणार नाहीत, डॉक्टरवर पेशंट ने श्रद्धा ठेवली, त्याच्या गोळयांवर श्रद्धा ठेवली तरच त्या गोळया प्रभावी पणे कार्य करून दाखवतील. तसेच कृष्णावर श्रद्धा ठेवल्याशिवाय त्याचे कार्य , त्याचे सामर्थ्य ह्याची प्रचीती येणार नाही. साईबाबा नेहमी म्हणत श्रद्धा ठेवा सबुरी ठेवा आणि गोड फळे खा, उगाचच तर्क-कुतर्क करत बसून गोड फळांपासून दूर राहू नका.

“सर्व -धर्मन परित्याज्य मामेकं शरणं व्रज अहं त्वं सर्व पापेभ्यो मोक्षायीस्यामी मा सुचः " हा श्लोक गीतेचे सार आहे, इथे कृष्णा अर्जुनाला म्हणतोय , सगळे गुणधर्म सोडून तू मला(कृष्णाला) शरण ये. मी तुमच्या पापांचा भार वाहतोय, आणि मोक्षापर्यंत पण मीच नेणार.

मदन-मोहन गोपाळ, गायींच्या सहवासात राहणारा, दुधा-लोण्याच्या आस्वाद घेणारा. हा सावळा खट्याळ आहे पण त्याही पेक्षा किती तरी प्रेमळ आहे, गायी चरत असताना, इतर गुराख्यांनी आणलेले अन्न, अगदी उष्टे अन्न उष्ट्या हातांनी खातो, हा नंद राजा चा मुलगा गुरख्यांच्या राजा चा मुलगा, तरीही याच्यासोबत जो प्रेमाने वागतो, त्याच्यासाठी हा धावत जातो, स्वतः च्या हातांनी लोणी, दही इतरांना भरवतो आणि ह्या गुरख्यांच्या न कळत आसुरी शक्तीचा नायनाट करतो, कृष्ण त्याला न मानणाऱ्यावरही प्रेम करतो, त्याच्यावरही दया करतो, मग मानणाऱ्यांवर तर किती प्रेम करत असणार.

अशा कृष्णाच्या निश्चल स्वरूपास समजण्यासाठी त्याच्यावर श्रद्धा आणि भक्ती असायला हवी, कुष्णा च्या चरित्रावर चिखल, फक्त दुराचारी , अंधारमार्गी, कंस, शिशुपाल, आणि जरासंध यांचे छुपे समर्थक करू शकतात आणि तेच ह्या चुकीच्या गोष्टी पसरवत असतात,भगवंत अश्या लोकांना सद्बुद्धी देवून त्याच्या चरणांशी खेचो हीच प्रार्थना.

# ✵ नोट पाचशेची बनावटवाली

कांचन कराई

टॅक्सीतून प्रवास करताना मला निरनिराळे विलक्षण अनुभव आलेच पाहिजेत, असं कुठे लिहून ठेवलं आहे की काय हे मला शोधून काढलं पाहिजे. आधी तो टॅक्सीत शिरलेल्या उंदराचा किस्सा, मग चालत्या टॅक्सीत झोपलेला ड्रायव्हर, आता कहर म्हणजे टॅक्सी.... हे जे मी सारखं टॅक्सी, टॅक्सी म्हणतेय, ते याच्यापुढे तुम्ही कॅब, कॅब असं वाचायचं आहे. कारण आता आलेला अनुभव हा आपल्य नेहमीच्या "काळी-पिवळी"त आलेला नाही. ती आहे मेरू! आणि मेरूला कुणी टॅक्सी म्हणतं का? असो. विषयांतर होतंय. हां! तर अनुभव काही फार मोठा नाही पण फार मोठी शिकवण देऊन गेला.

रात्री दहाच्या नंतर ठाणे ते दादर प्रवास करायचा झाला,तर ट्रेन, बस, रिक्षा या सर्वांपेक्षा मेरू कॅब सुरक्षित वाटते मला. पैसे थोडे जास्त खर्च होतात, चेकनाक्यावर टोल भरावा लागतो अशी सर्व आर्थिक तोटा दाखवणारी कारणं मला मान्य असली, तरी रात्री दहानंतर एकटीने सुरक्षित प्रवास करायचा असेल, तर निदान मला तरी मेरूने येणं पटतं.

झालं काय की अशीच एका रात्री मी मेरू कॅबने प्रवास करत होते. सोबत पैसे असले तरी सुट्या पैशांची (चिल्लर, नोटा) वानवा होती. रात्री टॅक्सी ड्रायव्हरकडे सुद्धा पुरेसे सुटे पैसे असतीलच याची शाश्वती नसते. त्यामुळे सोयिस्कर उपाय म्हणजे, टोल नाक्यावर टोल भरताना पाचशेची नोट द्यायची म्हणजे आपोआप चारशे सत्तर रूपये सुटे मिळतात. टोल नाक्यावर गाडी थांबल्यावर मी पाचशेची नोट ड्रायव्हरला दिली. त्याने नोटेवरचा नंबर दोन-दोनदा वाचून पाठ केला आणि मगच ती नोट टोलवाल्या माणसाला दिली. सुटे पैसे मिळाल्यावर आम्ही पुढे निघालो. टॅक्सी ड्रायव्हरने नोटेचा नंबर पाठ का केला असावा, हा विचार काही मनातून जाईना. कदाचित ड्रायव्हरला सुद्धा या गोष्टीची जाणीव झाली असावी. त्यामुळे त्याने स्वत:च सांगायला सुरूवात केली.

"मागे एकदा मी अशीच पाचशेची नोट या टोल नाक्यावर दिली होती. पण मला सुटे पैसे तर मिळाले नाहीतच. उलट त्या टोलवाल्याने मला पाचशेची नोट परत दिली आणि म्हणाला, की मी दिलेली नोट बनावट होती. मला नाईलाजाने नोट परत घ्यावी लागली आणि सुटे पैसे द्यावे लागले. अर्थात, मी ती पाचशेची नोट दुसरीकडे चालवलीसुद्धा!"

"बरं मग?" कारण मला काही उलगडा झाला नव्हता. कदाचित झोपेचा परिणाम असू शकेल.

टॅक्सी ड्रायव्हरने पुढे सांगायला सुरूवात केली, "मी त्या टोलवाल्याला पाचशेची नोट देताना काही नंबर पाहून दिली नव्हती. त्याने नोट बनावट आहे असं सांगून मला जी नोट परत दिली, ती मीच दिलेली नोट कशावरून असेल? कदाचित त्याच्याकडची बनावट नोट चालवण्यासाठीदेखील त्याने मला मूर्ख बनवलं असेल. पण तेव्हापासून मी पन्नास, शंभर अशी कुठलीही नोट देताना नंबर पाहून मगच देतो. म्हणजे त्याने नोट परत द्यायची ठरवली, तरी मी कुठल्या नंबरची नोट दिली, हे मला माहित असतं."

आहे की नाही! म्हणजे याच्यापुढे सुटे पैसे मिळण्याचं अधिकृत ठिकाण म्हणून टोल नाक्यावर नोटा देताना आधी नंबर पाहून मगच द्यायला हव्यात. एक विचार उगाच मनात आला - आतापर्यंत अशाप्रकरे कितीतरी बनावट नोटा तिकडून सगळीकडे पसरल्या असतील, नाही?

# जहाँ मेरी कश्ती डुबी...

धुंद रवी

मुझे तो अपनोंने लुटा... ग़ैरोंमे कहाँ दम था....

जहाँ मेरी कश्ती डुबी... वहाँ पानी बहोत कम था...

शारिरिक वेदनांपेक्षा, मानासिक यातनांनी भरलेला हा जख्मी शेर लिहणारा घायाळ शायर माझ्यासारखाच कुणीतरी खुप आतुन दुखावलेला जीव असणार.... आपल्याच जवळच्या माणसांकडुन दुखावलेला.... आपल्याच हक्काच्या गोष्टींकडुन फसवला गेलेला...! म्हणुन हि पहिली ओळ की 'मुझे तो अपनोंने लुटा... ग़ैरोंमे कहाँ दम था....'

.... आणि शेवटच्या ओळीचा अर्थ शेवटीच सांगेन.....

काय सांगू तुम्हाला की काय दुःख असतं आपल्याच कुणाकडुन तरी फसवलं जाण्याचं.... मी पण फसवलो गेलोय... माझ्यातल्याच त्या माझ्या तीन सखींनी, माझ्या आयुष्याच्या जोडीदारींनी, माझ्या हक्काच्या तीन गोष्टींनी मला लहानपणापासुन दगा दिलाय... त्या माझ्या गद्दार सहचारीणी म्हणजे..... माझी सहनशक्ती, स्मरणशक्ती आणि पचनशक्ती....

माझ्या सहनशक्तीचं तर विचारुच नका.... परवाचीच गोष्ट घ्या.... रात्रीची वेळ.. एकदम गर्द अंधार... येतोय का जातोय हेही कळत नव्हतं.... सुनसान रस्ता... आणि एक सुंऽऽऽऽदर ऊजळ मुलगी... मी पहातच राहिलो... भानावर आलो आणि पाहिलं तर समोर चार मवाली गुंड... त्यांनी तिला घेरलं आणि छेड काढायला लागले.... तुम्हाला सांगतो कुठे अन्याय पाहिला, कुठे अत्याचार पाहिला, कुठे जबरदस्ती पाहिली, कुठे गुन्हेगारी पाहिली की मला सहनच होत नाही... त्या गुंडांचा तिला होणारा त्रास पाहिला आणि सहनच झालं नाही मला... मी....... मी.......

.........मी टिव्ही बंद केला आणि पांघरुण डोक्यावरुन घेऊन देवाचं नाव पुटपुटत झोपुन गेलो..... हे असं टिव्ही बंद करणं सोप्पं असतं, पण रोजच्या जीवनात सुद्धा माझी सहनशक्ती मला दगा देत आलीये... मी खुप हळवा माणुस आहे हो.... नाही सहन होत मला काही.... भिती, राग, भांडणंच काय पण मला खुप प्रेम, माया असा भावनांचा अतिरेक पण सहन होत नाही. एकदा (म्हणजे आयुष्यात एकदाच) मी आणि बायको पिक्चरला गेलो होतो.... सहनच झाला नाही हो तो पिक्चर.... या तुम्हालाही एक झलक दाखवतो...

पहिल्याच सीनमध्ये हिरो दवाखान्यात एका बेडवर झोपलाय... (त्यावर मृत्युशय्या असं लिहलंय)... त्याच्या शेजारी अतिशय करुण डोळे आणि अतिशय लाल-भडक ओठ असलेली... नाही नाही, हिरॉईन नाही, त्याची आई... कधी एकदा आटपतय अशा चेह-यानी बसलीये... आणि तो म्हणतोय की "आई मी चाललो... एक शेवटची इच्छा.... मला लहानपणी भात भरवायचीस अगदी तस्सच्यातस्स भरव.... मग ती पर्समधुन एक डबा काढते आणि त्याला लाळेरं बांधुन... चमचा त्याच्या घशात कोंबुन.... तस्सच्यातस्स भरवायला सुरवात करते... तो फुर्रर्रर्रर्र करुन घास तिच्या तोंडावर उडवतो... ती त्याला थोबाडीत मारते... तो ताटली तिच्या तोंडावर फेकतो.. ती त्याच्या डोक्यात चमचा मारुन त्याला बेसीनमधे आपटते. आणि....

.....आणि मला पुढचं दिसेनाच... ते प्रेम मला सहनच होईना.. मी हमसुन हमसुन ओक्साबोक्शी रडायला लागलो. पुढच्या मागच्या एकेक रांगा रिकाम्या झाल्या आणि कुणी ओळखु नये म्हणुन बायको तोंडावर रुमाल बांधुन बसली. तेंव्हा पासुन मी पिक्चरचा आणि बायकोनी माझा धसकाच घेतलाय....

.......मला चेष्टा सहन होत नाही, अपमान सहन होत नाही, मनाला लागलेली रुखरुख, झालेली चूक, इतकंच काय साधी भुक मला सहन होत नाही हो..... एकदा भुक लागली की काही सुचत नाही, कळत नाही... हात थरथरायला लागतात... कामाच्या महत्वाच्या कागदांचा बोळा केला जातो... त्या बोळयाऐवजी तिथं भजी दिसायला लागतात...

एकदा तर भुकेनी इतका कडकडलो की घरी येऊन बायकोला "झालं असेल तसं जेवायला वाढ" म्हणालो. तिनी धुतलेले तांदुळ ताटात वाढुन दिले. खर तर तिची विनोदबुद्धी धुतल्या तांदळाइतकी स्वच्छ आहे पण मला तो विनोद सहनच झाला नाही. आत्मक्लेषात मी मुठीमुठीनी ते तांदुळ खायला सुरवात केली. त्या तांदळाची पावडर तर पचली नाहीच, पण तीन दातही गेले आणि वर लहान मुलीनी "बाबानी खडे का खाल्लेत ?" असं विचारलं. तेव्हापासुन भात खाणं तर दुरंच... तो पहाणंही मला सहन होत नाही.....

त्यात तो पिक्चरमधला भात भरवण्याचा सीन आठवला तर तो भाताचा घास तोंडातल्या तोंडातच फिरत राहतो.....आणि शेवटी आत जायच्या ऐवजी बाहेर येतो.... 'भात खायचा नाही' हे मी हातावर गोंदवुनच घेतलय....

.....गोंदवुन घेतलय कारण कधी कधी विसरायला होतं हो...

माझ्या स्मरणशक्तीचं तर विचारुच नका.... बालपणी शाळेमध्ये असताना रात्री जागुन पाठ केलेल्या कविता दुसऱ्या दिवशी आठवायच्या नाहीत. एकदा चुकुन, पंगेश माडगांवकरांच्या 'टप टप पडती अंगावरती प्राजक्ताची फुले' ह्यातलं फुले विसरल्यामुळे 'टप टप पडती अंगावरती प्राजक्ताची मुले' असं म्हणालो होतो. हसुन हसुन सगळीच मुल अंगावर पडली.

एकदा कविता पाठ झाली होती पण वेळ विसरलो आणि शाळेतच खेळत बसलो. मास्तर पेटलेच. त्यांनी बोलावलं आणि अत्यंत खोचट आवाजात म्हणाले की, "अस्मादिकांचं शुभनाम कळेल काय ?" मला ह्याचा अर्थ कळला नाही, पण वाटलं की ते कविता म्हणायला सांगताहेत. स्मरणशक्तीनी दगा दिला आणि चक्क कविता आठवली.... आणि पाठ केल्याप्रमाणे मी ती जोशात म्हंटलीसुद्धा....

"आम्ही कोण म्हणुनी काय पुसशी ? आम्ही असु लाडके... देवाचे दिधले जग तये आम्हांस खेळावया "

मास्तरांच्या अंगाची लाही लाही झाली. ते पट्टीचे शिक्षक असल्यामुळे पट्टीमार्फत ती लाही लाही त्यांनी माझ्या हातावर वाजवायला सुरवात केली. मला मारता मारता म्हणाले, "देणाऱ्याने देत जावे.. घेणाऱ्याने घेत जावे"... माझा पुन्हा गैरसमज झाला आणि मी ती कविता पुर्ण केली.... "घेणाऱ्याने एक दिवस, देणाऱ्याचे हात ही घ्यावे"... मास्तरांनी खरंच त्यांचे हात दिले.......... पण माझ्या गालावर.... !

शिवाजी महाराजांचे गुरु दादोजी कोंडदेव हे कित्येकदा पाठ करुनही मी पेपरमध्ये दादा कोंडकेच लिहुन यायचो. स्मरणशक्तीवर विसंबुन एकदा दादा कोंडके असं उत्तर पाठ केलं तर उत्तर लक्षात राहिलं आणि मी पुन्हा दादा कोंडकेच लिहुन आलो. मग मास्तरांनी दिवसभर मला दादा कोंडकेच्या आवाजात पाढे म्हणायला लावले. सन-सनावळ तर लक्षातच राहायचे नाही हो... कित्येकदा तर आईबापाच्या जन्माआधी पोराला जन्माला घातलंय मी....

भूमितीच्या पेपरात समद्वीभूज त्रिकोण, समभूज चौकोन आणि समांतरभूज काहितरी, म्हणुन जे काही काढायचो ते चुकुन आठवलं तरी माझा चेहरा वक्राकार होतो आणि अंगावर सरळ रेषेत काटे उभे राहतात. (पण आमच्या मास्तरांना सुद्धा ते आकार नीट माहित नसावेत. कारण माझ्या प्रत्येक आकृतीसमोर ते मोठ्ठं वर्तुळच काढायचे.) अर्थात बहुतेक सगळयाच शिक्षकांना माझ्या पेपरावर हि गोळया गोळयांची रांगोळी काढायची संधी मिळायची.

पुढे मोठा झालो आणि स्मरणशक्तीच्या घोळांची संख्याही मोठी झाली. पायजम्यावर ऑफीसला जाणे... दुधासाठी म्हणुन पातेलं घेऊन जाणे आणि त्यात वर्तमानपत्र आणणे... वगैरे वगैरे... एकदा बायकोनी वजन पहायचा काटा आणायला सांगीतलेला.... विसरलो आणि तो चुकुन तिच्या वाढदिवसाला घेऊन आलो. (त्या दिवशी तिचा वाढदिवस होता हे शप्पथ माझ्या लक्षात नव्हतं हो....) एकदा.... एकदा... काय बरं सांगणार होतो मी..... असो. ह्या साठी एक वेगळा लेख लिहीन... आजचा विषय वेगळा आहे. उगाच त्या चविष्ट बासुंदीत ह्या अवांतर चारोळ्या जास्त नको.....

आणि पचनशक्ती... माझ्या पचनशक्तीचं तर विचारुच नका.... (खरंच विचारु नका.... ह्याचे किस्से अगदी गळयापर्यंत भरलेले आहेत. उगाच घशात बोट घालाल आणि त्या भडाभडा बाहेर आलेल्या चारोळयात बासुंदीच दिसायची नाही.....)

तुम्हाला सांगतो.... मला दुःख दगा झाल्याचं नाहीये... त्याची सवयच आहे मला... मला दुःख आहे ते माझ्या त्रि-शक्तींनी एकाच वेळेला दगा दिल्याचं... खरं तर मागच्या विदारक अनुभवानंतर पुण्यात पुन्हा कुणाचं 'गि-हाईक व्हायचं नाही' हे ठरवलं होतं.... पण पुन्हा एकदा स्मरणशक्तीनी दगा दिला, सगळं सगळं विसरलो.... सहनशक्तीनी दगा दिला.... एकदा ऑफिसवरुन येता येता मला भुक असह्य झाली आणि कोणत्या हॉटेलमध्ये शिरतोय हे न पाहताच मी हॉटेलमध्ये शिरलो..... ते एक साऊथ इंडीयन थाळीचं हॉटेल होतं.

मी आत गेलो तर मालक स्वच्छ पांढ-या लुंगीत कपाळावर पांढ-या गंधाचे उभे आडवे पट्टे ओढुन दोन्ही हात कोप-यापासुन जोडुन माझ्या स्वागताला उभे होते. मी पण त्यांच्याकडे पाहुन तसाच नमस्कार केला. तर त्यांनी 'घालीन लोटांगण'सारख्या टाळया वाजवत स्वतःभोवती एक प्रदक्षिणा घातली. मी पण.

त्यांनी कानाला हात लावला. मी पण.

त्यांनी नाकाला हात लावला. मी पण.

मग त्यांनी २-४ थोबाडीत मारुन घेतल्या. मी पण.

ते अचानक दोन पायांवर खालीच बसले. मी नाही.

मी तिथल्याच एका रिकाम्या टेबलावर हळुच बसुन घेतलं.... ते एकदम ओरडुन म्हणाले " एन्डेश्वरा इनीक्य इन्न ओत्तरी आळकारं एन्डे हॉटेली वेरानपाडआ ".

मी जाम घाबरलो. बहुतेक मी खाली न बसल्यामुळे ते चिडलेत असं वाटुन मी घाबरुन खाली बसलो. पण ते माझ्यासाठी नव्हतंच. त्यांची पुजा चालली होती. ती थोड्या वेळानी संपली आणि ते दरवाज्यातल्या फोटोंकडे वळाले.

बराच वेळ माझ्याकडे कुणीच फिरकलं नाही आणि ती प्रतिक्षा मला सहन होईना. तो अपमान मला सहन होईना. मग भुक सहन होईना. त्याचा परिणाम माझ्या स्मरणशक्तीवर व्हायला लागला. मी गजनीतल्या आमीरसारखं किंवा कुठल्याही पिक्चरमधल्या सुनीलशेट्टीसारखं बधिर चेह-यानी इकडे तिकडे पाहायला लागलो. माझा भांबावलेला चेहरा पाहुन माझ्या दिशेनी एक काळी आकृती केळयाचं पान घेऊन येताना दिसली.

मी जरा चरकलोच. कारण मागं एकदा एका साऊथ इंडीयन मठात जेवणाचा योग आला होता. तिथं सगळं एकदम कडक सोवळयातलं होतं. त्यांनी माझे कपडे काढुन घेतले आणि मला नेसायला एक छोटा सोवळयाचा पंचा दिला होता. आख्खा वेळ त्या मिनी स्कर्टमध्ये मी लाजुन चुर झालो होतो. जे समोर ताटात पडेल ते धपाधपा गिळुन बाहेर पडलो आणि ते न पचल्याने भडाभडा....... असो.

...........हा माणुस तर तो पंचासदृश्य-मिनीस्कर्टही नाही तर केळयाची पान घेऊन येत होता. ना ना शंका-कुशंकांनी माझं मन भरुन गेलं. इथे खुप कडक सोवळं तर नसेल ना? ह्या शंकेनी तर छातीच धडधडायला लागली. भुकेनं तडफडुन मेलो तरी चालेल पण केळयाची पानं नेसुन जेवायला बसायचं नाही, असं ठरवुन टाकलं. माझ्या अब्रुची लक्तरं मी त्याला अशी केळीच्या झाडावर टांगु देणार नव्हतो.....

त्यानी ती केळयाची पानं आणुन माझ्या टेबलवर आपटली आणि माझ्याकडे वरपासुन खाली बघत... केळीच्या पानांकडे कडे हात करत तो म्हणाला "इद एडतो.... नंग ळेन्दो तिन्नुम....?"

मी घाबरुन त्याचा अंदाज घ्यायला लागलो. तो 'इद एडतो' म्हणाला होता का 'इथं फाडतो'... मला आठवेना. मी कपडे घट्ट पकडुन बसलो. (आणि.... 'नंग ळेन्दो' म्हणजे काय.... शी... काहितरीच....) त्या साऊथ इंडीयन दुःशासनापासुन वाचण्यासाठी मी नॉर्थ ईंडीयन कृष्णाचा धावा करायला लागलो. एक पाय टेबलाबाहेर काढुन

पळुन जाण्याच्या पवित्र्यात असताना एक नजर दरवाज्यावर टाकली तर तिथं दुर्योधन हातात उदबत्ती घेउन डान्स करत होता आणि ती अभेद्य तटबंदी भेदुन जाणं शक्यच नव्हतं. पण देव धाऊन आला आणि मला स्पर्श न करताच तो दुःशासन निघुन गेला. मी पवित्रच राहिलो.

आता माझ्या स्मरणशक्तीनी दगा द्यायला सुरवात केली. दुःशासनानी जो काही प्रश्न विचारला होता त्याचं अर्थ काय आणि त्याचं उत्तर मी हो दिलंय का नाही... मला काहीच आठवेना. हेच काय मी कुठल्या भाषेत बोलू शकतो हे ही आठवेना.... मालकांची पुजा संपली आणि दरवाजा मोकळा झाला. आता मी पळु शकत होतो. पण मालक गोडसं हसले आणि म्हणाले... "वण्णक्कम. सावकास जेव्हा.. हव्हा तेवढा ख्हा. लिम्मीट नाय.. पन थालीत काय टाकु नका... ते आमच्या हाटेलचा एक नियम असतो... आमी कोनलाकाय वाया घालवुन देत नाय....भरपुर आनंद घ्या"

मला काय बरं वाटलं म्हणुन सांगु ! एक तर तो इसम पुणेकर मराठी नाही, साउथ इंडीयन आहे आणि मी साउथ इंडीयन नाही, पुणेकर मराठी आहे... हे मला समजलं होतं आणि दुसरं म्हणजे अनलिमिटेड थाळी !! मी बकासुरासारखी त्या गाडीभर अन्नाची आणि ते घेऊन येणा-या आण्णाची वाट बघायला लागलो.

ब-याच वेळानी तो दोन्ही हातात काहितरी पांढरं पांढरं मूठ भरुन घेऊन आला. मी लाजत म्हणालो, अरे उगाच कशाला रांगोळी वैगेरे... त्यानी ते केळयाच्या पानावर वाढलं. एवढं मीठ तर मी जन्मापासुन अगदी कालपर्यंत खाल्लं नसेल.... ते इतकं का वाढलं ते कळालं नाही.... मग तो गेला आणि सुमारे १६ वाट्या घेऊन आला. तिथं आठ टेबल्स होती. म्हणजे प्रत्येकी दोन दोन... पण तो इसम सगळया वाट्या माझ्याच टेबलवर ठेऊन गेला... आज त्यांचा भांडी घासायचा माणुस आला नसावा. थोड्या प्रयत्नांनी त्या वाटीत काय होतं हे सांगता आलं असतं.... असो....

"ये क्या है ?" - त्यानी माझ्या टेबलावर मांडलेल्या रुखवताकडे बघत मी विचारलं. "अर्रे.. आपीच तो बोला के स्पेशल साऊथेंडीयेन थाली" त्यानी माहिती वाढली. हे मी कधी बोललो होतो कुणास ठाऊक. पण मी एकदम खुष झालो. थाळी म्हणजे जास्त काही रिस्क नसते. थोडं फार इकडे तिकडे. हे नाही आवडलं तर ते. हि भाजी नाही आवडली तर ती. पोळी नाही आवडली तर पुरी. रस्सा नाही आवडला तर सुकी भाजी. भात आपण खात नाही पण त्याबदल्यात थाळीवाले एक्स्ट्रॉ पोळया देतातच की.... जेऊन माणुस तृप्त झालाच पाहिजे....

भुकेनी माझ्या पोटातुन गुरगुर आवाज यायला लागले. मला पण गुरगुरवांसं वाटायला लागलं. पण ते काम मालक करत होते. दरम्यानच्या काळात एक नविन कस्टंबर आलं आणि माझ्या समोरच्या टेबलवर बसलं. त्यानी बसल्या बसल्या ऑर्डर दिली आणि त्यालाही एक केळीच पान आणि १६ वाट्या मिळाल्या. म्हणजे माझ्या टेबलवरच्या वाट्या माझ्याच होत्या....

मी अर्जुनासारखी लढायच्या आधिच कच खाल्ली. पण माझा पराभूत चेहरा पाहुन भगवान श्रीकृष्ण त्या हॉटेल मालकांच्या रुपाने पुन्हा धाऊन आले. नाही... त्यांनी वाट्या कमी केल्या नाहीत, तर त्यांनी मला त्यांच्या नियमाची आठवण आणि युद्धाची जाणिव करुन दिली. "ते आमच्या हाटेलचा एक नियम असतो... आमी कोनलाकाय वाया घालवुन देत नाय....भरपुर आनंद घ्या"

मी श्रीकृष्णाला नमस्कार केला आणि माझ्याच पचनशक्तीला आवाहन केलं. १६ वाट्या म्हणजे सुमारे सहा ते आठ पोळया..... कमरेचा आव्वळ पट्टा थोडा सैल करुन मी आनंद घ्यायला तय्यार झालो !

तो गेलेला माणुस एक मोठ्ठी परात घेऊन आला. मी पुन्हा लाजलो कारण मगाशीच मी पहिलं कस्टंबर असल्यामुळे मालकांनी मला उदबत्तीनी ओवाळलं होतं. मला वाटलं की आता 'बोहोनी' म्हणुन परातीत माझे पाय धुतात की काय....

पण नाही हो..... त्यांनी त्यापेक्षा वाईट केलं होतं. माझ्यावर आकाशच कोसळलं होतं.... पेपर फुटला आणि सत्वपरीक्षेत मी नापास झालो होतो.... मग धरणी दुभंगली आणि मी आत गाडलो गेलो.... दुर्योधन आणि दुःशासनानी डाव साधला होता... भर सभेत मला.... .........................! त्या दुःशासनानी माझ्या वस्त्राला हात घातला असता तरी मला चाललं असतं पण त्यानी स्पेशल साऊथ इंडीयन थाळीवाल्या परातीला हात घातला आणि त्या परातीतला डोंगर माझ्या पानावर उलटा केला....

.................................भाताचा डोंगर.... !!

त्या १६ वाट्यापण नानाविध प्रकारच्या, रंगांच्या, प्रतीच्या, चवीच्या, आकारमानाच्या, वासाच्या, भासाच्या, त्रासाच्या द्रवांनी भरुन गेल्या.... समोरचा कस्टंबर तर त्या स्पेशल थाळीवर तुटुन पडला होता. त्या महाकाय डोंगराचे त्यानी १६ मोठ्ठे मोठ्ठे गोळे केले होते. प्रत्येक गोळयावर तो एक वाटी उलटी करायचा आणि तो ढीग तोंडाची गुहा उघडुन आत सोडुन द्यायचा.... धडाम...!

प्रत्येक घासाला होणारा मच्याक-मच्याक आवाज आणि दर तीन घासानी त्याचा 'आसमंत हदरवुन टाकणारा' ढेकर ह्यानी मला मळमळायला लागलं..... हॉटेलचा नियम तो तंतोतंत पाळत होता. तो आनंद घेत होता आणि तेही काहीही वाया न घालवत... अगदी त्या गुहेच्या दरवाज्यातुन निसटलेला एखादा रस्स्याचा ओघळही त्याच्या हनुवटीवरुन खाली कोसळला तरी त्याच्या मांडीपर्यंत पोहचायच्या आधिच तो झेलायचा आणि चाटुन टाकायचा....

माझ्या सहनशक्ती आणि स्मरणशक्तीनी तर साथ सोडलीच होती आणि आता मी फक्त पचनशक्तीच्या भरवशावर जिवंत राहु शकलो असतो. पण तो भाताचा डोंगर फोडुन मी चमच्यात २०-२२ शीतं घेतली आणि मनाचा हिय्या करुन तोंडाशी आणली की तो बकासुर अर्वाच्य ढेकर द्यायचा आणि माझा चेहरा, आवेश आणि चमचा गळुन पडायचा.... ह्या गतीनी मला तो भात संपवायला सात महिने तरी लागले असते.

काहितरी करणे अपरिहार्य होते. तेवढा भात खाणं तर शक्यच नव्हतं. तेवढा काय केवढाच भात खाणं शक्य नव्हतं. मी एक मध्यम आकाराचा गोळा केला, पानाबाहेर ठेऊन त्याला नमस्कार केला आणि मोठ्यांने म्हणालो की, "देवाला !!" हे पाहुन मालक प्रसन्न हसले आणि माझा एक घास खपला होता....मग काही गोळे मी ह्या

पुढील देवतात नमस्कार करुन वाटुन टाकले. एक देवीदेवता, एक वास्तुदेवता, एक नागदेवता, एक गृहदेवता, एक निसर्गदेवता, एक कामदेवता, एक दामदेवता, एक ग्रामदेवता, एक अग्नीदेवता, एक वायुदेवता, एक सुर्यदेवता, एक वरुणदेवता, एक तरूणदेवता, एक बालदेवता, एक कालदेवता, एक जलदेवता, एक फलदेवता, एक फुलदेवता, एक कुलदेवता, एक कुळदेवता, एक मुळदेवता, एक खोडदेवता..... दोन जोडदेवता .... एक..... (ह्या पुढे काही सुचेनाच हो.... मग शेवटचे चार... रमेश देवता, सीमा देवता, अजिंक्य देवता आणि कपिल देवता...... म्हणुन ती चित्रावत संपवली. पण ह्यात २८ गोळे संपले होते.)

.....तरी अजुन बराच भात राहिला होता. मी भाताची शीतं केळीच्या पानांच्या रेषा आहेत अशी सजवायला सुरवात केली. त्या हिरव्यागार केळीच्या पानावर ह्या पिवळया रेषा एकदम उठुन दिसत होत्या... (मग तुम्हाला काय वाटलं.... पांढरा होता भात ? छे.....!!) एकेक वाट्या गट्टागट घशात रिकाम्या करुन प्रत्येकाखाली एकेक छोटा गोळा सरकवला. त्या बकासुराचं लक्ष नाहीये असं वाटुन २ गोळे त्याच्या पानात सरकवले. त्यानी ते करताना पाहिलं म्हणुन अजुन २ सरकवले. इतकं केल्यानंतरही दोन ओंजळ भात राहिलाच होता आणि तो आनंद पोटातच ढकलावा लागणार होता. पण आधिच वाट्यावर वाट्या रिचवल्यानी तो 'आनंद पोटात माझ्या माईना रे माईना !'

भात आत जायला विरोध करत होता, मी जबरदस्ती करत होतो. आधि तोंडावर, मग गळयावर, मग छातीवर आणि नंतर पोटावर अश्या क्रमाने बुक्क्या मारल्या की जायचा खाली..... पण हळुहळु करत ट्रॅफिक जाम होतं गेलं आणि आतली शीतं बाहेर डोकवायला लागली. देवाची कृपा की भात संपला होता आणि मी युद्ध जिंकलो होतो.... मी युद्ध जिंकलो होतो.... मी युद्ध जिंकलो होतो.... पण इतक्यात तो दुःशासन पुन्हा एक परात घेऊन आला आणि शेवतचा वार करत म्हणाला, "राईस ?". त्यानी राईस म्हंटल्या बरोब्बर राईसची एक प्रचंड लाट पोटातुन वर उसळुन आली आणि..... "ब्ळोगळळळळोळोळोभडऑक्ळळळळ ड्ळळड्श्ळश्ळळ श्ळश्ळेळळेळ्व्व्ळ्व्ल्ळर्ळ्व्ल ळळळर्ळ्ळभ्ळक्भ्ळक्भ्ळक"

आता रिकाम्या पोटी मला बरं वाटत होतं. मग मला भगवान श्रीकृष्णांची गीता आठवली. "तुम क्या लाये थे, जो तुमने खो दिया? जो लिया यॅहिसे लिया, जो दिया यॅहिपे दिया.... क्यु व्यर्थ चिंता करते हो.... जीवन यही है...."

.....मी 'जीवन' शोधत मोरीकडे गेलो.

बकासुर तिसरा डोगर संपवुन शेवटच्या पठारावर आला होता. मी सरळ जाऊन मोरीत अंघोळीला बसलो. कसेबसे चार थेंब नळातुन बाहेर पडले आणि पाणी संपलं. सहनशक्ती, स्मरणशक्ती आणि पचनशक्ती.... आणि आता नशिबाचा दगा..... ! माझा त्या थाळीवर, त्या मालकांवर, त्या वाढप्यावर राग नाहीये... वो तो गैर थे !

राग नशीबावर....ते तर माझंच होतं ना ? पण माझ्याच नशिबाच्या फे-यात अडकुन मी पार लुटलो होतो.... दुर्दैवाच्या भोव-यात अडकुन मी पार बुडलो होतो. दुःख लुटण्याचं किंवा बुडण्याचं नव्हतं हो.... दुःख ह्याचंच की....

मुझे तो अपनोंने लुटा... ग़ैरोंमे कहाँ दम था....

जहाँ मेरी कश्ती डुबी...  वहाँ पानी बहोत कम था...

# गुळाचा खडा

रामचंद्र सोनू जाधव

माझे वडील जे आता हयात नाहीत, ते मुंबईत गिरणी कामगार होते. कोणातरी ओळखीच्या माणसाकडे किंवा एखाद्या नातेवाईकाकडे खानावळी म्हणून रहात. बाकी सर्व कुटुंबातील व्यक्ती म्हणजे माझी आई, आजी, आजोबा आणि इतर भावंडे गांवाकडेच राहात असू. वडील अधूनमधून रजा घेऊन गावाला येत असत. गावाला येतांना सोबत बरेच सामान घेऊन येत असत, त्यामुळे घरची सर्वजण खूष असत. आम्ही लहान मुले मात्र वडिलांच्या भेटीमुळे तेवढेसे खूष नसू, कारण आमचे वडील खूप रागीष्ट होते, त्यामुळे आमची आई, आजी वगैरे त्यांच्या नावाने सारखे सारखे घाबरवत असत. 'थांब तू ऐकत नाहीस ना, येउ दे तुझ्या बाबांना, तुला चांगला धडा शिकवायला लावते.' असे सारखे सारखे धमकावणे चालू असे, त्यामुळे वडिलांच्या विषयी एक प्रकारची भीती नेहमी मनात असे.त्यामुळेच वडील गावाला येणार असे समजले की आमच्या मनातल्या मनात परमेश्वराकडे प्रार्थना सुरु होत की देवा, आमच्या बाबांचे गावाला येणे रद्द होवो. गावाला आल्यावर ते आम्हा सर्व भावंडासाठी चांगले चांगले कपडे, खेळणी, फटाके इत्यादि वस्तू घेवून येत. त्या सर्व वस्तू तर आम्हाला हव्या होत्या पण ते मुंबईला लवकर परततील तर बरं, असेही मनातून वाटत असे. आमचे वडील आणि आजोबा यांना आम्ही समोरासमोर बसून कोणत्याही विषयावर बोलताना कधीच पाहिले नाही.

याउलट आमचे आजोबा अतिशय शांत, बुद्धिमान, उंच धिप्पाड शरीरयष्टी आणि आकर्षक व्यक्तिमत्व. कोणतीही गोष्ट ते आम्हाला शांतपणे सांगत. माझ्या आईप्रमाणे माझ्यावर अधिक संस्कार झाले ते माझ्या आजोबांचे. त्यांच्या शांत स्वभावामुळे व सर्वांना मदत करण्याच्या वृत्तीमुळे ते गावातील लोकांनादेखील आपलेसे करायचे. गावातील बाजारपेठ जवळच असल्यामुळे, दिवसातून एकतरी फेरी त्यांची बाजारात असे. एखादे दिवशी जर ते बाजारात दिसले नाहीत तर, गावातील कांही माणसे त्यांची विचारपूस करायला घरी येत. माझ्या आजोबांना त्याकाळीसुध्दा दारू किंवा अन्यप्रकारच्या नशेली पदार्थांचे व्यसन नव्हते. त्यांना वारंवार विडी ओढण्याची मात्र सवय होती. हे पाहून आमची आजी मात्र त्यांच्या विडी ओढण्याच्या सवयीवर कावायची.

आमच्या गावच्याच शाळेमध्ये माझे सातवीपर्यंतचे शिक्षण झाले. पुढील शिक्षणाची सोय गावात नव्हती आणि घरच्या परिस्थितीमुळे बाहेर लांब दुरवर जावून शिकणे परवडणारे नव्हते. परंतु हा प्रश्न माझ्याप्रमाणे गावातील इतर मुलांचाही असल्यामुळे, गावातील ग्रामस्थांनी सुरवातीला आठवीच्या वर्गासाठी आणि त्यानंतर अकरवीपर्यंतच्या वर्गासाठी सरकारी मान्यता मिळवली. गावातच पुढील शिक्षणाची सोय झाल्यामुळे आम्हाला खूप आनंद झाला. मलाही आठवीच्या वर्गामध्ये प्रवेश मिळाला. सुरुवातीला आमचा आठवीचा वर्ग एका इसमाचा गुरांचा गोठा साफ करून त्यात भरविण्यात आला. पुढे ग्रामस्थांनी श्रमदानाने हायस्कूलची भव्य इमारत बांधली. संपूर्ण गाव ही इमारत पूर्ण होण्यासाठी झटत होते आणि त्यामध्ये आमच्या आजोबांचेही योगदान फार मोलाचे होते. गावाने कोणाच्याही मदतीशिवाय स्वबळावर एक भव्य इमारत उभी केली व अकरावीपर्यंत मान्यता मिळवली ही गोष्ट १९५४ च्या सुमारास नक्कीच अभिमानास्पद होती. हायस्कूलकडे जाणारा रस्ता बाजारपेठेतून जात असल्यामुळे गांवकरी लोक जेंव्हा मुलांना शाळेत जाताना पहात तेव्हां तेव्हां गावकऱ्यांचा उर अभिमानाने भरून येई कारण आमची मुले आम्हीच उभ्या केलेल्या हायस्कूलमध्ये शिकत आहेत. बाजारातून जाणाऱ्या प्रत्येक मुलावर बहुतेक सर्व गावकऱ्यांचे बारीक लक्ष असे. एक दिवस मी असाच शाळेतून

घरी जात असताना गावातील एक प्रतिष्ठीत व्यक्ती बापू साटम यांनी मला आपल्या दुकानातून हाक मारली. त्यांचेही गावाच्या प्रगतीमध्ये फार मोठे स्थान होते. बापू साटम हे अतिशय कडक शिस्तीचे गावातील फार मोठे प्रस्थ होते. त्यांनी मला हांक मारून बोलावले तेव्हां मी फारच घाबरून गेलो आणि आठवू लागलो की काय मी कुणाचे केले, म्हणून यांनी मला हांक मारली. त्यांची शिस्त सर्वांनाच ठाऊक होती व स्वभावही. मी त्यांच्या दुकानासमोर उभा राहिलो. तेथेच त्यांचे बंधू नानाही बसलेले होते. माझी त्यांनी आस्थेने चौकशी केली, घरच्यांची चौकशी केली आणि माझ्या हातावर एक गुळाचा खडा ठेवला आणि म्हणाले तुला गणितामध्ये शंभरापैकी शंभर गुण मिळाले असे मला तुझ्या शिक्षकांनी सांगितले. ते ऐकून खूप बरे वाटले आणि म्हणून मी हा तुला गुळाचा खडा शाबासकी म्हणून दिला आहे. बापू साटमासारक्या गावातील मोठ्या माणसाने माझे कौतुक केल्यामुळे माझा आनंद द्विगुणीत झाला.

ही घटना जेव्हां घरी सांगितली तेव्हां कोणाचाच विश्वास बसेना की बापू साटमही एखाद्याचे कौतुक करू शकतात. असो, आता ते हयात नाहीत परंतु त्यांनी दिलेल्या गुळाची चव मात्र आजही माझ्या जिभेवर आहे.

माझे आजोबा आम्ही ज्यांना दाजी म्हणत असू ते स्वत: अडाणी होते, परंतु आपल्या नातवंडानी भरपूर शिकून मोठे व्हावे ही जबरदस्त इच्छा. अधूनमधून ते माझ्या वर्गाबाहेर खिडकीच्या बाजूला उभे राहून मला न्याहाळत असत. त्यांना बघितले की वर्गशिक्षक त्यांना वर्गामध्ये बोलवून घेत व इतर मुलांना सांगत की आदर्श पालक कसे असावेत की मुलांना नुसते शाळेत पाठविले म्हणजे पालकांचे काम संपले नाही, तर पालकांनी आपल्या मुलांच्या प्रगतीची चौकशी शाळेत येऊन यांच्याप्रमाणे केली पाहिजे. मुलांचे लक्ष मात्र शिक्षकांच्या सांगण्याकडे नसायचे, तर मुले माझ्या आजोबांचा पेहेराव बघून फिदीफिदी हसायचे आणि मला मात्र मेल्याहून मेल्यासारखे व्हायचे. त्यांचा पेहेराव म्हणजे डोक्याला गळ्यापर्यंत खाली ओढलेली कानटोपी, अंगात जाकेट, लंगोटी आणि पायात एखादी फाटकी चप्पल. लंगोटी लाउन ते भर वर्गात जायचे, त्याच पोशाखात गावात फिरायचे आणि म्हणून मुलांच्या कुचेष्टेचा विषय बनायचे.

घरी आल्यावर मी आजोबांची तक्रार आजीकडे व आईकडे करित असे की असला पोशाख घालून हे शाळेत कशाला येतात? की ज्यामुळे मला मान खाली घालावी लागते. परंतु माझ्या आजोबांनी आपला पेहेराव कधीच बदलला नाही. तशाचप्रकारच्या पोशाखाने ते शाळेच्या वर्गासमोर जात, शिक्षकांना भेटत आणि माझ्याविषयी चौकशी करीत. एक दिवस बोलता बोलता त्यांनी विषय काढला की माझ्या पोशाखाची तुला लाज वाटते का रे? एक गोष्ट लक्षात ठेव की एखादी गोष्ट लोक करतात म्हणून आपण करायची नाही. मला हाच पोशाख आवडतो कारण हाच माझ्या परिस्थितीला परवडतो. तू लोकांच्या कुचेष्टेकडे लक्ष देऊ नकोस. ते मला पुढे सांगायचे की गांधींचे नाव घेण्याएवढा मी मोठा नाही, परंतु एक लक्षात ठेव की गांधीजीना कोणी हसत नव्हते. लोकांनी त्यांचे महात्मापण त्यांच्या कपड्यावरून नाही ठरवले.

मागे वळून पाहताना आता वाटते की आम्ही आज चित्रपटातून कमीतकमी कपड्यामध्ये काही कलाकार पाहत आहोत आणि ही वस्तुस्थिती आपल्या अंगवळणी पडली आहे. त्याप्रमाणात माझ्या आजोबांच्या अंगावर मुबलक प्रमाणात कपडे होते. मी नववीत असताना महाशिवरात्री दिवशी आमचे आजोबा आम्हाला सोडून गेले. त्यांनी माझ्यावर केलेले संस्कार गुळाच्या खडयाप्रमाणे आजही मला चिटकून आहेत.

# हे सारे आपल्या भल्यासाठी...!

अरुण.वि.देशपांडे

लेखाचे शीर्षक वाचून तुम्हाला "घरातील वडीलधाऱ्या माणसांची आठवण होईल..कारण प्रत्येक नव्या पिढीला जुन्या-जाणत्या आणि मोठ्या माणसांकडून जे-जे काही सांगितले जात असते,ते सगळे "तुमच्या-आमच्या भल्यासाठीच रे बाबा !असे समजावले जाते आणि आजकालच्या स्वातंत्र्यशील कुटुंबांना तर असे सांगणारी जाणती मंडळी आजूबाजूला नाहीत आणि असतील तर त्यांचे शब्द ऐकण्यासाठी आमच्या मनाची दारे उघडी नसतात.

कालची-आजची आणि उद्याची "अशी "कल आज और कल "चित्रपटाच्या कथे सारखी परिस्तिथी थोड्या बहुत प्रमाणात प्रत्येक कुटुंबात येत असते. ज्या घरातील माणसांच्या मनांची काही स्वीकारण्याची तयारी असते,त्यांच्या घरात कुणाच्या सांगण्यावरून कधी फारसे "आकड-तांडव " होत नसते.परंतु ज्या घरात "चार-तोंडे,चार दिशेला" असतात त्या घरात शिरलेली एखादी छोटेशी झुळूक देखील बघता-बघता विध्वंसक वावटळीचे रूप घेऊ शकते. मग आपण आपल्याच घरातले वातावरण छानसे असे समन्वयाचे ठेवणे " हे भाल्यासाठीचे ठरणारे आहे. हे लक्षात ठेवले तर किती छान होईल.

केवळ हौसेखातर गॉसिपिंग करणारे महाभाग आपल्या अवती-भवती सतत कार्यरत असतात. ऐकीव गोष्टीत स्वतःची काल्पनिक भर घालून चित्तथरारक अफवारुपी बातम्या पसरवून गोंधळ घालणाऱ्या या हौशी बातमीदारांपासून आपण दूर राहणे पसंत करू शकलो तर त्यात आपल्या सर्वांचे भलेच होईल.कारण एखाद्या बद्दल काल्पनिक मत बनवून गैरसमज करून घेण्याच्या त्रासदायक अवस्थेतून आपण सुटू आणि एक ताणापासून मुक्तता होऊ शकेल .

दिलखुलास विनोद करून खळखळून हसवणारे फार कमी असतात आणि एखाद्या गरीब स्वभावाच्या व्यक्तीला टार्गेट करून त्यांच्या उणीवांवरती व्यंगात्मक टीका-टिप्पणी करून हसणारे वाचालवीर इतरांच्या मनाला दु:ख करण्यात का आनंद मानतात, हे समजण्याच्या पलीकडचे आहे. अशा तावलीत आनंद मानणाऱ्या कंपूत आपण असू नये हे जर ठरवता आले तर जननिंदेचे पातक घडणार नाही.

“ अंथरून पाहून पाय पसरावेत ",या मर्यादेचे उल्लंघन आजच्या चंगळवादी मनोवृत्तीने केव्हानाच केले आहे. "खा-प्या-मजा करा","वापरा आणि फेकून द्या " अशा बेपर्वा आणि बेफिकीर पद्धतीने वागणाऱ्या मंडळींना कुणाचाच धाक उरलेला नाहीये ."मन गुंतेल अशी अवस्था जर

अनुभवलीच नाही तर" एखाद्या वस्तूची,एखाद्या माणसाची किंमत या लोकांना कधीच कळणार नाही.सगळ्या गोष्टी न-झगडता ,न-झिजता मिळाल्यावर संघर्ष करून काही मिळवल्याचा आनंद कसा असतो ?" ही अनुभूती येणारच नाही.त्यासाठी धीराने-,संयमाने -,हिशेबशीर पणाने राहण्यात आपले भले आहे" हे उमजण्यास उशीर होतो .मग आभाळ फाटल्यावर त्याला ठिगळे तरी किती आणि कुठे - कुठे लावणार? नाही का .!

"माणुसकीच्या नात्याने प्रत्येकाशी वागले तर,माणसं जोडता येतात ",अडी-अडचणीच्या वेळी जो मदत करतो,धीर देतो,कठीण परिस्थितीत मित्र म्हणून खंबीरपणाने उभा राहतो "असा भला माणूस आणि अशी "भली माणसे "अजूनही आपल्या आजूबाजूला आहेत .फक्त त्यांना ओळखण्याची "निर्मल -नजर तूर्तास तरी स्वर्थीपणामुळे गमावून बसलेल्यांनी -"स्वतःच्या भलेपणासाठी तरी "आपल्या घराची आणि मनाची कवडे उघडायला हवी आहेत."कारण त्यातच सगळयांचे भले आहे."

# नातं

देवेंद्र चुरी

नुकताच घरातली काम उरकून सुधा वर्तमानपत्र चाळीत बसली होती.इतक्यात टिंग टोंग दाराची बेल वाजली.आताच तर सतीश आणि त्याचे बाबा बाहेर पडले होते मार्केट मध्ये जाण्यासाठी मग कोण आलं असेल बरं हा विचार करत तिने दुर्बिणिच्या छिद्रातुन बाहेर पाहिलं पाहते तर काय बाहेर चक्क सचिन उभा होता.तिने तत्परतेने दरवाजा उघडला.आणि सचिनकडे पहातच राहिली. सचिनला प्रत्यक्ष भेटून ५ वर्ष उलटली होती.तिच्या डोळयापुढे ५ वर्षापूर्वी मायदेश सोडून अमेरिकेत नोकरीसाठी जातानाची त्याची मूर्ति समोर येत होती . गेल्या आठवड्यातच त्यांच झालेलं बोलणं तिला आठवलं तिने लटक्या रागातच सचिनला सुनावले होते "हे बघ सचिन जर ह्या दिवाळीला तू जर ह्या ताईला भेटायला आला नाहीस तर तुझं माझं नातं संपलं म्हणून समज... " ह्यावर सचिन अगदी लहान बाळासारखा काकूळतिला येउन म्हणाला होता "असं नको म्हणू गं ताई, ह्या दिवाळीला मी काहीही झालं तरी तुझ्याकडे येईनंच..." त्याच्याकडे बघता बघता तिचे डोळे भरून आले.

"अग ए ताईडी असंच माझ्याकडे बघत राहशील की मला घरात पण येऊ देशील" या सचिनच्या बोलण्याने तिची तंद्री भंगली."अरे ये आत ये हे काय तुला सांगायला हवं होय ,आणि आता पाच वर्षांनी तुला सवड मिळाली हो या ताईकडे यायला" ती हसतच उत्तरली.अगदी लहानपणापासुन दोघांच एकमेकांवर खुप प्रेम होतं."ए ताई तुला राग आला का गं माझा खरंच मी ..." तो अगदी भावुक होऊन म्हणत होता, दोघांनाही गहिवरून आलं होतं.त्याचं बोलणं मध्येच कापत सुधा म्हणाली "अरे इतका सेंटी का होत आहेस, मी कधी तुझ्यावर रागावणार आहे का रे ,चल पटकन हातपाय धुवून फ्रेश हो तोवर मी तुझ्यासाठी मस्त चहा ठेवते, सतीश आणि त्याचे बाबाही येतील इतक्यातच मग आपण मस्त गप्पा मारू" अस म्हणत सुधा स्वयंपाक घराकडे वळली.

गरमागरम चहाचा आस्वाद घेत दोघांच्या गप्पा रंगात आल्या होत्या.दोघेही मनाने कितीतरी वर्ष मागे आले होते.अनेक जुन्या आठवणीना उजाळा देताना काही गंभीर प्रसंग स्मरत दोघे भावुक होत होते तर काही मिस्किल क्षण आठवून दोघेही मनसोक्त हसत होते.सहजच सुधाने टी वी चालु केला. न्यूज़ चैनल वर अमेरिकेतून भारतात येणाऱ्या विमानाला अपघात झाल्याची ब्रेकिंग न्यूज़ चालु होती."बरं झालं रे तू ज़रा आधीच इथे आलास नाहीतर ही बातमी बघून माझा जीवच गेला असता रे" सुधाच्या डोळयात आता पाणी आले होते."ताई मी यावेळी नाही आलास तर तुझ माझ नात संपलं असं तू म्हणाली होतीस ना मग मी इथे यायचा राहिलो असतो का गं?" "असं कारे म्हणतोस "सुधाने कळवळुन विचारले."अग ताई,आईने मरायच्या आधी मला एक गोष्ट सांगीतली होती ती म्हणजे "कितीही संकटे येवोत, तुमचं बहिण भावाच 'नातं' आयुष्यभर अगदी अबाधित,अतूट असं ठेवा."आणि दोघेही आईच्या आठवणीत हरवून गेले.इतक्यात मधल्या खोलीत टेलीफोनची रिंग वाजली."आले हं मी" म्हणत ती आतल्या खोलीत गेली.

“हेल्लो” फोन उचलून सुधा म्हणाली ,“मी सचिनचा मित्र संजय बोलतोय, माफ करा एक दु:खद बातमी आहे तुमच्यासाठी तुमचा भाऊ सचिन भारतात ज्या विमानाने येत होता त्याला अपघात झाला.तो आता.... ताई सचिन आपल्याला सोडून गेला...”पलीकडून आवाज आला.

“काय ...? तो तर इथे आहे.कोणी सांगितल तुम्हाला इतकी वाईट मस्करी करायला “सुधा रागातच म्हणाली. “ताई स्वत:ला सांभाळा,तुम्हाला भास झाला असेल.मी इकड़चे सगळे सोपस्कर पार पाडून लवकरात लवकर येतो तिथे सचिनचा मृतदेह घेऊन ...”यापुढे काही न बोलता त्याने फोन ठेऊन दिला.
सुधाला खुप राग आला होता त्या माणसाचा आणि ती थोडी घाबरली ही होती.”अरे सचिन..” म्हणत ती लगबगीने बाहेर आली. सचिन खुर्चीवर नव्हता.मग तिने घरात सगळी कड़े पाहिल पण सचिन कुठेच नव्हता.इतक्यात तीच लक्ष समोर चालु असलेल्या टी.वी. कड़े गेल.त्या अपघातातील मृतांची नाव खाली येत होती. त्यातल एक नाव पाहून ती जागच्या जागी थबकली आणि अगदी सुन्न मनाने टेबलवरील चहाच्या खाली कप कड़े पाहात राहिली ...

# असेल रंभा घायळकर ...पण नाद नाय करायचा

धुंद रवी

......माझ्यासारखा साधा, सरळ, पांढरपेशी, व्हाईट कॉलर माणुस गुलाबी फेटा घालुन तमाशाला गेला, ह्याचं कारण आमच्या ध्यानमंदिरातल्या (ज्याला काही कोत्या मनाचे क्षुद्र जीव दारुचा गुत्ता म्हणतात..) त्या रसिक समिक्षकांनी केलेलं चुकीचं समिक्षण.... !

दारु प्यायल्यावर माणुस खरंच खर बोलतो हे धादांत खोटं आहे....

मला माहित आहे की माझ्या ह्या वक्तव्यामुळे माझे काही देशी-बांधव दुखावले जातीलही पण जो आघात माझ्या मनावर झालाय त्याचं काय ? ज्यांच्यासह मी चकणा चरला त्या माझ्या सहचरांनी मला फसवलंय. ज्यांच्या ग्लासवर ग्लास आपटुन आजपर्यंत 'चिअर्स' म्हणत होतो त्यांच्या डोक्यावर डोक आपटुन 'चिटर्स' म्हणावसं वाटतंय...

एक वेळ त्यांनी मला तळलेले काजु दाखवुन सडलेली बॉबील दिली असती तरी मी सहन केलं असतं... एक वेळ त्यांनी अपेयपानाचं निमंत्रण देऊन एरंडेल तेलात राजबिंदु घालुन दिलं असतं तरी मी सहन केलं असतं... (हे राजबिंदु काय आहे हे एकदा पिऊन बघाच. सगळया रोगांवर रामबाण इलाज आहे. हे प्यायलं की तो रोग आणि तोंडाची चव, कायमचे नष्ट होतात.) एक वेळ त्यांनी गुलाबपाणी म्हणुन माझ्यावर गोमुत्र शिंपडलं असतं तरी मला चाललं असतं..... पण त्यांनी ह्याही पेक्षा वाईट केलं...

त्यांनी मला आशा दाखवुन.... त्यांनी मला आशा दाखवुन.... इला अरुण ऐकवली हो...! मला धुक्यातले ढग सांगुन डीडीटी पावडरच्या धुराळयात उभा केला.... त्यांनी भरजरी पैठणी दाखवुन हातात टॉवेल-टोपी ठेवली...!

....मी होतो म्हणुन सहन केलं.. माझ्याजागी दुसरा कुणी शुद्धीवर असता तर निराशातीशयानी दारुच सोडली असती. नको तो गुत्ता आणि नको ती अघोरी फसवणुक... पण मी टिकुन आहे आणि नक्की काय झालं हे पण तुम्हाला सांगणार आहे...

त्याचं असं झालं...

त्यादिवशी तमाशाला जायचं म्हणुन मी सकाळपासुनच शुद्धीत होतो. दारु सोडुन आयुष्यातल्या कोणत्याही गोष्टीचा आनंद हा शुद्धीत राहुनच घेता येतो हे मागच्या एका प्रसंगावरुन मी शिकलोय. माग एकदा आमच्या ध्यानमंदिरात 'रंभा घायाळकर' नावाची लावण्यवती कोनशीला समारंभासाठी पहिली वीट ठेवायला आली

होती. (हं... दुकानाच्या मालकानी होती ती दोन बेसिन पाडुन तिथं हौद बांधुन घेतला, तेंव्हाचीच गोष्ट....)

इतिहासात पहिल्यांदाच आणि शेवटचेच... सगळे जण शुभ्र वस्त्र, स्वच्छ नेत्र, स्पष्ट उच्चार आणि स्तब्ध देह घेऊन एका रांगेत, दोन जणात एका हाताचं अंतर ठेऊन, आपापल्या पायजम्याची इस्त्री पुन्हा पुन्हा चेक करत, टोपीचं टोक हातानी पुन्हा पुन्हा पुढं ओढत, हसण्यात आपण जहागिरदार असल्याचा आविर्भाव घेऊन आणि मिश्यांना 'मर्दावानी' ताव देत.... बाईंच्या स्वागताला उभे होते.

सगळ ठीक चाललं होतं आणि झालंही असतं जर जाता जाता बाईंचा गजरा पडला नसता. त्या गज-यासाठी तुंबळ युद्ध झालं. शुभ्र वस्त्र आधि मलिन आणि मग लाल झाली. स्वच्छ नेत्र आधि लाल आणि मग काळे-निळे झाले. स्तब्ध देह क्षुब्ध झाले. उच्चार मात्र स्पष्टच राहिले पण ते उद्धार ऐकवत नव्हते इतकंच...! ह्या एकतर्फी स्वयंवरानंतर दुकानाच्या मालकाने सगळयांना (जरी लाईफ मेंबर नसले तरी) फ्री ड्रॉप दिला.... पोलीस चौकीपर्यंत.... !

तिथं सगळयांना आत टाकता टाकता पोलीसांनी, सगळयांच्या वस्तु काढुन घेताना, हातात आलेला गजरा फेकुन दिला आणि पुन्हा एक निर्वाणीचं तुंबळ युद्ध ! त्या सामाजिक असंतोषातुन जन्मलेल्या जनक्षोभापुढे झुकुन पोलीसांनी सगळयांना गज-याची एक एक कळी दिली आणि तहाचे निशाण फडकवले.....

जिच्या फक्त गज-यासाठी, प्रेमात मस्ती करणारे, दोस्तीत कुस्ती करायला लागले, जीवाला जीव देणारे शिवीवर शिवी द्यायला लागले, जिला नीट पाहता यावं म्हणुन आख्खा एक दिवस दारु न पिता देहयातना सोसायला तयार झाले, ...अशा त्या मदनिका-सम्राज्ञी लावण्यवतीचं दर्शन मी शुद्धीत नसल्यामुळं मला झालं नाही... हाय रे दैवदुर्विलास !! त्या दिवशी मला समजलं की एकदा चढली की मग घडण्यासारखं बाकी काही उरतच नाही. त्यामुळे जगण्यासारखं आणि बघण्यासारखं काही असेल तर नशेत नसणं खुप गरजेचं आहे.

तर सांगायचं असं की, त्यादिवशी तमाशाला जायचं म्हणुन मी सकाळपासुनच शुद्धीत होतो. पहिल्या रांगेच तिकिट काढुन आत जाऊन बसलो. गंमत म्हणजे पहिल्या रांगेत मी एकटाच... माझे सगळे आप्तिष्ट, इतर रसिक दुस-या, तिस-या ते दहाव्या रांगेत... रंभा घायाळकरच इतकं कौतुक ऐकलं होतो की कधी एकदा तो पडदा वर जातोय असं झालं होतं. उरातली धडधड वाढत चालली होती. धड धड धड धड असा आवाज अचानक टण टण टण टण ढिगीटिकी टिकीटिकी धिंगीक असा झाला अन घाबरलोच... मग कळालं की पडद्यामागुन ढोलकीचा आवाज येतोय.... तो ढोलकीचा आवाज शमतो न शमतो तोच एक पडद्यामागुनच एक अनाऊंसमेंट झाली.

"रशीक मायबापांना माणाचा मुजरा,

आवरुन बसा जरा सावरुन जरा

घाला नोटाच्ये हार घ्यावा पिरेमाचा गजरा.....

कमजोर दिलवाल्यांच्या जीवाला धोका

वा-यावर पदर... तुमचा ढगामधी झोका

ही ढगातली ह्प्सरा चुकवील काळजाचा ठोका

आज नटरंगी नार उडवील लावण्यांचा बार

जनु मोसंबीचा झटका... जनु नारंगीचा वार

रावजी सांभाळुन बसा... जावाल कामातुन पार

या भावजी तुमच्च्यासाठी चंदनाचा पाट

फेटेवालं पावनं आज यव्वनाशी गाठ

ज्याची शिटी वाजनार न्हाई... त्येला घराकडची वाट...."

ह्या वाक्यावर प्रचंड शिट्ट्या पडल्या आणि त्या थांबेचना. ते पाहुन मी तर तोंडातच बोटं घातली आणि शिट्टी वाजवायचा प्रयत्न करायला लागलो. मला आवाज हवा होता पण नुसतीच हवा. तमाशा बघण्यासाठी जसं फेटा हा ड्रेस कोड असतो, तसं 'शिट्टी येणं' हे मिनिमम बेसिक कॉलिफिकेशन लागतं. मला माझ्या असंस्कृत आणि अशिक्षितपणाची लाज वाटायला लागली आणि आता ते आपल्याला घराकडाची वाट दाखवणार ह्या भितीनी माझा जीवच गोठला. पण पहिल्याच रांगेत बसण्याच मान घेतल्यामुळे असं काही झालं नाही.

मग अनाऊंसमेंट पुढे चालु झाली.... ".....तर तुमच्यासम्होर सर्श सादर करतोय..... रंभा घायाळकर प्रसुत.... १६ लावण्यवतींचा.... भव्य एकपात्री लावन्यांचा बहारदार प्रोग्राम.... 'नाद नाय करायचा'.... "

अन ह्या प्रोग्रामची सादरकर्ती हाये....

रंभाऽऽऽऽ रंभाऽऽऽऽऽऽ अंभाऽऽऽऽऽ भाऽऽऽऽऽ भाऽऽऽऽऽ

घायाळकरऽऽऽ याळकरऽऽऽ ळकरऽऽऽऽ ळकरऽऽऽऽ ळकरऽऽऽऽ "

पुन्हा शिट्टयांचा मुसळधार पाऊस पडला आणि मी.... नळी फुंकली सोनारे, इकडुन तिकडे गेले वारे ! मग हळु हळु पडदा वर गेला. आणि.... आणि पैठणीच्या ऐवजी टॉवेल-टोपी !! म्हणजे अगदी टॉवेल-टोपीवर नाही पण

एक काळाकभिन्न, जाड्जुड मिश्या आणि घनदाट दाढीवाला अडवा-तिडवा रांगडा गडी, मावळयाच्या फॅन्सी ड्रेसात, हातात डफ घेऊन, अंगार भरलेले डोळे माझ्यावर रोखत उभा होता.

तमाशात पोवाडा ??????????????

तमाशात ?????????????? पोवाडा ??????????????????????

"ह्यो रंभेचा बॉयफ्रेंड. शाहीर आहे. पहिल्यांदा तेचा पोवाडा गपगुमान ऐकायला लागतो, मग रंभा येतीया !"

गेली कित्येक वर्ष इमानेइतबारे तमाशाची वारी करणा-या एका भक्तानं मला माहिती पुरवली. मी जरा निराश झालो. हे म्हणजे भाग्यश्री हवी असेल तर हिमालय पण घ्यावाच लागेल असं झालं. पण हिमालय नकोच म्हणुन भाग्यश्री पण नको असं इथे चालणार नव्हतं. शेवटी इथे रंभा होती... रंभा ! जिच्या फक्त गज-यासाठी.... असो.

माझ्यावरची नजर न काढताच त्या शाहिरानं मला एक मुजरा केला. पहिल्या रांगेत बसण्याचा मान.. दुसरं काय ! मग त्याचा पोवाडा चालु झाला आणि मी गपगुमान ऐकु लागलो.

"..... वै-याची रात्रये... खुप अंधार पडलाये.... मावळे घाबरलेलेत.... तानाजी न डगमगता उभाये... कोंढाण्यानी आवाज दिलाये मराठ्यांना.... तानाजीनी यशवंतीला दोर बांधलाये आणि सगळे मावळे गड चढुन वर गेलेलेत... समोर मुघल बघताच तानाजीचा संताप संताप झालेलाये..... "

असं म्हणुन तो माझ्याकडेच रागारागानी पाहायला लागला. मी घाबरुन थोडा मागे सरकलो. तर तो अंगावर ओरडलाच.

" खबरदार... जागचा हलशील तर..."

मी घाबरुन "नाही...नाही" अशी मान हलवायला लागलो. तो पुढे म्हणाला,

" हे मराठ्याचं रक्त हे, असा सोडाणार नाही तुला लांडग्या.... शपथ हे मला स्वराज्याची... तुझं मुंडकं आणि कोंढाणा घेऊनच महाराजांना तोंड दाखवेन..."

तो मांडीवर हात आपटुन कसले कसले आवाज काढायला लागला. तो रागानी लाल झाला होता होता, मी भितीनं पांढरा पडलो होतो. पहिल्या रांगेत कुणी का बसत नाही हे मला आता कळालं.

(आता तुम्हालाही माझ्या यातना कळाल्या असतील, आता कळालं असेल की माझ्या देशी-बांधवांनी मला कसा फसवला.) नको तो तमाशा पण नको ते युद्ध असा विचार करुन मी उठलो तर तो गरजला..... "भ्याडा, कुठे पळतोस ? चल हो तयार लढायला. हा तानाजी आज तुला जीता सोडत न्हाई.... "

आणि मला काही कळायच्या आत मी स्टेजवर होतो. त्याच्या हातात माझी गचांडी होती. माझा मानाचा फेटा मला कधीच सोडुन गेला होता. मग त्यानी मला मार मार मारलं....हाण हाण हाणलं....कुदलंल.. आपटलं... धोपटलं... आणि हा सगळा वेळ त्या मागच्या बायका, पोवाड्याच्या सुरात....

"मुघल धोपटला जी हा जी जी...

मुघल धोपटला जी हा जी जी....

मुघल धोपटला जी हा जी जी " असं गातच होत्या. कधी एकदा गड येतोय आणि हा सिंह जातोय असं झालं होतं मला..... मग पोवड्याची ३-४ रक्तरंजीत कडवी झाल्यानंतर एकदाचा सिंह पडला आणि मी जीवाच्या आकांताने उठुन पळायला लागलो. तर हा रेडा पुन्हा उठुन उभा... म्हणाला,

"ए भित्र्या.... माझ्या भाच्याला मारुन कुठं पळतोस रं रड्या....? हा ७८ वर्षाचा शेलार मामा जित्ता हाये अजुन....ये हिकडं, लढ माझ्याशी..."

(ह्या क्षणी मला जर देव प्रसन्न झाला असता तर मी खालील तीन वर मागुन घेतले असते.

१. लढाईसाठी एका घरातील एकच व्यक्ती असावी. नातलग घेऊ नयेत. विशेषतः मामा-भाच्चे...)

२. ६० वर्षावरील म्हाता-यांना लढाईत प्रवेश नसावा.

३. पोवाड्यामध्ये ४ पेक्षा जास्त कडवी नसावीत.)

तर शेलारमामाबरोबर अजुन ४-५ कडवी झाली ज्याचा शेवट "मुघल धोपटला जीहाजीजी..." असा होता. मग शेवटी युद्ध संपलं आणि शुद्ध हरपलेल्या मला स्टेजवरुन समोरच्या पिटात ढकलण्यात आले.

त्यानंतर खुप लावण्या झाल्या म्हणे. मी भानावर आलो तेंव्हा लोक बेभान झाले होते. ढगात झोके घेत होते... फेटे उडत होते.... शिट्ट्या वाजत होत्या....लोकं पार कामातुन गेली होती.... नारंगीचा वार झाला होता... पावन्यांची यव्वनाशी गाठ पडली होती. आता पहिली रांग भरली होती म्हणुन मी तिथंच पिटात बसलो. इतक्यात एक अनाऊंसमेंट झाली. "तर रशीक मंडळी... तुमच्या विनंतीला मान देऊन एक शेवटची लावणी रंभाबाई सादर करतील.." मी पुन्हा जिवंत झालो.

ढोलकीची थाप आणि घुंगरांचा आवाज ऐकु यायला लागला तशी माझी धडधड वाढायला लागली. रंभा बाहेर आली... पण आख्खी नाही तिचा एकच हात विंगेबाहेर आला. त्या हातात गजरा होता आणि काही कळायच्या आत तिनं तो गजरा पब्लिकमध्ये भिरकावुन दिला. तो हरामखोर गजरा माझ्याच डोक्यावर पडला आणि मग सुमारे ५६ जण त्या गज-यासाठी माझ्यावर तुटुन पडले. माझे आणि गज-याचे मिळुन १९३ तुकडे झाले. .....शेवटच्या लावणीला ४ वेळा वन्समोर मिळाला म्हणे.

......मी आता ठरवलय... कितीही नादखुळा तमाशा असला तरी जायचं नाही... सगळे नाद सोडायचे.... मोहावर नियंत्रण ठेवायचं.... कितीही सुंदर मोह असला तरी जीवापेक्षा थोडाच मोठा आहे... असेल ती रंभा.....

....असेल ती रंभा घायाळकर पण आता नाद नाय करायचा.........................!

# आयुष्य

राहूल आराध्ये आणि प्रथमेश सुरेश शिरसाट

आयुष्य म्हणजे काय ? आयुष्याची व्याख्या प्रत्येक व्यक्तीनुसार बदलत जाते. आयुष्य म्हणजे मौज, मजा, मस्ती, प्रत्येक क्षण एन्जोय करायचा, हे सहज आणि बऱ्याचदा मिळणारे उत्तर ! अशी उत्तरे देणाऱ्या व्यक्ती यापलीकडचा कधी विचार करतंच नाहीत. आयुष्य आणि नशीब यांचा बऱ्याचदा घोळ घातला जातो आणि नशिबाला दोष दिला जातो. जे चुकीचे आहे आपणंच आपले नशीब आपल्या हाताने बनवत असतो, तुम्ही स्वतःच जर तुमच्या हाताने पायावर कुऱ्हाड मारत बसलात आणि नशीबाला दोष देत राहिलात तर कोणाला मुर्ख म्हणावे तुम्हाला की तुमच्या नशीबाला ? आयुष्य हे साधे-सोप्पे आणि सरळ का नाहीये ? असा प्रश्न पडतो. पण प्रत्यक्षात प्रत्येक प्रश्नाच्या मुळाशी जाण्याचा कोणी प्रयत्न करते का ? प्रत्येक प्रश्नाचे उत्तर असते, जर उत्तर मिळाले नाही, तर आपण ते शोधण्यात कमी पडतो. उत्तर शोधण्यासाठी उत्तराविषयीची उत्कंठा हवी सोडवायचे म्हणून सोडून प्रश्न कधीच सुटत नसतात ओ.

प्रत्येक टप्प्यावर आयुष्य बदलत जाते. त्याचे परिणाम, तीव्रता इत्यादी बदलत जाते. आपण आयुष्य किती जगलो यापेक्षा ते कसे जगलो याला जास्त महत्त्व आहे. प्रत्येक माणूस आयुष्यच जगत असतोच की, प्राणिदेखील आयुष्य जगत असतात, मग आपणही जर तसेच आयुष्य जगलो तर त्यांच्या आणि आपल्या जगण्यात काय फरक उरेल? आयुष्य माणसाला खूप काही शिकवून जाते किंवा शिकवतेच असे म्हणा ना. मुख्यता: आयुष्याचे तीन टप्पे असतात. बाल्यावस्था, तारुण्यावास्था आणि वार्धक्य. या प्रत्येक अवस्थेत आयुष्य कसे असते ते पाहूया.

बाल्यावस्था म्हणजे आयुष्यरूपी फुलाची कळी. हे आयुष्य खुपसे निरागस असतं. यात आपली वाटचाल प्रगतीपथावरून होण्यास सुरुवात होते. यात आयुष्य म्हणजे काय ? असे प्रश्न पडतच नाहीत. यात आपण दुसऱ्यांवर अवलंबून असतो, बऱ्याचदा पालकांवर आणि नातेवाईकांवर. बाल्यावस्था म्हणजे ओल्या मातीचा गोळा असतो. यात अनुकरण, संस्कार, काही प्रमाणात संगत, अशा गोष्टी महत्वाच्या असतात. बाल्यावस्थेतील आयुष्यातच वैचारिक दृष्टीकोन, आचार-विचार, यांचा पाया रचला जातो. आपल्यावर जसे संस्कार होतील, किंवा आपल्याला जे पहायला मिळते ज्या काही गोष्टी सांगितल्या जातात त्या आपण तथ्य मानतो आणि त्या गोष्टींवर डोळें बंद ठेवून विश्वास ठेवतो, कारण त्या वयात आपल्याला खरे काय आणि खोटे काय, किंवा शाश्वत काय आणि स्वरचित काय याची माहीतीच नसते. जे आपल्यापेक्षा मोठे असतील मग ते कोणीही असो, पालक शिक्षक, आजी आजोबा, नातेवाईक, आप्तिष्ट ही मंडळी सांगतील ती आणि तीच पूर्व दिशा अशा प्रकारचे आपले मत असते किंवा मनस्थिती असते. त्या वयात पडताळणी करणे हा प्रकारच नसतो. डोळयांवर झापडे लावलेल्या

घोड्याप्रमाणे आपण फक्त समोर दिसेल तेच बघत असतो पण आपल्या आजूबाजूला काय घडत आहे, त्या गोष्टींचा आपल्या डोळयांसमोर होणाऱ्या गोष्टींवर परिणाम होतो, आपल्याला ज्या गोष्टी डोळयांनी दिसत आहेत त्या खरच तशा आहेत का ? की आपल्या डोळयांसमोर त्या तशा ठेवल्या गेल्या आहेत याचा पाठपुरावा बाल्यावस्थेत होत नसतो.

तारुण्यावस्था हा सगळयात महत्वाचा टप्पा असतो. तारुण्यावस्थेतील आपल्या आयुष्यावर आपल्यापेक्षा इतरांचीच नजर आणि नियंत्रण जास्त असते, म्हणजे आपण काय करतो, कुठे जातो, कुणासोबत आहोत, याची आपल्या पालकांनाच नव्हे तर मित्रमंडळींपासून ते थेट आपल्या घरच्या नातेवाईकांपर्यंत सगळयांनाच माहिती हवी असते, कधी कधी अशा गोष्टी आपल्या स्वातंत्र्याच्या आड तर येत नाहीत ना अशी शंका , समज आणि गैरसमज त्यावेळेस तरूण मनांत निर्माण होणे सहाजिक असते. आयुष्याच्या या टप्प्यात बऱ्याच गोष्टींचा अर्थ समजायला लागतो, काय सत्य काय, असत्य समज कोणते, गैरसमज कोणते? बाल्यवस्थेत आपल्याला शिकवलेल्या, आपल्यावर बिंबवलेल्या किंवा आपल्याला कळलेल्या गोष्टींमध्ये किती तथ्य आहे ,किती गोष्टी या फक्त कल्पनाच होत्या? याची उकल लागते ती फक्त तारुण्यावस्थेतच. तशी ही अगदी नाजूक अवस्था असते. यात स्वत:ला सावरून स्वत:ची प्रगती साधणे हे जास्त महत्वाचे असते. नाहीतर अनावधानाने पाय घसरून अपघात होण्याचाही संभव असतो आणि मग पुढील आयुष्य अर्थहीन होऊन जाते. मैत्री आणि प्रेम या दोन गोष्टींचे आकर्षण या वयात होते किंवा तरूण मन या गोष्टींकडे खेचले जाते, पण या दोन गोष्टीच आपल्याला पुढे नेण्यास किंवा आपले पाय खेचण्यास कारणीभूत होऊ शकतात याचेही भान तरुण्यावस्थेत ठेवायला लागते. मैत्री आणि प्रेम या गोष्टींना त्या त्या ठिकाणी ठेवता आले पाहिजे, कुठलीही गोष्ट कधीच डो्क्यावर घेऊ नये त्याचे दुष्परिणाम आपल्यालाच भोगावे लागतात. तरुण्यायुष्यात (तारुण्य + आयुष्य) बऱ्याचदा नेमून दिलेल्या गोष्टी घडतात. म्हणजेच ठराविक वयापर्यंत शिक्षण, मग नोकरी, लग्न- संसार ! हे ठराविक वयात आणि वेळेत होते. पण हे करताना किती जण थोडा तरी तिरकस विचार करतात ? शिक्षणाचे पर्याय बी. कॉम., सायन्स, आणि मग एम. बी. ए. किंवा मेडीकल आणि इंजिनिअरिंग, यापलीकडेही शिक्षण आहे, याचा बहुधा विसर पडतो. शिक्षण घेताना अंतिम ध्येय काय असते तर उच्च शिक्षण घेऊन जास्तीत जास्त पैसा कमवणे आणि विद्यार्थी-पालाकांचे हेच ध्येय असते. किंबहुना पालकच मुलांच्या मनावर हे ध्येय बिंबवतात आणि हीच मुले जेव्हा स्वत: पालक होतात तेव्हा तेदेखील हेच करतात म्हणजे हे चक्र चालूच राहते. हि परिस्थिती १० पैकी ८ घरात असतेच,पण अशा पालकांनी आपल्या मुलांना त्याचे करिअर निवडण्यात मुलांनाच प्राधान्य द्यावे, प्रत्येकवेळी आपण पूर्ण न केलेले किंवा आपल्याकडून अपूर्ण राहिलेले स्वप्न आपल्या पाल्याने पूर्ण करावे असा अट्टाहास केला जातो आणि तसे झाले नाही तर पाल्यांना पालकांच्या रोषाला सामोरे जावे लागते याचा विपरित परिणाम म्हणजे तरूण वयात वाढणाऱ्या आत्महत्या. मुलांच्या आयुष्यातील काही पाकळया तारुण्यावस्थेत उघडल्या जातात, प्रत्येक विद्यार्थ्याला कसे नेहमीच चांगले टक्के मिळतील? प्रत्येक माणसात काही सुप्त गुण दडलेले असतात कधी ते परिस्थितीमुळे मारले जातात तर कधी आपल्याच लोकांमुळे, या सुप्त गुणांच्या साहाय्याने माणूस कुठच्या कुठच्या भरारी घेऊ शकतो हे विशेष सांगायची गरज नाही. एखाद्या क्षेत्रात नैपूण्य होण्यासाठी फक्त शिक्षणच

गरजेचे नसते हे लक्षात घेणेही खूप महत्त्वाचे असते जर कोणी चाकोरी बाहेरचा विचार केलाच तर त्याला योग्य साथ मिळेल याची शाश्वती नाही. अशाने त्या व्यक्तीच्या कलागुणांना वाव मिळत नाही. छंद ठराविक काळापार्यांतच जोपासले जातात आणि तिथेच थांबतात. सकाळी लवकर उठायचे ९ ते ५ नोकरी करायची, घरी येऊन पेपर वाचायचा, ऑफिसची टेन्शन्स नकळत घरी आणायची आणि जेवून झोपून जायचे. पण टेंशनमधून निर्माण होणारा तणाव, याचा आपल्याच पाल्यांवर आणि घरच्यांवर होणारा वाईट परिणाम या गोष्टींचा सारासार विचार करणेच आपण सोडून देतो. हा रोजचा दिनक्रम एके दिवशी तरी प्रकोपाला जातो आणि नेमके काहीतरी अघटित होऊन बसते . संसाराच्या राहाटगाड्यातून मध्यमवर्गीय माणसाला वेगळे काही करायला वेळच मिळत नाही किंवा वेळ मिळाला तर ते वेगळे काही करण्याची वेळ निघून गेलेली असते वा टळून गेलेली असते, पण याही प्रसंगातून जे मनापासून कला जोपासतात ते कधीच अपयशी होत नाही. प्रत्येकजण दुसऱ्याला मागे टाकून पुढे जाण्याचा प्रयत्न करतो आणि स्वत:शीच स्पर्धा करताना बर्याच गोष्टी गमावतो, कोर्पोरेट क्षेत्राचा हा फंडा जो वैयक्तीक आयुष्यात वापरतो आणि आपल्याच हाताने आपल्याच हाताने आपल्या आयुष्याचं वाटोळं करतो . हे करताना तो फक्त आयुष्य काढत असतो किंवा लाचारपणे ढकलत असतो, जगत नसतो. आयुष्य जगणे आणि काढणे/ ढकलणे यात खूप फरक आहे. दैनंदिन व्यवहार करताना सामान्य माणूस नाती विसरत जातो, कधी मुद्दाम तर कधी नात्यांचा मनस्ताप म्हणून, सगळे प्रश्न तोडल्याने सुटले असते तर किती बरे झाले असते नाही ? समंजसपणा आणि वागण्या-बोलण्याचे ताळतम्य या गोष्टींद्वारे नाती नक्कीच टिकवण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. प्रत्येक गोष्टीचा वरवरचा विचार माणुस करून चुकीचे निर्णय घेतो, कधी कधी अशा परिस्थितीत निर्णय घेणे ही त्या काळजी गरज असते किंवा काही वेळेस तसा निर्णय जाणूनबूजून देखील घ्यावा लागतो. नाण्याला दोन बाजू असतात हे माहित असते पण प्रत्यक्षात त्या दुसऱ्या बाजूकडे दुर्लक्ष होते, माणसाने चांगली कामे केलेली कधीच विचारत घेतली जात नाही नेहमी त्याने केलेल्या वाईट कामांचा पाढा त्याच्यासमोर आणि इतरांसमोर वाचला जातो, मग तो माणूस खचेल नाहीतर आणखी काय ओ ? चुका कोण करत नाहीत, तुम्ही आम्ही सगळेच करतो, पण ती चुक जाणुनबूजून केली आहे की ती कोणताही वाईट हेतू न बाळगत आपसुकच झाली आहे हे कारण शोधणे फार महत्त्वाचे असते, कोणताही निर्णय नीट विचारपुर्वक घ्यावा लागतो . आयुष्य सुंदर आहे, प्रत्येक क्षणाचा आनंद घ्या, यासारखे सुविचार आपण वाचतो, ऐकतो, आणि पुढे काही घडतंच नाही, ऐकावे जनाचे आणि करावे मनाचे ही वृती कधी कधी आपल्याला मारक ठरते तर कधीकधी उपयोगीही पडते. आपले आयुष्य चांगले करताना आपण स्वत:सकट किती जणांचे मानसिक बळी देतो याची कल्पना सुद्धा नसते. स्वत:ची प्रगती साधताना दुसऱ्याला मदतीचा हात देताना हात मात्र आखडतो, शिवाय बोट दिलं तर हात गिळणारी माणसांची संख्या समाजात बोकाळत चालल्याने माणुस प्रत्येक वेळेस मदतीचा हात देतान विचार करतो. काही परिस्थितींमध्ये मदत मागणारी व्यक्ती ही फक्त समोरच्या व्यक्तीचा आपल्या स्वार्थासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या वापरच करत असते. स्वार्थी विचार करणारी आणि फक्त स्वतःच्याच हिताचा विवार करणारी माणसे प्रगतीच्या शिखरापर्यंत पोहोचली तरी अशा प्रगतीच्या वाटेवर चालताना आपण नकळत स्वत:ची त्याचबरोबर देशाची अधोगती करत असतो. पूर्वीच्या काळी भावनेतला ओलावा जपणारी माणसे होती, आता मात्र सगळीकडे कोरडेपणा, दुष्काळ झाला आहे. पाळणाघर, वृद्धाश्रम यांची संख्या वाढू

लागली आहे, नात्यातला ओलावा जपता येत नसेल तर आपले आयुष्य यशस्वी कसे काय ? खरंच सुखी समाधानी आहोत ? सतत हॉटेल मध्ये खाणे, पार्ट्या करणे, छोट्या गोष्टी मोठ्या प्रमाणात सेलिब्रेट करणे, विचित्र फॅशन करून मिरवणे याला आयुष्य जगणे म्हणता येईल का ? सभ्यता, शालीनता, शांतता याचा खरा अर्थ कितीजणांना माहित आहे ? "मरावे परी कीर्तिरूपे उरावे" हे सर्व इतिहासजमा झाल्यासारखे वाटते. ज्यांनी खरोखरच यश मिळविले आहे, त्याच्या यशात प्रामाणिकपणा, कर्तृत्वापणा खरच असतो का ? जेव्हा या प्रश्नांची उत्तरे सकारात्मक येतील तेव्हाच खरे आयुष्य जगले असे म्हणता येईल. विचारसारणी आणि दृष्टिकोन यां दोन गोष्टीं जिथे गरज असेल तिकडेच काळानुरुप बदला. अन्यथा या दोन्ही गोष्टींचा विपरित परिणाम देखील होतो ही बाब लक्षात घेतली पाहिजे.

वार्धाक्यावास्थेतील आयुष्याबद्दल थोडे बोलूया. मजेशीर वाटेल पण या आयुष्यालाही महत्व आहे, म्हातारपणीचे आयुष्य म्हणजे बाल्यावस्था व तरुण्यावस्था यांचा मागोवा असे म्हणता येईल. तारुण्यावस्थेत रोजचा दिनक्रम व्यस्त असतो पण वार्धक्यात मात्र बऱ्यचदा  वेळच वेळ असतो. काही वेळेस शरीर साथ देत नसते, बुद्धी देखील कमकुवत होते, पण तरुणपणीचा जोश मनात टिकून असतो त्यामुळे इतरांना सल्ले दिले जातात आणि ते सल्ले अमलात आणले जावे याचा आग्रह हि  असतो. यावेळी आपण स्वत: तरुण असताना किती सल्ले ऐकले आणि सोडून दिले याचा विसर पडतो आणि नाहक मनस्ताप होतो आणि आजूबाजूचे वातावरण देखील बिघडते. म्हातारपणी करता येण्यासारखे अनेक उद्योग असतात. आयुष्याचा एवढा मोठा अनुभव गाठीशी असतो. त्याचा खुबीने उपयोग केला तर मन आयुष्य आनंदी राहू शकते. आपण तरुण्यावस्था कसे जगतो यावर वार्धक्यातील आयुष्य अवलंबून असते. बऱ्याचदा भूतकाळातील आठवणींवर आयुष्य काढले जाते. वार्धक्यात माणसं आपण तारुण्यात काय केले आणि काय गमावले याचे गणित सोडवण्यात व्यस्त असतात, आपण अमूक केले ते चूक होते की बरोबर? या गोष्टींचा विचार करत बसतात, परिणामी त्यांच्या तब्येतीवर परिणाम होतो. आयुष्य हे एकदाच मिळत असते ते स्वत:साठी जगायचे की इतरांना सुखी करण्यात हे आपण ठरवायला हवे, विचार करा जर सुर्याने फक्त स्वतःसाठीच प्रकाश द्यायचे ठरवले तर काय होईल? माणसाला व्यक्तीस्वातंत्र्य हवेच पण स्वातंत्र्य आणि स्वैराचार या दोन विभिन्न गोष्टी आहेत याचा विचार करून आयुष्य जगायला हवे. स्वातंत्र्याचा स्वैराचार जिकडे होतो तिकडे आयुष्याची माती झालीच म्हणून समजा !

सारांश : आयुष्य यशस्वी असण्यापेक्षा अर्थपूर्ण असावे किंबहून ते आपण यशस्वी करून दाखवावे आयुष्य किती जगलं यापेक्षा ते कसं जगलं?, स्वतःसाठीच जगलं कि सर्वांसाठी जगलं, स्वार्थी वृत्तीने किंवा कुरघोडी करून जगलं की नितळ आणि निस्वार्थी मनाने जगलं याला महत्व आहे .

# मोठ्यांचा आदर

रामचंद्र सोनू जाधव

आयुष्याच्या वळणावर आपल्याला अनेक प्रवृत्तीचे लोक भेटत असतात. कोणी खूप चांगले असतात तर कोणी उगाचच डिवचत असतात. कुणाला आपल्याला त्रास देण्यात आनंद होतो तर कुणाला आमचा आनंद द्विगुणीत करण्यामध्ये परमानंद होतो. असेच आपण घडत असतो, घडवले जात असतो आणि आपल्यामध्ये झालेले बदल चांगले अथवा वाईट कधी घडले हे आपले आपल्यालाच कळत नाही.

लहान मुलांवर ज्या घरामध्ये चांगले संस्कार केले जातात, अशा मुलांच्या तोंडी एक दिवस आपण घाणेरड्या शिव्या ऐकतो आणि थक्क होतो की हा मुलगा हे कोठून शिकला. यालाच मी व्हायरस इन्फेक्शन असे म्हणतो. अनेक प्रकारचे लोक आपल्याला दैनंदिन जीवनामध्ये भेटत असल्यामुळे आपल्यामध्ये किंवा लहान थोरामध्ये वैचारिक बदल होत असतात. म्हणूनच की काय भगवान दत्तात्रयांनी ज्ञान प्राप्तीसाठी चोवीस गुरु केले, ज्यामध्ये धरती, आकाश, वृक्ष, सर्प, विंचू इत्यादींचा समावेश होता.

मी साधारण आठवीमध्ये असेन तेव्हांचा प्रसंग. हायस्कूलमध्ये जाण्यासाठी आमच्या घरापासून हायस्कूलपर्यंत त्यावेळी कच्ची सडक होती. परंतु हा लांबचा रस्ता पार करण्याऐवजी आम्ही जवळच्या आडवाटेने जात असू. ही आडवाट भातशेतातून जात असे व त्या करिता शेताच्या बांधावरून जावे लागे आणि बांध फारच बारीक असल्यामुळे सावधपणे चालावे लागे अन्यथा पाय घसरून शेतात निसटणार की ज्यामध्ये पाणी व चिखल असे. मी साधारणतः दहा वाजता या वाटेवरून जात असे व त्याचवेळी समोरून, गांवातील एक वयोवृध्द गृहस्थ म्हादबा येत असे. लोक त्यांना दादू म्हणत. आखूड धोतर, अंगात त्याकाळची बंडी, डोळयावर बारीकसा चष्मा आणि पायात चपला असा त्याचा पेहेराव असे. माझी त्या शेतवाटेवरून जाण्याची आणि दादूची येण्याची वेळ एकच असे.आम्ही शेताच्या बांधावर समोरासमोर आल्यानंतर दोघांपैकी कोणाला तरी बांधावरून खाली उतरून दुसऱ्याला वाट करून देणे आवश्यक होते आणि मी लहान असल्यामुळे मलाच खाली उतरावे लागे,त्यामुळे पाय आणि पायातील चप्पल चिखलात बुडत व तसेच ओले पाय घेऊन चिखलाच्या पायांनी अवघडलेल्या अवस्थेत हायस्कूलमध्ये जावे लागे. कधी कधी अंगावरील कपडयावर चिखल उडत असे. हा उपक्रम संपूर्ण पावसाळाभर चालत असे. म्हादबाची आणि माझी समोरासमोर भेटण्याची वेळ आणि जागा एकच. यामध्ये मुळीच खंड पडत नसे.

म्हादबाला मी समोरून पाहिले की मला आतून खूप चीड येत असे की का म्हणून मीच बांधावरून खाली उतरायचे? मी लहान आहे म्हणून? या माणसाला घरीच जायचे असते. घरी जावून तो पाय साफ करू शकतो. आणि मला तर हायस्कूलमध्ये जायचे असते ज्याठिकाणी अशी कांही सोय नव्हती. दिवसेंदिवस माझ्या मनात म्हादबाबद्दल तिरस्कार चीड आणि संताप वाढू लागला आणि एक दिवस मी निश्चय केला की या माणसाला धडा शिकवायचाच. आज येऊ दे म्हादबाला,आज बांधावरून मी नाही उतरणार तर म्हादबा उतरणार

नेहमीप्रमाणे म्हादबा समोरून आला आणि मी इकडून आलो. दोघेही समोरासमोर उभे. दोघापैकी खाली उतरायला कोणीच तयार नव्हता. बराच वेळ आम्ही दोघेही त्याच अवस्थेत समोरासमोर उभे. कोणीच माघार घ्यायला तयार नव्हता, जणू काय अघोषित युद्धाला सुरवात झाली होती. शेवटी म्हादबा कंटाळला,खाली उतरला व मला वाट करून दिली. जाता जाता शिव्यांची लाखोली वहात निघून गेला की आताच्या कारट्यांना कांही अक्कल नाही, वडील माणसांची कदर नाही,आईबापांनी कांही संस्कार केले नाहीत वगैरे.मी मात्र अतिशय

आनंदात होतो की कसा एका माणसाला सरळ केला आणि ही गोष्ट शाळेतील इतर सहकार्यांना चवीने सांगून आनंद घेत होतो. घरी आल्यानंतर ही गोष्ट मी आणखी कांही लोकांना सांगितली. मला आता इतर कांही सुचत नव्हते. आता दुसऱ्या दिवशीसुध्दा म्हादबाला असाच धडा शिकवायचा असा निश्चय केला.

परंतु दुसऱ्या दिवशी म्हादबाची आणि माझी गांठ पडलीच नाही. तिसऱ्या दिवशीही तेच. मला वाटू लागले की म्हादबा मला घाबरला. परंतु त्यानंतर दोन दिवसांनी पुन्हा एकदा म्हादबा येतांना मी दुरून पाहिले आणि एकदम माझ्या मनात विचारांचे परिवर्तन झाले की आज कित्येक दिवस म्हादबाचा बदला कसा घ्यायचा याचाच विचार करीत होतो. माझे अभ्यासाकडेही दुर्लक्ष होत होते. म्हादबा माझा कोणी शत्रू होता काय? अशाप्रकारे मी त्याच्या अपमानाचा ध्यास घेऊन मी नक्की काय साध्य करीत होतो? याउलट मी माझ्याच दुष्ट विचारांनी वेढला गेलो होतो जेणेकरून मला इतर कांही सुचत नव्हते. म्हादबाचे यात कांहीच नुकसान नव्हते. मी नेहमीप्रमाणे बांधावरून खाली उतरून म्हादबाला जर वाट करून दिली असती किंवा मी जर त्यांना माझी अडचण सांगितली असती तर माझे कांही नुकसान झाले असते का? उलट मोठ्यांचा आदर केल्याचे समाधान मिळाले असते.

आता म्हादबा माझ्या समोरून आला आणि माझ्याकडे ढुंकूनही न पहाता, स्वतःहून बांधावरून खाली उतरला. त्याचवेळी माझा अहंकार गळून पडला व मी स्वतःहून हांक मारली, " दादू, गेले तीन चार दिवस आपण कुठे दिसला नाहीत? "म्हादबा म्हणाला " अरे माझी तब्येतत बरी नव्हती म्हणून घराच्या बाहेरदेखील पडलो नाही. बरे तुझ्या घरी कसे काय ठीक आहे ना? तुझी आई बरी आहे ना? तुझा अभ्यास कसा चालला आहे इत्यादीची बारकाईने चौकशी केली. मी खाली वाकून म्हादबाला नमस्कार केला व म्हणालो " दादू , परवा मी चुकलो, मला क्षमा करा,तुम्हाला दुखवणं माझा उद्देश नव्हता." म्हादबा म्हणाला " तसं नाही रे , माझ्या ते आता मनातदेखील नाही. खरे म्हणजे मीच बांधावरून खाली उतरून तुला वाट करून दिली पाहिजे होती, कारण मला तर घरीच जायचे होते आणि तुला हायस्कूलमध्ये जायचे असते. मलाच ते समजायला हवे होते.

परंतु एक गोष्ट लक्षात ठेव की वडील माणसांचा आदर करायचे कधी सोडू नकोस. वडील माणसे म्हणजे आपल्या नात्यातीलच नव्हे तर समाजामध्ये अनेक कारणास्तव भेटणारी मोठी माणसे आपल्याला जेव्हां जेव्हां भेटतील तेव्हां त्यांचा अनादर करण्याचे मनात देखील आणू नकोस. त्यामुळे तुझे नुकसान तर होणार नाहीच , झालेच तर कल्याणच होईल. कारण, नम्रतेच्या पोटी फळे रसाळ गोमटीं".

आज म्हादबा हयात नाहीत परंतु त्याचे विचार मात्र अविस्मरणीय आहेत.

# चला राजे आपल्याला महाराष्ट्र दाखवतो....

अतूल शिवाजी देखणे

चला राजे आज आम्ही आपल्याला आमच्या नजरेतून महाराष्ट्र दाखवितो..... राग नका मानू राजे पण हा सध्याचा महाराष्ट्र शिवजन्मभूमी दर्शवितंच नाही , कारण ज्या महाराष्ट्रासाठी आपण स्वराज्य स्थापन केलं, हिंदूत्व प्रस्थापित केलं, ... अहो एवढंच काय तर आपल्या धर्मवीर संभाजीराजेंनी हिंदूत्वासाठी स्वत:चे प्राण देखील गमावले आणि अभेद्य , निर्भय असा महाराष्ट्र बनविला. परंतु राजे, आज याच महाराष्ट्राला विदर्भ वेगळा होण्याची भीती आहे, बेळगाव महाराष्ट्रापासून तुटण्याचा धसका घेतला आहे लोकांनी, एवढंच नव्हे तर मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होते की काय अशी खंत वाटू लागली आहे...

म्हणूनच सांगतो राजे , चला आज आम्ही आपल्याला आमच्या नजरेतून महाराष्ट्र दाखवितो.....

राजे वेळेअभावी आम्ही आपणास संपूर्ण महाराष्ट्र तर दाखवू शकत नाही, परंतु महाराष्ट्राचा सारांश नक्कीच दाखवू शकतो...

राजे आपण या महाराष्ट्राच्या रयतेसाठी जे केलेले आहे ते दुसरा कोणताही रयतेचा राजा करणे शक्य नाही. म्हणूनच तर म्हणतात ना " दुसरा शिवाजी होणे शक्य नाही " परंतु सध्या तीच रयत खूप त्रासली आहे. नको - नको त्या प्रकारे तिची पिळवणूक होऊ लागली आहे , कधी महागाई द्वारे, कधी इंधन दरवाढी द्वारे, तर कधी करवाढी द्वारे. सध्या महाराष्ट्रात जवळ - जवळ ३७ टक्के लोकांचा उदरनिर्वाह हा शेतीवर अवलंबून आहे. बिचारा बळीराजा दिवसभर शेतात राब-राब राबतो, मिळेल ते खातो आणि शेती करतो पण तरीही शेवटी तालुक्याच्या बाजारपेठेत त्याची मान टांगलेलीच असते. त्यामुळे सध्या बळीराजाला नामुष्कीचे जीवन जगावे लागत आहे . जर राजे आपण बळीराजांच्या आत्महत्तेची सरासरी पाहिली तर दर महिन्याला एक बळीराजा आत्महत्या करत आहे असे दिसून येईल. सध्याची हि परिस्थिती पाहता बळीराजाचं राज्य पुन्हा येईल असं वाटत नाही. कारण बळीराजाच्या आत्महत्ये मागील कारण पाहायला कोणीही तयार नाही....

**चला राजे प्रतापगडावर जाऊया, अफजलखानाचा कोथळा पुन्हा एकदा पाहूया.......**

आपल्या वेळी गडांचे खूप महत्व होते, असे गड पुन्हा उभे करणे कदापि शक्य नाही. परंतु येथील लोकांना या ऐतिहासिक वास्तूंचे जराही मोल नाहीये. आज जर आपण कोणतीही ऐतिहासिक वास्तू पाहाल तर त्याच्या जवळ - जवळ सर्वच भिंती या तरुण - तरुणींच्या नावाने रंगवलेल्या दिसतील. ज्या कड्यांवर आपले मावळे भर उन्हा-पावसात जीव मुठीत घेऊन लढले, आज त्याच कड्या-कड्यांवर तुम्हाला जोडपी दिसतील, हातात-हात, गळयात-गळे, नको-नको ती दृश्ये पाहायला मिळतील. कोण समजवणार त्यांना या ऐतिहासिक वास्तूचं महत्व??? म्हणजे आता महाराष्ट्रातील लोकांनाच येथील इतिहासाची जाणीव करून द्यायची वेळ आली आहे .....

**चला राजे आपणांस प्रत्यक्षात आपली राजधानी दाखवतो.....**

या राजे हा पहा आपली राजधानी असलेला " रायगड किल्ला " जो हिरोजी इंदूलकरांनी जीवाची परिकाष्टा करुन अभेद्य असा फौलादी किल्ला बनविला. हे पहा राजे हिच ती जागा आहे ज्या ठिकाणी कोणताही शाब्दिक संवाद साधला असता तो थेट दुसऱ्या बाजुला आपल्या कानी येवु शकतो... अशी खूप काही वैशिष्टे सांगणारा हा किल्ला आहे... अशा या महाराष्ट्राच्या किंवा छत्रपतींच्या मुख्य इतिहासाची जाणीव करून देणाऱ्या किल्ल्याची सध्याची परिस्थिती खूप बिकट आहे . .. अहो ज्या इंदूलकरांनी आपल्या पवित्र चरणांची धूळ त्यांच्या मस्तकी लागावी म्हणून ज्या पायरीवर स्वतःचे नाव कोरले होते आज त्याच पायरीवर नको - नको त्या चरणांची धूळ चढली आहे. गडांच्या पायथ्याशी आज रेव पार्ट्या चालतात....

अहो राजे रायगडच काय, पण महाराष्ट्रातील जवळ - जवळ सर्वच गडांसाठी आपण आणि आपल्या मावळयांनी रक्ताची थारोळी केली आणि आज त्याच गडांवर आणि त्यांच्या पायथ्याशी आपणास दारूचे शिंतोडे उडालेले दिसतील, रिकाम्या झालेल्या बाटल्या सर्वत्र दिसतील, अहो राजे अजूनही बरेच काही दिसेल जे आपल्याला पहावणार नाही आणि आमच्याकडून दाखविले जाणार नाही. सध्या महाराष्ट्रात शिवजयंती खूप उत्साहात साजरी केली जाते. कारण त्या दिवशी माता जिजाऊंनी या महाराष्ट्राला एक अनमोल रत्न दिले त्या रत्नानेच पुढे हा संपूर्ण महाराष्ट्र घडविला. त्याच रत्नाला आज लोक छत्रपती शिवाजीराजेंच्या नावाने ओळखतात. परंतु त्याच शिवजन्मावरून आजही लोक भांडतात आणि राजे आपली जयंती वर्षातून दोन वेळा साजरी करतात.

राजे आपल्या वेळी आपले मावळे ' हर - हर महादेव ', ' छत्रपती शिवाजी महाराज की जय ' अशा आरोळ्या देत गड काबीज करायचे. परंतु त्यांच्या या आरोळ्या स्वराज्यासाठी, या रयतेच्या राजासाठी आणि महाराष्ट्रासाठी असायच्या. तशी शिवशाही आजही या महाराष्ट्रातील लोकांमध्ये जिवंत आहे. आजही ' शिवाजी महाराज की जय ' या जय घोषाणेच लोक पुढे जातात, परंतु ते सर्व महाराष्ट्रासाठी किंवा मराठी माणसासाठी नव्हे तर हा जयघोष असतो स्वतःची पोळी भाजण्यासाठी. या लोकांनी आपल्या नावाचा पुरेपूर फायदा घेतला आहे... जाऊ द्या राजें या लोकांवर बोलावे तितके कमीच आहे, कळेल आपणास पुढे - पुढे...

**चला राजे आपण महाराष्ट्राची राजधानी पाहायला मुंबईला जाऊया....**

ऐकलंत राजें आपल्या नावाची साद कानी येत आहे... याचाच अर्थ की आपण मुंबई मध्ये पोहोचलो आहोत. मुंबईमध्ये एक गोष्ट आपणास प्रामुख्याने व प्रकर्षाने दिसून येईल ती म्हणजे मोठ - मोठया शुभेच्छांच्या पडदयांवर राजकीय नेत्याची छायाचित्रे दिसतील आणि त्याच पडद्यावर एका कोपऱ्यात आपलीही छोटीशी प्रतिमा असेल ... आणखी एक गोष्ट दिसेल ती म्हणजे येथे " मराठी भाषिक कमी आणि हिंदी भाषिक धनी " असे समीकरण आहे. येथील लोकांना मराठीचा विसर पडत चालला आहे राजे. हल्ली येथील मराठी तरुण - तरुणी चक्क हिंदी किंवा इंग्रजीमधून संवाद साधतात. खरी गंमत अशी आहे की या व्यक्ती धड व्यवस्थित हिंदीही बोलू शकत नाहीत आणि मराठीही नाही. पण राजे एक गोष्ट मात्र येथे आपणास चांगली पाहायला मिळेल जेणे करून आपले मन समाधानी होईल की कुठेतरी या महाराष्ट्राचा, मराठीचा वारसा अजूनही येथे जिवंत आहे....आणि ते

म्हणजे येथील सर्व दुकानांच्या पाट्या आपल्याला मराठीतूनच दिसतील..... अहो मध्यंतरी तशी सक्तीच केली गेली होती महाराष्ट्रात ....

अजूनही बरेच काही दाखविण्यासारखे आहे, परंतु वेळेचे महत्व जाणून घेता आपल्याला आज इथेच थांबावे लागणार आहे...

राजें आम्ही आपणास एक विचारू इच्छितो की आम्ही आपल्याला हा जो महाराष्ट्र दाखविला, परंतु अजूनही आपण गप्पच का??? आपणास काहीच बोलायचं नाही का या सध्याच्या महाराष्ट्राबद्दल ????

“ हे पहा ' अतुलराजे ' सध्याचा महाराष्ट्र पाहता हा महाराष्ट्र आम्हाचा राहिलेलाच नाही असे दिसून येते. ज्या महाराष्ट्रासाठी आमचे मावळे म्हणजे शूरवीर तानाजी मालुसरे , बाजीप्रभू देशपांडे आदींनी आपल्या प्राणांची आहूती दिली ती काय हा असा महाराष्ट्र घडवण्यासाठी??? आज आमच्या नावाचा जयजयकार करतात तोही महाराष्ट्राच्या नव्हे तर स्वतःच्या स्वार्थासाठी??? येथील ऐतिहासिक वास्तूंचा महाराष्ट्राचा इतिहासाशी असलेला संबंध या लोकांना माहित नाही ??? या अशा महाराष्ट्राला तुम्हीच सर्वजण जबाबदार आहात... कधीही कोणताही राजा हा एकटाच राज्य करत नसतो, तर हि रयत सुध्दा त्याच्याबरोबर राज्य करत असते. त्यामुळे या सर्व गोष्टींची जाणीव या दोघांनाही असायला हवी... दोघांनीही जर आपापली कर्तव्ये चोख रित्या पार पाडली तर नक्कीच पुन्हा बळीराजाच राज्य येईल.... चला 'अतुलराजे' आमची परतण्याची वेळ झालीये ”...

जाता - जाता एकच सांगतो ' अतुलराजे ' ज्या पद्धतीने तुम्ही आम्हाला हा महाराष्ट्र दाखविला आहे त्याच पद्धतीने पुन्हा एकदा येथील राज्यकर्त्यांना दाखवा. आम्हाला खात्री आहे ते लोक हा " शिवकालीन महाराष्ट्र तुमच्या नजरेतून नक्कीच पाहतील "....... !! जय महाराष्ट्र !!

# ❋ असा साजरा होतो आपल्याकडे प्रत्येक सण

✍ पूजा गद्रे आणि प्रथमेश सुरेश शिरसाट

आपल्या भारतीय संस्कृतीत विविध सण, समारंभ, सोहळे, व्रत-वैकल्ये, पूजा-अर्चा केल्या जातात. पण याच विविधतेने नटलेल्या सण- समारंभांच्या गोष्टींना, व्यावसायिक रूप आले. तो सण अगदी गणेशोत्सव असो, गुढी पाडवा असो किंवा दहीहंडीपासून रक्षाबंधनपर्यंत आणि नवरात्रीपासून ते दसरा-दिवाळीपर्यंत प्रत्येक सणाला व्यासायिक रुप आलेले आहे. गुढी पाडव्याला नववर्ष स्वागत यात्रा ठिकठिकाणी आयोजित केल्या जातात, या स्वागत यात्रांमध्ये परंपरा आणि संस्कृती जपण्यासाठी बरेच कार्यक्रम आयोजित केले जातात. पण आजची तरूणाई मात्र याकडे सपशेल पाठ फ़िरवून आपल्याच हुल्लडबाजीत मग्न असल्याचे चित्र हल्ली दिसते. सगळेच जणं असे करत नसले तरी हुल्लडबाजी, मौजमस्ती आणि सण यांची एक वेगळी सांगड घालून मजा लुटणाऱ्यांचे प्रमाण आजच्या युगात वाढत चालले आहे. नववर्ष स्वागत यात्रा म्हणजे फक्त पारंपारिक पोषाख घालून मिरवणे इतकेच नसते याची जाण आजच्या पिढीला असणे आवश्यक आहे. वटपौर्णिमेला तर वडच्या झाडांची कत्तल होते अक्षरश:, वटपौर्णीमेला झाडाजवळ जाऊन पूजा करणे जमंत नसेल तर निदान पूजा करू नका, पण ते वडाच्या झाडाची फ़ांदी तोडून त्या झाडाला विवस्त्र करून घरी फ़ांदी पूजा करण्यात काय तथ्य आहे? अशाने तुम्ही तुमची परंपरा जतन करता का? मंगळागौर सुद्धा हल्ली कॉर्पोरेट झाली आहे, बसफ़ुगडी आणि गाठोडं ही नावं उच्चारली तरी आजकालच्या बऱ्याचशा मुलींच्या भुवया उंचावल्या असतात. मंगळागौरेचे पावित्र्य सर्रास डावललं जातं. दहीहंडीच्यावेळी बॅनरबाजी हमखास दिसते, विविध सेलीब्रिटीजची हजेरी आणि त्यांना बघण्यासाठी आलेले लोकं यांत गोविंदा पथकांच्या हंड्या फ़ोडण्याकडे तितकेसे लक्ष दिले जात नाही, मग दहीहंडीचे महत्त्व काय उरले? त्यात हल्ली थर वाढवून दहिहंडीतही स्पर्धा करण्यात येते, एखाद्याचा जीव त्या १०-११ व्या थरावरून खाली गेला तर कायमचा जीवानिशी जातो हे कसे लक्षात येत नाही या दहिहंडी आयोजकांच्या? गोविंदापथकेसुद्धा हल्ली दहिहंडी या सणाकडे फ़क्त एक स्पर्धा आणि जास्त पैसे कमवण्याचे माध्यम म्हणून बघतात. भारतीय संस्कृतीतील सणांचे आपणंच आपल्या हाताने रुपडे पालटून टाकलंय. नुकताच गौरी, गणपतीचा सण झाला. यावेळी गणपती साठी कोणते डेकोरेशन करायचे, कोणती आरास करायची याचा लोक विचार करू लागतात. बऱ्याच मंडळांनी तर चलतचित्रांसाठी विविध वस्तूंचा समावेश केला. निरनिराळ्या माळा, लाईटिंग, फुले, थर्माकोलची रेडीमेड मंदिरे, बाजारातही मोठ्या प्रमाणात उपलब्ध होती. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या ठिकणी जागरणं करायची म्हणून बाप्पासमोरच पत्त्यांचा फ़ड लावला जातो. लोकं गणपतीचे विसर्जन अगदी थाटामाटात करतात अगदी पारंपारिक लेझीम पासून ते अत्याधुनिक डीजे पर्यंत, बाप्पाला डीजेतील गाणी कितपत समजतात ते बाप्पाच जाणो. सार्वजनिक ठिकाणीसुद्धा गणपतींच्या आरत्या, इतर आरत्या, भक्ती गीते सोडून, हल्लीची मुन्नी-शीला-जलेबी बाई सारखी गाणी वाजवली जातात आता या गाण्यांचा आणि बाप्पाचा काही संबंध आहे का ? बरं मिरवणूकीत नाचतांना बरीच मंडळी दोन पेग दारू ढोसून किंवा मावा,तंबाखू-गुटख्याच्या पुरचुंड्या तोंडात कोंबून बेफ़ान नाचतात आणि बिचारा बाप्पा असल्या नर्तनकारांचे तमाशे उघड्या डोळयने नुसता पहात बसतो. याला काय म्हणायचे कहरच ना? ज्या गणपतीची आपण मनोभावे पूजा करतो, त्याचे आपण विसर्जन करतो, त्याच नदीमध्ये/ तलावामध्ये आपण निर्माल्य, कचरा टाकतो, आणि हे सारे त्याच दिवशी. आणि त्याच नदी तलावात धुणीभांडीपासून ते शौचापर्यंतचे सगळे विधी पार पाडले जातात

मग हा बाप्पाचा अपमान नाही का ? त्यापेक्षा एको फ्रेंडली गणेशमुर्ती करून त्यांचे कृत्रीम तलावांत विसर्जन केल्यास किती बरे होईल नाही. या प्रकल्पांना यश आले तर गणेशोत्सव काळात होणारे जलप्रदूषण नक्कीच कमी होईल.

आता गौरी गणपती झाली, आता पुढे काय तर नवरात्र. नवरात्रीतही भक्तीदर्शन कमी आणि शक्तीप्रदर्शन जास्त असते, सगळया देवी भक्तांना शुभेच्छा देणारे बॅनर झळकलेले दिसतात, त्यावर देवीच्या भव्यदिव्य मुर्तीसोबत स्थानिक प्रभागातील सदस्यांचे किंवा राजकीय पुढाऱ्यांचे स्वागत करणारे असे बॅनर नक्की देवीच्या भक्तांचे स्वागत करत आहेत की आपण कोण आहोत याचे प्रदर्शन करत आहेत हेच नेमके कळत नाही. गरबा, दांडीयारास यांसारख्या रुढींचा हल्ली मनोरंजन म्हणूनच वापर होत असल्याचे चित्र डोळयांसमोर दिसत आहे . पूर्वी चनीया-चोली, घागरा या पारंपारिक पोषाखात खेळला जाणारा प्रकार हल्ली मुली जीन्स, स्कर्ट मधे खेळण्यात धन्यता मानतात, मुलांच्या बाबतीतही काही वेगळे नाही (हे वाचून बरेच जणांना वाटेल की हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे, पण ज्या त्या सोहळयाचे पावित्र्य, त्याचे वेगळेपण जपले गेले पाहिजे असे मला प्रामाणिकपणे वाटते). हल्ली दांडियारास किंवा गरबा जिथे होतो तिकडे पोलिसांची गाडी हमखास असते किंवा गस्त आते याचे कारण म्हणजे गेल्या काही वर्षांत वाढत या गरब्यामध्ये आणि दांडियारासमध्ये वाढत चाललेले गुन्हेगारीचे प्रकार. भोंडला हा प्रकार म्हणजे नक्की काय हे आताच्या पिढीला माहितंच नसते, काही ठिकाणी स्त्रिया हा सोहळा साजरा करतात म्हणा. दसऱ्याला पाटीपूजन करण्याऱ्यांची संख्या अगदी हातांच्या बोटांवर मोजण्याइतकीच उरलेली आहे. दसऱ्याच्या दिवशी शमीची (आपट्याची पाने /सोने) पाने देण्यासाठी त्या झाडांच्या जीवांशी खेळण्याचा आपल्याला कोणी दिला याचा किंचितसा विचारसुद्धा कोणी करत नाही. सण म्हटले की फ़क्त नवीन कपडे, शॉपिंग आणी मज्जा (एन्जोयमेण्ट) इतकेच हल्लीच्या पिढीला अवगत आहे! शास्त्रशुद्ध सण साजरे करण्याची प्रथा हळूहळू लोप पावत चालली आहे. दसऱ्याला पाटिपूजन करण्याची प्रथा तर आता फ़क्त कालबाह्य व्हायची तितकी शिल्लक आहे, आम्हाला फ़क्त सिमोल्लंघन आणि लंकादहन , आणि शमीची म्हणजेच आपट्याची पाने सोने म्हणून द्यायची ते सुद्धा झांडाना विवस्त्र करून ! काय मिळते तुम्हाला ?

दसऱ्यानंतर मग दिवाळी.... दिवाळी म्हणजे बाजार खचाखच भरलेला... अगदी तुठ्पेस्त पासून दागिन्यांपर्यंत नवीन वस्तू विकण्यासाठी बाजारात येतात. फराळ हा दिवाळीचा मोठा मेनू असतो. हल्लीच्या दगदगीच्या जीवनामध्ये तो ही करायला वेळा नसल्यामुळे बाजारात उपलब्ध असतो. मग काय, दिवाळीत पाहुणे घरी येतात, मजा-मस्ती होते. आयुष्यातील थोडा काळ लोकं आपले विचार, काळजी बाजूला ठेवतात. फटाके फोडतात, मिठाई खातात. अगदी मनमुराद आनंद लुटतात. दिवाळीच्या दिवशी पाहाल तर, लोक विचार न करता, फटाके फोडतात, कोणते फटाके फोडल्यावर प्रदूषण कमी होईल किंवा जे फ़टाके पर्यावरणाला कमी हानिकारक आहेत असेच फ़टाके फ़ोडले पाहिजे.फ़क्त आपलाच विचार आपण करू नये

लहान मुलांना ते फ़टाके फ़ोडता येतील का ? याचा विचार होत नाही, मग अपघात होतात. बाकीच्या बाहेरच्या वस्तू लोक आवडीने खरेदी करतात, पण त्या किती उपयुक्त व चांगल्या आहेत हे पाहत नाहीत. मग त्याचा तोटा नंतर दिसून येतो. खरं तर दिवाळी हा सण प्रत्येकाच्या घरी नवीन प्रकाश देण्यासाठी येतो. मुलं-मुली नवीन कपडे खरेदी करतात. घरातील सगळेच नवीन ड्रेस घालून आनंद लुटतात. एक गोष्ट सर्वांनी लक्षात

घेतली पाहिजे, कि आपण खरच हे सण नीट साजरे करत आहोत ना ? यामुळे समाजाला, आपल्या आजूबाजूला असणाऱ्या लोकांना याचा त्रास तर होत नाही ना ? हे सर्वांनीच, अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत लक्षात घेतले पाहिजे. त्याची अंमलबजावणी हि केलीच पाहिजे. आपण आपला आनंद पाहतो तसाच इतरांचा पाहणे हे आपले कर्तव्य आहे. इतरांनाही आपला आनंद अनुभवता आला पाहिजे आपला काही त्रास होता कामा नये.

आपल्या पिढीकडून पुढील पिढीकडे आपले सण, सोहळे यांचा वारसा जसाच्या तसा हस्तांतरित व्हायला हवा नाही का ? नाहीतर पुढची पिढी आपली संस्कृती कशी जपेल ? बघा ! तुम्हीच विचार करा !
चला तर मग आपण यावेळी ठरवूनच टाकू की, कोणताही सण हा केवळ आपल्या, व इतरांच्या, समाजाच्या, पर्यावरणाच्या, आनंदासाठी साजरा करायचा. तसेच विविध सामाजिक उपक्रम करून किंवा नवीन योजना करून या सणात आपण वेगेळेपणा निर्माण करून इतरांना हि आनंद देऊ शकतो.
चला तर मग या दिवाळीला दिवाळे न काढता दिव्य प्रकाशात आणू या.... शुभ दीपावली

# ✵ सखी

✍ सुपर्णा कुलकर्णी



या वेळी ती आली तेंव्हा तिच्या हातात सखी होती. लिफ्ट मधून ती हळू हळू एक एक पाऊल टाकत सखीच्या आधाराने पुढे आली. मला बघुन प्रसन्न हसली. तिचा चेहेरा नेहेमीसारखाच आनंदी आणि समाधानी .मी म्हटले, " काय गं? या वेळी सखीला आणलेस?" ती मागे पुढे पाहून विचारती झाली, " कोण कुठली सखी?" मग मला गालातल्या गालात हसताना बघून तिला कळले की ही नक्कीच फिरकी घेत आहे. तिच्या दुसऱ्या हाताला मी घट्ट धरले. तिने सुद्धा आपल्या शरीराचा डुगडुगणारा भार माझ्या वर निर्धास्त पणे टाकला अन घरात शिरली. तिला नमस्कार करतांना तिच्या हातातली सखी बाजूला विसावली. अगं मी तुला आधार देणाऱ्या काठीचे नांव सखी ठेवले असे म्हणताच, ती पोट धर धरून हसायला लागली. मला म्हणाली ," तुझं आपलं काहीतरी वेगळंच असतं"

मागच्या वेळी ती आली दुःखाचे कढ सोसतच. मुलाची नोकरी गल्फ मधे असल्याने यांच्या भारतात येणाऱ्या विमानाच्या वेळा रात्री अपरात्री असतात. एकदा ती आली त्यावेळी मी तिला अशीच सामोरी गेले . एका बाजूने तिला तिच्या मुलाने आधार दिला होता, दुसऱ्या हातात आधार द्यायला गेले तर ती ओरडली, " नको नको हाताला स्पर्श सुद्धा करू नकोस" . माझ्या चेहऱ्यावरचे प्रश्न चिन्ह तिच्या मुलाने सोडवले. बाथरुम मधे पाय घसरून पडली. या वयात हाडे ठिसूळ झाली आहेत त्यामुळे फ्रॅक्चर झाले आहे. त्यांच्या रहात्या देशात तिच्यावर उपचार करणारे डॉक्टरच उपलब्ध नव्हते त्यामुळे अपघात घडल्यावर दहा दिवसा नंतरच तिला भारतात आणावे लागले. गेले दहा दिवस ती असे दुःखाचे उमाळे सोसते आहे. फ्रॅक्चर चे दुखणे कसे असते ते वेगळे सांगायला नको. त्यावेळी तिला सांभाळण्याची भितीच वाटू लागली. चुकून धक्का लागला तर?

तशी ती एकदम टापटीपीच्या राहणीची. पराकोटीच्या शिस्तीची , परंतु या वेळी मात्र सगळे मला करून द्यावे लागले, याचे एकीकडे दुःखही वाटत होते, अन तिची सेवा करायला मिळते आहे म्हणून आनंदही.

माझं लग्न होऊन मी घरात आले तेंव्हा हिच्या बद्दलच्या अनेक दंतकथा मला ऐकायला मिळाल्या होत्या. तिला स्वच्छतेची शिस्तीची नियोजनबद्धतेची भारी आवड होती. तिच्या जगण्याची शैलीच निराळी . अगदी स्वयंपाक घरापासून तर थेट दिवाणखान्यपर्यंत सारे काही धुतलेले स्वच्छ! स्वयंपाक करताना पातेली किंवा कढई गॅस वर ठेवायच्या आधी ते स्वच्छ धुवून घ्यायचे हा तिचा कडक नियमच होता म्हणा ना! तिला कितीही चांगली

मोलकरीण आणून दिली तरी तिच्यावर हिचा कधीच विश्वास बसला नाही. चहा घेण्याची कपबशी, जेवणाचे ताट, वाटी पेला आधी विसळायचे नंतरच वापरायचे. एवढेच काय आंघोळीची बादली , लोटी, ती सुद्धा आंघोळी आधी घासून मगच वापरायची त्यामुळे कपाच्या कानाला सुद्धा मळ रहाण्याची काय बिशाद? कधी कधी तिच्या या किचकटपणा चा कंटाळा यायचा, पण तिची कधीही कुणा विरुद्धही तक्रार नसायची. एवढे सगळे स्वच्छतेचे पुराण संपून तिला जेवायला दुपारचे दोन वाजायचे. त्या नंतर जरावेळ आराम केला की बाईसाहेब तेवढ्याच आनंदाने रात्रीच्या स्वयंपाकाला लागायच्या.



तिचे लग्न झाले तेंव्हा घराचा मोठा पसारा होता. सासू -सासरे, दीर- जावा, असा मोठा कुटुंब-कबिला. सुरुवातीला स्वच्छतेचा वसा जपताना हिला बरेच जड गेले. पण हळू हळू साऱ्या घरानेच हा वसा घेतला. हिचे आपले असेच, ज्याच्या संपर्कात जाईल त्याला हा वसा दिल्या शिवाय सोडणार नाही. आणि आश्चर्य म्हणजे घेणारा सुद्धा आनंदाने त्याचा स्वीकार करतो. सुरुवातीला एकत्र कुटुंबात नांदतांना खूप कष्टात दिवस काढावे लागले. परंतु आपपरभाव तिच्या मनाला कधीच शिरला नाही. हिला स्वतःला चार मुली एक मुलगा असे एकूण पाच अपत्ये, दीराचे पाच नणंद ची किंवा हिच्या बहिणीची मुलं सतत शिकायला घरी असायची. उन्हाळयात सर्व मुलांना दोन दोन जोड करायचे असले की सगळयांसाठी मोठे ठाण आणले जायचे. बँड पार्टी सारखे सगळया मुलींचे एकसारखेच फ्रॉक्स आणि मुलांना एकसारखेच शर्ट्स! घरात जे शिजवले जाई ते सर्व मुलांना गोलाकार बसवून वाढायचे. त्या काळी वीज नव्हती, त्यामुळे कंदीलाचा वापर असायचा. हिला शौचालयातला कंदील घरात आणलेला चालत नसे त्यामुळे चुकून एखाद्याने आणलाच तर .' ए.. काकूला आवडत नाही ' असे म्हणून भाचे मंडळी एकमेकाला सावरत असे कारण त्यावरची शिक्षा मोठी कडक होती.

स्वच्छतेच्या या वेडापायी हॉटेल नावाच्या विश्वाची हिला अत्यंत घृणा होती. त्यामुळे तिथले पदार्थ तिला वर्ज्यच! पण हिच्या यजमानांना म्हणजे भाऊसाहेबांना कधी कधी ते आवडायचे. त्यामुळे त्या वेळी घडलेले एकेक गमतीदार किस्से ती स्वतःच हसून हसून सांगते, " अगं लग्न झाल्यावर पंधरा दिवसांनी ह्यांनी मोठ्या आवडीने मला हॉटेल मधे नेले" एवढ्या वर्षानंतर सुद्धा तिची स्मृती पक्की आहे. त्यावेळी कोणता पदार्थ मागवला हे सुद्धा ती सांगते. मग आम्ही तिला उत्कंठेने विचारतो ," अगं तो चमचा, ताटली न धुतलेला होता तू कसे खाल्लेस?" मग ती म्हणते ," मी दुसरी ताटली नी चमचा धुवुन मागवला आणि तेच पदार्थ त्यात ओतले आणि कसे बसे गिळले. त्यानंतर बाईसाहेब दोन दिवस आजारी! भाऊ साहेबांना पुन्हा हिला हॉटेल मधे नेण्याची हिंम्मतच झाली नाही. त्यामुळे कोणताही पदार्थ नवऱ्याला आणि मुलांना घरातच करून खाऊ घालायचा त्याचा मात्र तिने कधीच कंटाळा केला नाही.

एका गोष्टीसाठी मात्र हिचे गाडे अडायचे. तो म्हणजे उसाचा रस! हा उसाचा रस तिला अत्यंत प्रिय होता, तो मात्र तिला घरी काही करता येत नव्हता. या उसाच्या रसाचा एक मोठा मजेदार किस्सा आहे. एकदा हिला उसाचा रस प्यायची अनिवार इच्छा झाली . दारावरून रोज एक रसवाला जायचा . ही त्याच्याकडे नुसतीच

बघायची. शेवटी एक दिवस त्याला बोलावले, घरातल्या सर्वांना पुरेल एवढा रस दे असे त्याला फर्मावले. त्यालाही बरे वाटले. रोज नुसतीच बघते आज रस घ्यायला तरी तयार झाली. त्याने रस काढायची तयारी केली. तसे तिने याला थांबवले आणि विनंती केली ," उस , रसाचे यंत्र, आमच्या घरातल्या पाण्याने आम्ही धुवून देऊ रस गळायला तुझा कपडा न वापरत आम्ही देऊ तो घ्यावा लागेल. तुझ्या काचेच्या पेल्याने रस न मोजता आमच्या घरातल्या पेल्याने तो मोजावा लागेल.रस काढण्या पूर्वी मी जो साबण देईन त्याने तुला हात धुवावे लागतील. अबब .. केवढ्या या अटी! तो बिचारा थोडावेळ भांबावला पण दुसऱ्या क्षणी ठीक है माईजी हम आपके लिये ये सब करेंगे म्हणत मान्य केले. हा किस्सा ऐकल्यावर आम्ही पोट धरधरून हसलो, शेवटी तिला म्हंटले." अगं, एवढे केलेस तर त्या रसवाल्याला देखील आंघोळ घालून द्यायची होती. त्यावर ती भाबडेपणाने म्हणते, तसे वाटले गं, पण ते माझ्या हातात नव्हते.

नुसते खाण्यापिण्याच्या बाबतीतच नाही, तर कपड्यांच्या स्वच्छतेच्या बाबतीतही ती तेवढीच काटेकोर आहे. तिला स्वतःचा पेहराव पांढरा स्वच्छ असेल. त्यामुळे नऊवारी पासून तर घरातल्या प्रत्येकाच्या कपड्यांपर्यंत सारेच स्वच्छ! नुसते स्वच्छ नाही तर अगदी इस्त्री केल्या सारखे याचेही कोडे उलगडले. दुपारी गप्पा मारतांना नऊवारीच्या जरीच्या काठांना ती हळू हळू हाताने बारीक घड्या घालून ठेवत असे, त्यामुळे ते अगदी इस्त्री केल्यासारखे होतात. लहानपणापासूनच समिती ची स्वयंसेविका असल्याने जिद्द , चिकाटी , कष्ट या गुणांचे बाळकडू मिळाले होते. त्यामुळेच भाऊसाहेबांचा तोकडा पगार असूनही संसाराला जुकतीने सांभाळले.


तिच्या या स्वच्छतेच्या वेडामुळे आपला कुणालाही त्रास होऊ नये या भावनेतून ती नातेवाईकांकडे जाण्याचे टाळते. परंतू एकदा एखाद्या व्यक्तीने तिचा विश्वास संपादन केला की त्याच्यावर खूश असते. अशा भाग्यवान व्यक्तींपैकी मी ही एक आहे. माझ्याशी ती मनमोकळेपणाने बोलते. तिला वाचनाची आवड आहे. अगदी फडके खांडेकरांच्या कादंबऱ्या पासून तर नातवाच्या हॅरी पॉटर पर्यंत सारेच काही तिने वाचले आहे. अशाच एका भेटीत तिने आयुष्यात काय काय कमावले याची बेरीज आनंदाने सांगितली तर ऐन तरुण लग्न झालेल्या मुलीला गमावल्याची वजाबाकीही ही सांगितली. वरवर कठोर वाटणारी ही अंतरीची मात्र प्रेमळ आहे. तिची नी माझी नाळ जुळली ती साहित्याच्या आवडी मुळे.आली की लगेच म्हणते, तुझी नवीन कविता ऐकव. नी त्यावर समीक्षाही करते. या वेळी आली नी मला म्हणाली , माझा चेहेरा नीट बघ, काही वावगं दिसतंय तुला? मी म्हंटले नाही, तो तसाच आहे , गोड हसरा. फक्त त्यात गोजिरवाण्या सुरकुत्यांची आणखीन भर पडली आहे एवढेच. तर म्हणाले, अगं. मी पुन्हा खुर्चीवरून तो जाऊन पडले नाकाच्या हाडाला धक्का बसला हाताची दोन बोटे फ्रॅक्चर झाली आणि खांद्याचा सांधा निखळला. जातांना मला हातात साडी दिली मी म्हटले, अगं तुझे आशीर्वादच पुरे, हे कशाला?" तर म्हणाली, " माझ्या सहस्त्रचंद्र दर्शनाच्या वेळी इतकी सुरेख कविता केलीस त्याबद्दल हे बक्षिसं."

हिचे नी माझे नाते सासू-सुनेचे, वय वर्षे ८५, तरीही हिचा एकेरी उल्लेख एवढ्याच साठी की ती सासू पेक्षाही जिवाभावाच्या मैत्रिणी सारखी माझी सखी!

# नतमस्तक

महेंद्र कुलकर्णी

दिवाळी म्हंटलं की  फटाके, मस्त पैकी फराळाचे पदार्थ, दिवाळी अंक, सुट्टी वगैरे आठवायला हवे, पण हल्ली, दिवाळी आल्याची चाहूल मला ज्या गोष्टीमुळे लागते ती म्हणजे शारिरिकदृष्ट्या अपंग पण मानसिक दृष्ट्या सबल असलेल्या मुलांमुळे.




गेली काही वर्ष दिवाळीच्या साधारणपणे पंधरा दिवस आधी दरवर्षी मला एक पत्र येतं, सोबत काही ग्रिटींग काड्र्स असतात. ते पत्र वाचलं, आणि सहा कोरे ग्रिटींग काड्र्स पाहिले, की मला उगाच आपली स्वतःचीच लाज वाटते, आणी सरळ चेक बुक बाहेर काढून एक चेक लिहिणं सुरु करतो.

समाजात सध्या खूप जास्त प्रमाणात कॉंपिटीशनचे वातावरण आहे. प्री प्रायमरी स्कुल ते अगदी कॉलेज किंवा नंतर नोकरीमध्ये पण नुसती कॉंपिटीशन आहे. अशा जगात रहायचं तर मग नक्कीच आपणही या वेगाशी जुळवून घ्यावच लागतं... आणि तसे झाले नाही, आणि आपण कुठे कमी पडलो, की  लहानशा गोष्टींमुळे आपण  इतके निराश होतो की पुढे बरेचदा वैफल्य येते, आणि त्यातून आत्महत्येचे विचार मनात येतात. अहो, जगण्यातला आनंदच गमावून बसतो आपण! हे असं वैफ़ल्य येण्यासाठी काहीही कारण चालतं. नोकरीमध्ये वार्षिक इनक्रिमेंट अपेक्षेपेक्षा कमी मिळाले, परिक्षेत मार्क्स कमी पडले,  गर्लफ्रेंडने लग्नाला नाही म्हंटले, अशा असंख्य लहान सहान गोष्टींसाठी जीवनातला आनंद गमावून बसतो आपण. तसा विचार केला तर या सगळ्या गोष्टी जरी मिळाल्या नाही तरीही काही फारसा फरक पडत नाही. पण मानवी स्वभावाला औषध नाही.

थोडं असंबद्ध वाटतंय का? शक्य आहे, विचारांचा गुंता इतका जास्त झालाय की मला काय लिहावे हे म्हणण्यापेक्षा कसे आणि कुठल्या सिक्वेन्स ने लिहावे हिच गोष्ट  समजत नाही. बरेचदा सिग्नल वर शारिरीकदृष्ट्या अपंग मुलं आपण पहातो. बरेचदा त्यांच्या कडे दुर्लक्ष करतो, की ते या आपल्या सुंदर जगात नाहीतच म्हणून त्यांचे अस्तित्त्व नाकारतो... किंवा कधी तरी  जर आपला मुड असला तर,खिशातला एक दोन रुपयांचे नाणे काढून त्याच्या पसरलेल्या हातावर ठेवतो. पण ....

एक आठवड्यापूर्वीची गोष्ट आहे, पेपर मधे एक बातमी वाचली, " तिस वर्ष वयाच्या एका आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या तरूण आणि तरूणीने आत्महत्या केली. ते दोघंही म्हणे चांगल्या नोकरीवर होते, सगळं जग पाहून झालं होतं, पुढे काय करायचं? पण तरिही त्यांनी गोव्याला एका खोली मधे गळफास लावून आत्महत्या केली

होती. या घटने मुळे थोडा नर्व्हस झालो होतो. जगातली प्रत्येक ऐहीक सुखाची गोष्ट जवळ असताना पण का म्हणून त्या दोघांना जीव द्यावासा वाटला असेल? असो विषयांतर होतंय, पण याच पार्श्व भूमीवर मला आलेले नदीम शेख चे पत्र मला एकदम अंतर्मुख करून जाते.

नदीम शेख! दोन्ही हात नसलेला हा एक मुलगा. पत्रामधे लिहितो, की "बरेच लोकं काही कारणाने जन्मापासून किंवा काही आजाराने आपले हात वापरू शकत नाहीत. हात वापरता येत नाहीत, म्हणून आपल्या पायाच्या बोटात ब्रश धरून किंवा तोंडात ब्रश धरुन अशी मुलं पेंटींग करतात.ह्या अशा सहा पेंटींगचा एक संच आणि सोबतच गिफ्ट वर लावण्यासाठी कार्ड साठी सहा लहान कार्ड आणि दोन बुक मार्क्स.. इत्यादी सगळ्या गोष्टी पाठवीत आहे. जर तुम्हाला ही ग्रिटींग कार्डस आवडली तर त्यांची किंमत ३९५ रुपये इंडीयन माउथ एँड फुट पेंटींग आर्टीस्ट या नावाने पाठवावे ही विनंती. तुम्ही पैसे पाठवणे कम्पलसरी नाही. पण जर तुम्ही पैसे पाठवले तर आमच्या सारख्या हात नसलेल्या मुलांना सेल्फ रिस्पेक्ट आणि डिग्निटी ने जगण्यास मदत होईल. आणि खाली सही होती".. नदीम शेख!



पत्र वाचले , एका पेक्षा एक सुंदर असलेली ती ग्रिटिंग कार्डस मला वेडावून दाखवत होते. एकाही चित्रावर नजर ठरत नव्हती. इतकी सुंदर चित्रं पाहिल्यावर ज्या माणसाने ही चित्रं काढली त्याला हात नाहीत, आणि त्या माणसाने ही चित्रे तोंडात ब्रश धरून काढली आहेत, किंवा पायाच्या बोटात ब्रश धरून काढली आहेत, ह्या गोष्टी वर विश्वासच बसत नव्हता. डोक्यात विचारांचा गोंधळ माजला होता. नकळत त्या हुसेनच्या करोडो रुपयांच्या चित्रांशी तुलना केली ह्या चित्रांची.. आणि वाटलं, की" त्या हुसेनने यांच्याकडे येऊन शिकावं, चित्रं म्हणजे काय - पेंटींग म्हणजे काय असतं ते ! असो.. त्या पत्राच्या मागच्या भागात काही अशाच चित्रकारांची चित्र काढतांनाचे फोटो होते. एक लहानसा मुलगा के जगनार्थनन चे तोंडात ब्रश धरून चित्र काढतानाचा फोटो पाहिला आणि उगाच वाटले, की दैव किती क्रूर असतो बरेचदा नाही?




एक संस्था आहे, शारिरीक दृष्ट्या अपंग, वर दिलेल्या प्रकारातले , म्हणजे हात नसलेल्या लोकांना मदत करणारी ! त्या संस्थे तर्फे भारतामधल्या अशा १७ लोकांना निवडून त्यांनी तयार केलेले पेंटींग प्रॉडक्ट्स मार्केटींग करुन त्यांना नियमीत पणे पैसे मिळवून देण्याचे काम करते. एक जागतीक संघटना आहे माउथ ऍंड फुट पेंटींग आर्टीस्ट वर्ल्ड वाईड नावाची. या संस्थेने भारता मधे पण आपली शाखा सुरु केलेली आहे. ही संस्था ७४ देशामधे पसरलेली आहे. जवळपास ७०० आर्टीस्ट या संघटनेचे मेंबर्स आहेत आहेत. ह्या मेंबर्सच्या कलाकृतीना ही संस्था बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रयत्न करते. खरंच कौतूकास्पद काम आहे, पण एक प्रश्न आहेच.. फक्त १७ लोकंच का निवडले यांनी भारतातले?असे अजून बरेच लोकं असतील भारतामध्ये??

शारिरीक रित्या दुर्बल असलेलया या लोकांच्या जगण्याच्या लढ्याला मनःपुर्वक अभिवादन !जगण्याची नवीन दिशा - कुठलेही संकट आले तरीही न घाबरता कसे सामोरा जायचे याचे उदाहरण घालून दिलेले आहे या लोकांनी. नतमस्तक होतो असे निसर्गाचे चमत्कार पाहिले की.

# सेकण्ड इनिंग्स...

कुलस्य जोशी

"मी काय सांगतोय, तुम्ही समजून का घेत नाही?"

इन्स्पेक्टर कदम यांनी जरा चिडूनच प्रश्न विचारला.

"तुम्ही समजून घेत नाही आहात, इन्स्पेक्टर", मी म्हणालो. "तुम्ही साचेबद्ध वागताय, तुम्हाला जे शिकवलंय त्यानुसारच तुम्ही विचार करता. एखाद्या घटनेचे वेगळे पैलू हि असू शकतात हे तुमच्या लक्षात येत नाही."

"डॅम इट! तुम्ही सायाकोलोजीस्ट म्हणजे साध्या सोप्या गोष्टीतही  पैलू शोधतात. यात काही पैलू वगैरे नाही. तो फक्त नाटक करतो आहे, आणि त्याच्या नाटकाला तुम्ही सर्व फसले आहात. कोर्ट सुद्धा !"

"हो तुमचा अहंकार आहे  इन्स्पेक्टर, तुम्हालाही माहिती आहे हा माणूस मनोरुग्ण आहे. पण या केस मध्ये तुम्ही खूप त्रास सहन केला आहे वरिष्ठांची बोलणी खाल्ली आहेत. मिडिया ची टीका झेलली आहे, परत या केस मध्ये तुमच्या भावना गुंतल्या आहेत. म्हणून तुमचा त्याच्यावर राग आहे, म्हणून तुम्हाला त्याला शिक्षा झालेली हवी आहे. पण हे कायद्यात बसणार नाही. "

"बरोबर आहे डॉक्टर साहेब म्हणतात ते", सरकारी वकील साने बोलले. "मी सरकारी वकील आहे तरीसुद्धा असे बोलतोय म्हणून तरी लक्षात घ्या. अशा माणसाला  कायद्यानुसार शिक्षा होऊच शकत नाही. फारतर न्यायाधीश साहेब त्रीतामेंत साठी वेड्याच्या हॉस्पिटलमध्ये पाठवतील. एकदा हे समजून घ्या."

"पण तो वेडा आहे असे मानायला हवे का ? त्याने दहा बायकांचे खून केलेत अशा बायकांचे कि ज्यांचा त्याच्याशी (किंवा एकमेकांशी) काहीही संबंध नाही. तो एक खुनी आहे. एक पिसाट खुनी !"

"एक्झॅटली !" मी म्हणालो, पिसाट हाच शब्द त्याला योग्य आहे. तो सिरीयल  किलर आहे. पण म्हणजेच त्याला खून म्हणजे थ्रील वाटते. तो जाणूनबनून खून करत नाही. ही इज अ सायको किलर!"

"आणि 'सायको' म्हणजेच त्याच्या डोक्यावर परिणाम म्हणजे शिक्षा नाही, उपचारार्थ हॉस्पिटल मध्ये पाठवावे."

"खरंच हे काय झाले ?" इन्स्पेक्टर दात ओठ खात बोलले, "त्या मिडियावाल्यांना परवानगीच द्यायला नको होती, ते नसते तर त्याने असे स्टेटमेंट केले  नसते आणि कोर्टाने अशी समिती नेमली नसती.

मी आणि साने वकील अशी समिती होती, आम्हाला ठरवायचे होते कि त्याच्यावर केस करावी कि नाही. तो मनोरुग्ण आहे हे त्याचे स्टेटमेंट पाहून संशय आला आणि कोर्टाने हा निर्णय घेतला. काय होते त्याचे स्टेटमेंट  ? बाप रे आठवले तरी अंगावर काटा येतो.

'बायकांनी जगात असू नये ! म्हणून मी सर्व बायकांना ठार मारणार आहे ! कारण मी शाळेत गेलो नाही ! म्हणून मी आता थांबलोय. पण मी लवकरच सेकण्ड इनिंग  खेळीन. लवकरच खेळीन. '

हे  ते स्टेटमेंट होते आणि हे ऐकूनच आणि वाचूनच कोर्टाने हा निर्णय घेतला. कारण त्याच्या वकिलाने लगेच हि मागणी केली होती. म्हणून माझी निवड झाली होती कि, मी ठरवावे कि खरेच त्याच्या डोक्यावर परिणाम झाला आहे का तो फक्त नाटक करतोय.

आणि त्याच्या सर्व चाचण्या घेऊन माझी अशी खात्री झाली होती कि, तो खरोखरच सायको आहे आणि त्याच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. हे मी इन्स्पेक्टर कदम यांना सांगितल्यावर ते मुद्दाम मला घेऊन सरकारी वकिलांच्या ऑफिस मध्ये घेऊन आले होते. त्याला कुठली शिक्षा व्हावी हे ठरवायला ! पण सरकारी वकिलांनी स्पष्टपणे त्याला शिक्षा होऊ शकत नाही म्हटल्यावर, इन्स्पेक्टर आणखीनच संतापले होते.

"बरोबर हे स्टेटमेंटच सिद्ध करते कि त्याच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. परत मी घेतलेल्या चाचाण्याचे रिपोर्ट्स आहेतच. म्हणून म्हणतो इन्स्पेक्टर तुम्हाला खुनी म्हणजे फक्त खालानायाकच दिसतो. मला कळतंय कि त्याच्यात एक विकृती आहे आणि ती उपचाराने बरी होऊ शकते."

"ठीक आहे, होऊ द्या तुमच्या मनासारखे." इन्स्पेक्टर म्हणाले. "जीवाची बाजी लावून आम्ही खुनी पकडायचे आणि मग अशा लूपहोल्स मुळे ते निसटून जाणार. वर पुन्हा तुम्हीच म्हणणार, पोलीसखाते काहीच काम करत नाही."

इन्स्पेक्टर माफ करा, पण एवढं चांगलं पोलीस खाते असेल तर त्याला पकडायला तुम्हाला वेळ का लागला? " खर तर हे मी बोलायला नको होते, पण पटकन तोंडून शब्द गेले.

"का वेळ लागला म्हणजे ?" इन्स्पेक्टर टेबलावर मुठ आपटून म्हणाले, ते चांगलेच संतापले होते. "पोलिसांबद्दल तुमच्या कल्पना तरी काय आहेत, डॉक्टर ? तुम्ही पोलिसांना अंतर्ज्ञानी समजता कि जादुगार ? काही तपास, इंव्हेस्टिगेशन केल्याशिवाय कुठल्याच खुनाचा उलगडा होऊ शकत नाही. हि तर सायको किलर ची केस आहे. त्याला निश्चितच जास्ती वेळ लागणार, हे मी सांगायला हवे का ? तरीसुद्धा आम्ही हे केस महिन्याभरात सोडवली."

मी मान खाली घातली. "'सोरी इन्स्पेक्टर, खरे आहे तुम्ही म्हणताय ते."

"नाही, नाही, मी हि केसच तुम्हाला पुन्हा एकदा सांगतो. मग तुम्हाला पटेल." इन्स्पेक्टर चांगलेच चिडले होते.

इन्स्पेक्टर सांगू लागले.

"पहिल्या खुनाची वर्दी मला अचानकच मिळाली. पण मी हवालदार नारायण आणि यादव यांना लगेच घेऊन स्टेशन वर पोहोचलो. त्या बाईचे मुंडके कोणीतरी उडवले होते, त्यामुळे ओळख पटणे कठीण होते.

"पण तिच्या पर्स मध्ये तीचं आयकार्ड होते म्हणून ओळख पटू शकली. आम्ही तिच्या घरी गेलो, घरातल्यांची अगदी कसून चौकशी केली. तसेच तिच्या ऑफिस मध्येही पण कुठलाही ट्रेस लागला नाही. नाईलाजाने केस बंद करावी लागली.

"आता तुम्हीच सांगा कशी होणार होती केस सोल्वं ? ती सिरीयल किलर केस आहे हे आधी कसे कळणार ? थांबा ! थांबा, मी हि केस पूर्ण सांगणारच आहे."

"दुसरा खून झाला, त्यावेळी त्या बाई ला गोळी मारलेली होती. आम्ही पोहोचलो तेव्हा आधी हे ठरवणे गरजेचे होते कि ह्या खुनांचा एकमेकांशी काही संबंध आहे का ? हे खून एकाच व्यक्तीने केले आहेत का ?

"पहिल्यांदा हा विचार आलाच नाही. कारण दोन्ही खून वेगवेगळया तऱ्हेने केलेले होते. त्यामुळे खुनी वेगळेच असावेत असाच आमचा समाज झाला.

म्हणून पहिल्यासारखीच तिच्या घरच्यांची चौकशी केली, तिच्या नातेवाईकांची केली, ऑफिसमध्ये केली, निष्पन्न काहीच नाही, म्हणून हि केस हि बंद केली.
तिसरा खून आमच्या हद्दीत झाला नाही, त्यामुळे तो मला कळण्याचा प्रश्नच आला नाही, तिथल्या पोलिसांनी सुद्धा प्रयत्न केले, पण अर्थातच काहीही निष्पन्न झाले नाही."
"चौथा खून झाला तेव्हा हीच परिस्थिती, निष्पन्न काहीच नाही. खून पुन्हा दुसऱ्या हद्दीत, वेगळया प्रकारे."
"पण तिथला इन्स्पेक्टर हुशार होता, त्याला हि गोष्ट पहिल्यांदा जाणवली कि खून जरी वेगळया प्रकारे झाला असला तरी तो एकाच माणसाने केला आहे. पण ज्या अर्थी या चौघांचाही एकमेकांशी काहीही संबंध नाही, त्या अर्थी हा खून वैरातून झाला नाही. पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये सुद्धा हे चार खून एकाच व्यक्तीने केल्याचे सिद्ध झाले.
लागोपाठ पाचवा खूनही झाला आणि मग वरिष्ठांना या प्रकरणाचे गांभीर्य जाणवले. मग त्यांनी या सायको किलर केसचा तपास संपूर्णपणे माझ्या हातात दिला आणि आमची टीम कामाला लागली.
"पहिल्यांदा प्रश्न होता तो काहीतरी समान धागा शोधण्याचा. पण तो शोधता येईना. कारण प्रत्येक खून वेगवेगळया प्रकारे आणि वेगवेगळया ठिकाणी झाला होता. खुन्याला कोणी बघितले नव्हते. त्यामुळे त्याचे कसलेही वर्णन आमच्याकडे नव्हते.
पण सहाव्या खुनानंतर आमच्या प्रयत्नाला थोडे यश आले. आम्हाला ठिकाणाची एक कल्पना सुचली. तसे ते खूप सोपे होते. कारण तो एक एक स्टेशन्स घेत चालला होता. उदाहरणार्थ, त्याने पहिला खून केला होता, दादरला, नंतर माटुंगा, माहीम.... असे करत करत शेवटचा खून त्याने केला होता सांताक्रूझला, म्हणूनच नंतरचा खून आता विलेपार्ल्याला होईल, असे आम्ही गृहीत धरले. त्याशिवाय आम्ही वेगळे काय करू शकत होतो ?
"तर आता प्रश्न होता तारखेचा ! त्यातसुद्धा निरीक्षण केल्यानंतर असे लक्षात आले कि, प्रत्येक खुनात तो दोन दिवसांचे अंतर ठेवत होता. जास्त नाही कि कमी नाही. त्यामुळे पहिला खून ३ तारखेला झाला होता, आणि मग ३ च्या पाढ्याप्रमाणे सहावा खून अठरा तारखेला झाला होता, आणि म्हणूनच पुन्हा आम्ही २१ तारीख गृहीत धरली.
"सर्वात मोठा प्रश्न होता ठिकाण आणि वेळेचा! पण माझ्या मते या सहा खुनानंतर खुनी जरा शेफारला होता. त्याने सरळ सरळ आव्हानच दिले आम्हाला ", इन्स्पेक्टर दात ओठ खात म्हणाले.
"बरोबर २० तारखेला त्याची चिट्ठी आली. आम्हाला आता लक्षात येते कि चिट्ठी त्याने कुणाकडून तरी टाईप करून घेतली असणार."
"इन्स्पेक्टर,
कसले हे तुमचे पोलीस खाते ? मी ६ खून केले आणि मला पकडू शकला नाहीत अजूनही ? मी हसून हसून वेड झालो, एखादा लहान मुलगाही पकडू शकला असता. पण असू दे, आता मीच तुम्हाला आव्हान देतो, मी अजून चार खून करणार आहे. आणि पुढच्या दोन खुनांची माहिती तुम्हाला देतो, सातवा खून विलेपार्ले स्टेशनावरच सकाळच्या गर्दीच्या वेळेला. आठवा अंधेरी स्टेशनावर रात्री भिकारणीचा. मला पकडू शकलात तर पकडा. आणि नाही पकडू शकलात तर मी नवव्या आणि दहाव्या खुनांची माहिती देणार नाही, कारण ती तुमची लायकी नसेल."

इंस्पेक्टारांचा श्वास नॉर्मल वर यायला वेळ लागला. तेवढ्यात सरकारी वकील मध्ये पचकले.

"आणि तुमची लायकी नाही हे सिद्ध झाले, आणि मला कोर्टात तुमच्या खात्याला डिफेंड करावे लागले.

"पुढे ऐका. " इन्स्पेक्टर कडाडले, "हे आव्हान मी स्वीकारायचे ठरवले. २१ तारखेला मी ट्रॅफिक मुळे आठ ऐवजी आठ पाच ला पोहोचलो. पण तेवढी पाच मिनिटे पुरली त्याला.

"आठव्या खुनाच्या बाबतीत मात्र मी कुठलाच धोका पत्करायचा नाही, असे ठरवले. हवालदाराला संध्याकाळ पासूनच साध्या वेषात स्टेशन वर बसवले. मी मात्र जाऊ शकलो नाही. कारण मला अत्यावश्यक मिटींगला जायचे होते.

"ऐन मध्यरात्री हवालदाराचा फोन आला कि खुन्याने आपले काम केले होते. मी चांगलाच संतापलो होतो.

ताबडतोब स्टेशन वर पोहोचलो. "तू असताना सुद्धा असे का झाले ?" असे खडसावून विचारले. “तुला ताबडतोब नोकरी वरून का काढू नको ?”, असे हि विचारले.

"साहेब मला माफ करा, मला फक्त पंधरा मिनिटे डुलकी लागली होती आणि.. "

सरकारी वकिलाच्या चेहऱ्यावर एक छद्मी हास्य चमकून गेले.

इन्सपेक्टरांनी त्यांच्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकला आणि बोलायला सुरुवात केली.

"मी जर तिथे असतो तर खूप फरक पडला असता. पण जर तर ला अर्थ नसतो. आता हि चूक मी पुन्हा होऊ देणार नव्हतो. यापुडे आणखी कठीण परिस्थिती होती. कारण आता 'त्याची' मदत मिळणार नव्हती. आणि अशाच परीस्थितीत आशेचा किरण चमकला. पोस्टमार्टम रिपोर्टनुसार हा जो आठवा खून झाला होता तो डोक्यावर एक जोराचा फटका मारल्यामुळे आणि त्याच डॉक्टरच्या म्हणण्यानुसार या फटक्यात खूप ताकद होती. अशी ताकद फक्त पोलीस किंवा आर्मी ऑफिसर यांच्यातच असते.

"मग मात्र मला थोडीशी शंका आली. पण खात्री करून घेता येईना. कारण खात्री करून घ्यायला एकाच पुरावा होता, त्याची चिट्ठी. ती हस्ताक्षार तज्ञाकडून तपासून घेता आली असती पण ती टाईप करून घेतली असल्याने तोही मार्ग बंद झाला होता. आम्हाला खात्री करायची होती. म्हणून आम्ही त्याचा पाठलाग करायचा निर्णय घेतला.

"पण नवव्या खुनाच्या वेळी परत एक चुकामुक झाली. त्याला गाठता आले नाही. तुम्ही म्हणाल, खुनी कोण होते ते तुम्हाला माहित होते, मग तुम्ही त्याला आधीच अटक का नाही केलीत ? पण आम्हाला पुरावा हवा होता.

दहाव्या खुनाच्या वेळेला मात्र आम्ही त्याला गाठले. रस्त्यावर बाईचा खून करताना त्याने हातोडा उचलला, ताबडतोब आम्ही त्याच्या अंगावर उडी घेतली. त्याच्या हातातला हातोडा दूर फेकला. आमच्या फोटोग्राफर ने आधीच त्याचा हातोडा उचलेला फोटो काढला होता. त्यामुळे पुराव्यासाठी अडचण नव्हती.

"पण तरीही ती बाई मेली होती, हे कसे काय ?" आम्हाला कळेना तेवढ्यात तो भेसूर हसत म्हणाला,

"इन्स्पेक्टर तुम्ही मला ओळखलत आणि पकडणार हे कळून चुकले होते. पण मला तुमची थोडी मदत करायची होती. म्हणून मी हातोडा उगारला, पण दुसऱ्या हातात विषाने भरलेली सिरींज होती. हा हा हा, इन्स्पेक्टर तुम्ही खरोखरच मूर्ख आहात. "

"आम्ही त्याला अटक केली, तो यादव होता."

इन्सपेक्टरांनी एका दमात गोष्ट संपवली मग मात्र ते थांबले पाण्याची बाटली तोंडाला लावली. आणि एका दमात रिकामी केली.

आता बोला डॉक्टर, काय प्रयत्न केले नाहीत आम्ही ? तुम्ही आमच्यावर वाट्टेल ते आरोप करता आहात."

“खरे आहे तुम्ही म्हणताय ते,” मी म्हणालो, "पण आता तुम्हीच सांगा, यात तुमची खरी मेहनत किती आणि नशिबाची साथ किती ? पहिल्यांदा यादवने, तुम्हाला ठिकाण सांगितले नसते तर, तुम्ही त्याला त्या रात्री ड्युटी वर कसे ठेवले असते. मग तो असताना सुद्धा खून झाला, म्हणून तुम्हाला त्याचा संशय आला ना. बरे ते जाऊ दे. पोस्टमार्टम चा रिपोर्ट नसता तर तुम्हाला संशय आला असता काय ? महत्वाचे म्हणजे तो तुमच्याबरोबर दोन वर्षे होता, तरीही तो अशिक्षित आहे, हे कसे कळले नाही ? त्याहून हि महत्वाचे म्हणजे तो निवडलाच कसा जातो, तुमच्या खात्यात ?”

"कसा म्हणजे ?" अर्थातच वशिल्याने डॉक्टर. या देशात हे सहज घडते. माझ्याबद्दल म्हणाल तर एका हवालदाराला तक्रार नोंदवून घेणे यापेक्षा बैठे काम नसते. तक्रार नोंदवण्याचे कामे नारायण करत होता. त्यामुळे यादव निरक्षर आहे हे कसे कळणार ? इन्सपेक्टरांनी विचारले.

"ठीक आहे, मी मान्य करतो पण तरीही आमचे काहीतरी श्रेय आहेच. आणि प्रत्येक वेळेला असेच होते. आम्ही गुन्हेगार पकडायचे, आणि अशा लूप होल्स मधून ते सुटणार.

"तुम्हीच सांगा तुम्हाला तो मनोरुग्ण वाटतोच कसा, ? त्याने ती चिठ्ठी पाठवून आम्हाला आव्हान देणे, नंतर आम्ही पकडणार हे लक्षात आल्यावर दहावा खून करायचाच हे ठरवून शेवटच्या क्षणी केलेली ती चाल, हे सगळे पाहिल्यावर लक्षात येते तो कसा थंड डोक्याचा आहे. २ वर्षे तो माझ्याच चौकीत तो हवालदार होता त्यात तो मला मनोरुग्ण वाटला नाही. तो ढोंगच करतो आहे. संपूर्ण पोलीस खात्याला आणि मला हि बट्टा लावला त्याने. मला माझ्या हातांनी त्याचा गळा दाबावासा वाटतो आहे.”

"एक्झॅटली ! मी तेच म्हणतो आहे. या केसमध्ये तुमच्या भावना गुंतल्या आहेत. तुमच्याच टीमचा हवालदार यात सापडला म्हणून. पण तुम्ही त्याचे स्टेटमेंट लक्षात का घेत नाहीत ?" "मला दहाच अंक मोजता येतात म्हणून मी थांबलो आहे. मी दुसऱ्या इनिंगची सुरुवात करेन, या स्टेटमेंटवरूनच सिद्ध होते. आम्ही याला स्प्लिट पर्सनेलिटी म्हणतो. एका वेळी तो पोलीस म्हणून काम करतो, तर त्याच्या दुसऱ्या मनात त्याला आपण अवतार वाटतो, बायकाना मारणे तो आपले पुण्यकर्म समजतो. “

"पण तो ढोंग..”

"नाही इन्स्पेक्टर विज्ञान कधी खोटे बोलत नाही, मी चुकू शकलो असतो, पण त्याच्या घेतलेल्या चाचण्या सिद्ध करत आहेत कि तो मनोरुग्ण आहे.”

"आणि इन्स्पेक्टर एकदा डॉक्टरांनी मनोरुग्ण सर्टीफ़िकेट दिले कि, काही उपयोग होत नाही, त्याला कसलीही शिक्षा कायद्याप्रमाणे देऊ शकत नाही, म्हणून सरकारी वकील म्हणून सांगतो कि, केसचा हट्ट धरू नका . " साने वकील म्हणाले.

"ठीक आहे, होऊ दे तुमच्या मनासारखे. या देशात हे असेच चालणार.”

इन्स्पेक्टर हताशपणे बोलले, आणि आणे वकिलांच्या ऑफिसमधून निघून गेले.

मी पण उठलो.

"का हो ? तुम्ही पण निघालात एवढ्या लवकर ? थांबा कि अजून थोडा वेळ." साने बोलले.

"नको हो खूप उशीर झाला आहे. मी निघतो, मला घाई आहे."

साने वकिलांचा निरोप घेऊन मी त्यांच्या ऑफिस मधून बाहेर पडलो.

गोष्ट खरी होती. मला घाई होती, मी काही यादव सारखा आव्हान द्यायला मूर्ख नव्हतो. त्याच्यासारखा अशिक्षितही नव्हतो. हो, चांगला शिकूनच सायकोलोजिस्ट झालो होतो.

यादवला फक्त एक ते दहा अंकाच मोजता येतात, म्हणून तो सेकण्ड इनिंग मध्ये जायचा विचार करत होता. मला तशी गरज नव्हती. मला सर्व आकडे मोजता येत होते. मला सेकण्ड इनिंग मध्ये जायची गरज नव्हती. त्याची सेकण्ड इनिंग कोणी पूर्ण करायला नको का ?

ती मी करणार होतो. एकाच इनिंग मध्ये, त्याची सुरुवात मी आज करणार होतो,

माझ्या बायकोपासून !!!!!!

# वास्तुवैरी

रामचंद्र सोनू जाधव

आपलं एक सुंदर आणि भव्य घर असावं तेही माफक किमतीत आणि आपल्याला हव्या असलेल्या ठिकाणी असावं, घरापुढे अंगण, अंगणात एक सुंदर असे तुळशीवृंदावन, घराभोवती झाडेझुडपे, आणि लहानसा बगीचा आणि हे घर आकर्षक पद्धतीने सजवलेलं असावं असं प्रत्येकाला कधी ना कधी वाटत असत. प्रत्येकाचं स्वप्न त्यांच्या मनाप्रमाणे पूर्ण होतेच असे नाही, पण कधी ना कधी कांही लोकांना, अगदी त्यांच्या स्वप्नाप्रमाणे नसले तरी लहान मोठे घर मिळविण्यात यश मिळते. असेच बंगलेवजा घर आमच्या शेजारी राहणाऱ्या रमाकाकूंच्या धाकट्या भावाने मलबार हील येथे अगदी मोक्याच्या ठिकाणी घेतले.

रमाकाकू आपल्या भावाला प्रेमाने दामू म्हणत. काकूंचे आपल्या भावंडावर अतिशय प्रेम. आपल्या माहेरी काहीही बरेवाईट प्रसंग असले तर, काकू त्यामध्ये स्वत:ला झोकून देत. काकूना आता वयोमनाप्रमाणे झेपत नाही, तरीदेखील माहेरी काही असले की ते पूर्ण करण्याचा त्यांना ध्यासच लागे. परंतु माहेरची माणसे मात्र जणू काय ते तिचे कर्तव्यच आहे असेच  समजत. त्याला कारणही तसच होत. रमाकाकूंच्या सासरची परिस्तिथी बेताचीच, रमाकाकूंचे यजमान शाळामास्तर असल्यामुळे तिचे सर्व भाऊ, बहिण वगैरे तिच्या गरिबीची कुचेष्टा करायचे. आता रमाकाकूंची मुलेही चांगल्या ठिकाणी नोकरीधंदा करतात, त्यामुळे त्यांचीही परिस्तिथी बदलली आहे, परंतु तरीदेखील काकूंच्या माहेरच्यांनी त्यांना अवमानीत करण्याची एकही संधी सोडली नाही. काकूंचे यजमानदेखील वेळप्रसंगी त्यांना सडेतोड उत्तर देतात व लक्षात आणून देतात की ते भावंडामध्ये भेदभाव करून एकाच बहिणीला वारंवार कसे अपमानीत करीत असतात. स्वत:चा चेहरा अशाप्रकारे आरशात दाखवल्यानंतर मात्र त्यांना फारच खटकत असे.

रमाकाकूंचा स्वभाव तसा बडबड्या. त्यांना कांही ना कांही विषय सतत चघळून चघळून दुसऱ्याला सांगण्यात मजा वाटते आणि स्वत:चे मोठेपण सांगण्याची संधी त्या सोडत नाहीत. अशीच संधी त्यांना आता मिळाली. आपल्या भावाने टोलेजंग घर घेतल्याची आणि तेदेखील  मलबारहिलसारख्या ठिकाणी, ही बातमी तिच्या कानावर आली होती. भावाने तिला घर दाखवले नव्हते तरीदेखील आपल्या लाडक्या भावाच्या म्हणजेच दामूच्या घराचे कौतुक रमाकाकू शेजारी पाजारी सांगत सुटल्या होत्या. आता नवीन घराची पूजा होईल, गणेश पूजा होईल, वास्तूपूजा, वास्तुशांती होईल तेव्हा काय काय धावपळ करावी लागेल, एकटी भावजय कसं काय हे सर्व निभावून नेईल, काकुना वाटत होत की तिच्याशिवाय हे कोणाला जमणार नाही. या शुभप्रसंगी पावणे-रावणे येतील त्यांची व्यवस्था नीट व्हायला पाहिजे. दामूला कुठे नीटसे माहित आहे, कुठे कोणाला नारळ द्यायचा, वडीलधाऱ्यांचा मान कसा राखायचा, आणि त्यामुळे यासाठी रमाकाकू मनातल्या मनात तयारी करीत होत्या आणि आजुबाजूला सर्वांना सांगत होत्या. रमाकाकूंचे यजमान मात्र या तिच्या बोलण्याची, वागण्याची चेष्टा करीत होते. ते तिला एकदा गमतीने म्हणाले देखील की तू सर्वांना कौतुक सांगतेस खरी, पण तुला खरंच बोलवणार आहेत ना? तुला तिथे कुत्रंदेखील विचारत नाही म्हणून म्हणतो. असे संवाद त्या दोघामध्ये नेहमीच चालायचे.

दामुने आता वास्तुपूजा करायचे ठरवीले. आमंत्रण द्यायची यादी तयार झाली. पण दामुने आपल्या मुलापुढे, बायकोकडे प्रस्ताव मांडला की यावेळी आपण आपल्या वडील बहिणीला म्हणजेच रमाला व तिच्या

नवऱ्याला बोलवायचे नाही, कारण हा माणूस त्याच्या पोशाखावरून एकदम दरिद्री आणि अजागळ वाटतो आणि मलबारहिलसारख्या ठिकाणी माझ्या नव्या घरी तो बोलवायच्या लायकीचा आहे असे मला वाटत नाही. दामूच्या बायकोने खूप समजाविले की ते तुमच्यापेक्षा वयाने, ज्ञानाने, शिक्षणाने व अनुभवाने मोठे आहेत, शिवाय तुमच्या बहिणीचे यजमान आहेत तेव्हां असा अविचार करून मोठ्यांचा अपमान करून आपण नवीन घराची पूजा करणार का? आपण वास्तुशांती करायला जातो की वास्तुवैर? मुलानेही समजावले की पप्पा अलीकडे मला कांही तुमचे वागणे ठीक नाही दिसत. अगदी उदाहरण द्यायचे झाले तर आमच्या घरच्या सर्व लग्नकार्यामध्ये किंवा इतर कुठल्याही प्रसंगी ते दोघेही आपणहून सर्व कांही शेवटपर्यंत झटत असतात. आणि आता असे एकाएकी काय झाले की तुम्ही तुमच्या वडील बहिणीशीच नाते तोडायला निघालात. दामू आपल्या मुलाचेही ऐकून घ्यायला तयार नव्हता. तो म्हणाला ' त्यांनी आम्हाला मदत केली अस जर तुला वाटत असेल तर त्यांच्या रोजंदारीचा हिशेब कर आणि त्यांच्या तोंडावर एक चेक फेकून ये. पण मी एकदा ठरवले म्हणजे ठरवले, मी आता त्यांचे तोंडही बघायला तयार नाही'. मुलगा म्हणाला 'अलीकडे तुमचं काय बिनसलं समजत नाही, सर्वांना चेक देऊन टाक म्हणून सांगत असता..परवा तर भाजीवालीला दहा रुपये देताना चेक दिला तर चालेल का असे विचारत होता आणि आता तर बहिणीला रोजंदारीप्रमाणे चेक द्या म्हणता, आमच्याकडे त्यांना आम्ही रोजंदारीवर कामाला ठेवले होते काय? अहो, मोठ मोठे श्रीमंत लोकही असे चेक फाडण्याची आणि असे लिहिलेले चेक पुन्हा फाईलमध्ये तुमच्यासारखे जपून ठेवण्याची उठाठेव करत नसतील. एखाद्याला असे वाटेल की तुम्ही चेक बुकच्या जोरावर दुसऱ्याला तुच्छ मानीत आहात."' परंतु दामुचे म्हणणे पडले की कोण काय म्हणेल याची मला पर्वा नाही. अशारीतीने जुन्या घरातील पारिवारिक असंतोषाने नवीन घराच्या वास्तुशांतीच्या नमनाला सुरवात झाली आणि सर्वानुमते ठरले की दामूला नाराज करायचे नाही आणि त्याच्या आज्ञेप्रमाणे मोठ्या बहिणीला बोलवायचे नाही, नाहीतर विनाकारण त्याचा रक्तदाब वाढेल.

सर्व नातेवाईकांना अगदी आग्रहाने वास्तुपुजेसाठी बोलविण्यात आले. पूजेला सुरवात करण्यापूर्वी गुरुजींनी सांगितले की पुजेला बसण्यापूर्वी यजमानांनी कुटुंबातील वडीलधाऱ्या माणसांना नमस्कार करून बसा. आता दामुच्याबाबतीत एकच वडील माणूस आणि ते म्हणजे मोठी बहिण आणि तिला तर बोलाविलेच नव्हते. पण दामू खमक्या. तो अहंकाराने फुत्कारला "गुरुजी माझ्या घरात मीच मोठा. माझ्यापेक्षा आमच्या परिवारात कोणीही वडीलधारे नाही, तेव्हां आता काय करू? " गुरुजी म्हणाले "ठीक आहे, तर मग जमलेल्या लोकांना नमस्कार करा आणि पुजेला बसा." अशारीतीने पूजा संपन्न झाली. जमलेल्यापैकी कांही लोकांनी दामूला विचारले की मोठी बहीण कोठे दिसत नाही ती, दामूने देवा ब्राम्हणासमक्ष खोटे सांगितले की ती आजारी आहे म्हणून आली नाही.

रमाकाकूना एव्हाना समजले होते की वास्तुपूजा तर झालीच पण रमाकाकुना न बोलविण्याचा ठरावही मंजूर झाला होता. काकूंची आपल्या माहेरच्या माणसाविषयीची घमेंड पार उतरली होती. आस्थेची जागा तिरस्काराने घेतली होती. त्यादिवशी रमाकाकू दिवसभर रडत होत्या, दुसऱ्यादिवशी त्या सावरल्यानंतर त्यांच्या यजमानांनी समजवायला सुरवात केली की, ते मुद्दाम आपल्याला न बोलवायला आपले कांही भांडण झाले आहे का? कदाचित त्यांना आपला फोन लागला नसेल. एवढ त्यात वाईट वाटून घेण्यासारखे काय आहे? ते हौंगकौंगला जायच्या तयारीत आहेत आणि त्या गडबडीत वेळ मिळाला नसेल त्यांना. मला आठवत की त्यांच्या लग्नानंतर ते लगेचच हौंगकौंगला जाऊन आले होते आणि तेही एकटेच. वहिनी तेव्हां खूप रागावल्या होत्या. दोघांच कडाक्याचं भांडण झाल होत आणि ते तुझ्या बहिणीने मिटवले होते. पण आता तस नाही, दोघेही

होंगकोंगला जात आहेत, त्यामुळे तयारी करण्यासाठी धावपळ ही होणारच. त्यामुळे त्यांना तुला बोलवायला वेळ मिळाला नसेल. आपण त्यांना समजून घेणार नाही तर कोण घेणार? आणि समजा त्यांनी जाणीवपूर्वक मुद्दामहून जर बोलावले नसेल तर मला तरी त्यात नवीन कांही नाही. भाऊबीज आणि रक्षाबंधन यावर अनेकवेळा हिशेब करून ते त्यांना परवडत नाहीत म्हणून तुझ्या दामू आणि कंपूने बंदच करून नाही का टाकलेत ? आता तर त्यांनी तुला वास्तूपुजेला न बोलावून नातेच तोडून टाकले आहे. विनाशकाले विपरीत बुद्धी. दुसरे काय ! तुका म्हणे ऐशा नरा . . . . . . . . .

वास्तुपुजा ही प्रथमत: वास्तूच्या दीर्घायुष्यासाठी, घरातील सर्वांच्या सुखशांती आणि समृद्धीसाठी शांत आणि निर्मळ मनाने करावयाची असते. परिवारातील सर्वाना बरोबर घेऊन कोणतेही वैरभाव मनांत न ठेवता ही पूजा शांत आणि प्रफुल्लित मनाने करावयाची असते. आपण आपल्या सक्ख्या आणि वडील बहिणीला न बोलावून, तिच्याबद्दल वैरभाव मनात ठेवून केलेली वास्तूपूजा कोणत्या वास्तूपुरुषाला मान्य होईल? आपण कितीही घमेंडीने सांगितले की हे माझे घर आहे तरीदेखील ते माझे घर नसतेच. घरातील प्रत्येकजण घर आपले असल्याचे म्हणतो. इतकेच काय आपले वैरीदेखील म्हणजे झुरळ, उंदीर, पाली, मच्छर, माशा, इतर कीटक, ही सर्व मंडळी आपल्याबरोबरच राहतात आणि ते सुद्धां म्हणतात की घर त्यांचेच आहे. मग नक्की घर कुणाचे? आपले इथे कांहीच नसते, सर्व काही इथेच ठेऊन जायचे आहे मग हा वैरभाव कशाला? तर मग जी वास्तू आपली नाहीच आहे त्याची पूजा करताना परिवारातील लोकांच्या बरोबर तेढ निर्माण करून काय साध्य होते ? त्यांचे त्यामध्ये काहीच नुकसान नाही. याउलट दामुने वरकरणी कितीही आव आणला तरी सतत त्याचे मन त्याने केलेल्या कुत्याबद्द्द्ल त्याला टोचत राहील आणि पश्चातापाने होरपळत राहील यामध्ये शंका नाही. म्हणूनच संत मंडळी सांगतात, तूच तुझ्या जीवनाचा शिल्पकार. आणि तूच निर्माण केलास वास्तुवैरभाव .

# नागालँड- प्राचीन ते अर्वाचीन

मकरंद केतकर

परवा सहज कपाटाच्या एका दुर्गम भागाचा दौरा काढला आणि अनपेक्षितपणे आनंदाचा ठेवा सापडला. माझं जुनं चौथीचं बालभारतीचं पुस्तक. पहिलं पान उघडलं. अनेक वर्ष मनापासून पाठ केलेली असल्यामुळे डोळे शब्दांपर्यंत पोचण्यापूर्वीच ओठ प्रतिज्ञा पुटपुटू लागले आणि एका ओळीपाशी शब्द अडखळले.. "सारे भारतीय माझे बांधव आहेत". शब्दांचं मोल फक्त त्यांचं अबोल मनोगत वाचणारेच जाणोत. येर ते डोळयांना उगीच वृथा ताण देतात. असो. तर सहज डोक्यात किडा आला की भाषावार प्रांतरचना झाली खरी पण त्याने माणसांची मनं दुभंगली गेली असतील का? दिल्लीत कुणाला ठेच लागली तर मुंबईतल्या गल्लीत कुणी कळवळेल का? महाराष्ट्रातल्या पुण्यासारख्या विद्वान शहराने सुद्धा सोवळं सोडून सूट घातला आणि रुद्राक्ष संस्कृती द्राक्ष संस्कृतीत डोकावली म्हणून आधुनिकतेच्या नावाखाली कोणी स्वतंत्र महाराष्ट्र देशाची मागणी केली नाही. राजकीय चौकटींनी आखून दिलेल्या प्रदेशातला प्रत्येक माणूस माझा बांधव आहे आणि त्याच्या सुखदुःखात सहभागी होणं माझं कर्तव्य आहे इतका सरळ सोपा संदेश आपली प्रतिज्ञा देते. पण भारताच्या सुदूर पूर्व भागाची सहल केली असता संपूर्ण निराळं चित्र दिसतं. आता हेच पाहा ना, रविवार सकाळ. भारतातल्या कुठल्याही शहरात असते तशीच नागालँडमधील दिमापूरमध्ये सुद्धा. दहा वाजायला थोडाच अवकाश असल्याने प्रार्थनेसाठी लोथा बाप्टीस्ट चर्च मधे जमणाऱ्या ख्रिस्त भक्तांची लगबग सुरु आहे. लौकर पोचलेल्या भक्तांनी बाकडी पटकावल्याने मागून येणाऱ्या मंडळींसाठी खुर्च्यांची व्यवस्था करणे चालू आहे. उपासक आणि सेवक या गडबडीत आहेत तेवढ्यात उंच टाचांचे बूट, झकपक सूट, विविधरंगी आणि विविधढंगी केशरचना केलेला आणि महागडे टाय ल्यालेला एक नेत्राकर्षक जथा चर्चमध्ये शिरतो. या जथ्थ्याच्या अग्रभागी असलेल्या ली एझुंग या २३ वर्षीय बालेने आज तिचा आवडता काळया पांढऱ्या रंगाचा,प्राण्याची चित्र छापलेला आणि किंचित पारदर्शक टी शर्ट घातलाय. कमरेखाली काळयाच रंगाचा पेन्सिल स्कर्ट आणि त्यावर जाड पांढरा बेल्ट देखील आहे. तिची मैत्रीणही देशविदेशातील महागड्या 'ब्रँडस्'चे कपडे आणि ॲक्सेसरीज घालून आलीय.

शहराच्या दुसऱ्या कुठल्याही भागात तुम्हाला याहून वेगळं दृश्य आढळणार नाही. 'स्पिरीट ऑफ फेथ' चर्च मधून प्रार्थना संपवून बाहेर पडणारी माणसं घरी पोचायच्या गडबडीत आहेत. त्यांच्याकडे पाहून असं वाटतंय की कुठल्याश्या फॅशन मासिकातली रंगीत चित्र पानापानातून बाहेर आलीयत. "हे सारं आमच्या आयुष्याचा आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे", अतिशय सुंदर शिवलेला महागडा सूट घातलेला आणि लंडनमध्ये MBA करणारा तीस वर्षीय सेलेलेझो पुटशुअर सांगत होता. तर याविषयीच अधिक बोलताना झुबेनो म्हणतो, " भारतातल्या इतर कुठल्याही भागापेक्षा आमच्याकडे फॅशनची जाण खूपच चांगली आहे." थोडक्यात सांगायचं तर इथून बाहेर पडलेल्या आणि फॅशन क्षेत्रात नाव कमावलेल्या सगळयाच तरुणाईच्या म्हणण्याचा सारांश एवढाच आहे की दिल्ली किंवा मुंबई सारख्या महानगरातसुद्धा समाजाचा फक्त विशिष्ट वर्गच फॅशनचा जाणकार आहे पण नागालँडमधे अगदी रोजच्या वापरातले कपडे सुद्धा अत्याधुनिक फॅशनचे असतात. त्यांना खात्री आहे की मुंबई आणि दिल्ली मधले तरुण या विधानाला दुजोरा देतील. इथे फॅशनमधला कुठलाही बदल दुर्लक्षित केला जात नाही. किंबहुना रस्त्यातून येणारे जाणारे सुद्धा बाजूने जाणाऱ्या माणसाचा चेहरा पाहण्याआधी त्याचे बूट किंवा पर्स पाहतात. इथल्या फॅशनवर फक्त युरोपिअन किंवा तत्सम पाश्चिमात्य देशांचा प्रभाव नाही तर

कोरीयातल्या पॉप कल्चरचा सुद्धा प्रभाव आहे. एकीकडे पौर्वात्य आणि पाश्चिमात्य फॅशनने तरुणाईला वेडं केलं असताना प्रौढ मात्र साधेसेच कपडे वापरणं पसंत करतात. परंतू हा बदल झाला केव्हा हेही जाणणं महत्वाचं ठरतं. एकोणीसावं शतक साधारण पन्नाशीत पोचलं असताना काही बाप्टीस्ट मिशनरीज आज आपण ज्याला नागालँड म्हणून ओळखतो त्या प्रदेशात पोचले आणि पाहता पाहता काही दशकातच ख्रिश्चानिटीचं लोण संपूर्ण नागालँडमधे पसरलं. आजच्या घडीला इथले नव्वद टक्के मूळ निवासी ख्रिश्चन धर्मात प्रवेश करते झाले आहेत. २००८ साली पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आलेल्या 'सेंटीला यँगर' पोशाखातील बदलाबाबत सांगताना म्हणतात, "मिशनरी जेव्हा इथे पोचले तेव्हा सर्वप्रथम त्यांच्या लक्षात आले की इथल्या जनतेकडे पुरेसे कपडे नाहीत. म्हणून सुरवातीला त्यांनी लोकांमधे पारंपारिक भारतीय कपडेच वाटले. परंतू धर्मांतर केलेल्या स्थानिक जनतेने लौकरच पारंपारिक धोतर 'सोडून' आधुनिक पँट घालायला सुरवात केली. एकंदरच अशाप्रकारे आम्ही आमच्याच जुन्या पशुसम आदिम अवताराची कात टाकून आधुनिक जगातील नवीन 'ख्रिश्चन नागा' म्हणून आमची ओळख निर्माण केली. याच कपड्यांनी १९५० आणि ६० च्या दशकात नागा आणि भारत सरकार यांच्यातील संघर्षात नागा लोकांना आपलं वेगळं अस्तित्व दाखवून देण्यात मोलाची भूमिका बजावली.

यँगर पुढे म्हणतात की आमच्या अभारतीयत्वाच्या भूमिकेमुळे भारतीय कपडे आम्हाला निषिद्ध होते. मला अजूनही आठवतंय की मी १९७० साली बेल बॉटम पँट घालून फिरायची. आमच्या समाजात एखाद्या नागा मुलीने चुडीदार किंवा तत्सम भारतीय पेहराव करून हिंडण्याला नाकं मुरडली जायची. भारतीय मुलांशी लग्न झालेल्या मुलीच फक्त साड्या नेसायच्या आणि त्यांनासुद्धा 'कुलबुडवी' च्या शेरेबाजीला सामोरं जावं लागायचं. साधारण ऐंशीच्या सुमारास काही वैश्यवृत्तीच्या स्त्री पुरुषांनी कपड्याच्या व्यापारातला नफा ओळखला आणि दक्षिण पूर्वेकडील देशांमधे प्रवास करून या व्यापाराची चाचपणी करण्यास सुरवात केली. अगदी सुरवातीला फार थोड्या प्रमाणात सुरु झालेल्या या व्यापाराने लौकरच चांगलंच मूळ धरलं आणि जिथे एकेकाळी एखाददोन झोपड्यांमधून आयात केलेले कपडे विकले जायचे त्याजागी आता दिमापूर मधलं कपड्यांचं 'हाँगकाँग मार्केट' नावाचं सगळयात मोठ मार्केट उभं आहे. आज इथे विविध प्रकारचे भारतीय आणि आशियायी कपडे उपलब्ध आहेत. २५ वर्षीय तेनझीन सांगण्यानुसार इथल्या व्यापाऱ्यांमध्ये तीव्र स्वरुपाची स्पर्धा चालते. हाँगकाँग मार्केट मधे सुमारे १५० ते २०० दुकाने तिबेटीअन व्यापाऱ्यांची तर त्याहून जास्त बंगाली व्यापाऱ्यांची आहेत. तेनझीन जवळच्याच छोट्या छोट्या शहरांमध्ये जाऊन तिथल्या दुकानदारांना मालाची विक्री करतो. चर्चमधे जाणारे कपड्यातल्या नाविन्याला प्राधान्य देत असल्याने ते कपड्यांची फार काळजीपूर्वक निवड करतात. यामुळे इथे कपड्यांचा व्यापार तेजीत चालतो. तेनझीनचे आईवडील सुमारे २० वर्ष हाच व्यवसाय करतायत त्यामुळे त्यांची गादी आता तेनझीन चालवतोय. तेनझीनच्या म्हणण्यानुसार सिक्कीम किवा पश्चिम बंगालमधला व्यापार अनिश्चित असतो. परंतू इथले लोक कपड्यांवर वर्षभर खर्च करतात.

थोड्या वरच्या श्रेणीतल्या खरेदीसाठी शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या सेन्ट्रल प्लाझा किंवा लँडमार्क कॉंप्लेक्स सारख्या जागा आहेत. इथले व्यापारी दक्षिणपूर्व आशिया किंवा भारतातल्या बड्या शहरांमधून मालाची निवड मोठ्या काळजीपूर्वक आणि स्वतः करतात. त्याही पुढे जाऊन ते प्रत्येक प्रकारच्या वस्तूचा फक्त एकेकच नग आणतात जेणेकरून त्यांच्या ग्राहकांना ते वस्तू फक्त त्यांच्याचकडे असल्याचा आनंद मिळतो. इथल्या प्रत्येक ग्राहकाला एकमेवाद्वितीया वस्तूंचा संग्रह करायला आवडतो. कदाचित म्हणूनच दुकानदारांनी बाजारभावापेक्षा चढ्या दराने विक्री केली तरी ग्राहक रित्या होणाऱ्या खिशाची चिंता करत नाही. पुटशुअर सांगतो त्याप्रमाणे इथली सर्वसाधारण व्यक्ती त्याच्या वार्षिक उत्पन्नाचा एक पंचमांश भाग कपड्यांवर खर्च करते. आयात केलेल्या कपड्यांबरोबरच इथल्या स्थानिक लोकांनी बनवलेल्या लग्नाच्या पोशाखांना देखील चांगली मागणी आहे. ज्या दिमापूरमधे सेन्ट्रल प्लाझा किंवा लँडमार्क कॉंप्लेक्स सारख्या ठिकाणी ताज्या

फॅशनची विक्री होते त्याच दिमापूरच्या एका टोकाला कपड्यांचे एक घाऊक मार्केट आहे ज्याचं खर नाव आहे सुपर मार्केट पण स्थानिक त्याला 'नंबर टू' मार्केट म्हणतात. जुन्या कपड्यांच्या या बाजारात 'ब्रा टू बेबी क्लोद' सारं काही मिळतं. पण दिमापूरच्या यौवना इथे येतात ते जुन्या ढंगाचे कपडे आणि बॅग्स खरेदी करायला. लुई विटोन किंवा फेंडी सारख्या महागड्या ब्रॅंड्सच्या बॅग्स अगदी दोन तीनशे रुपयाला सहज मिळतात. म्हणून अशी एखादी पर्स किंवा बॅग घेऊन चाललेल्या मुलीने इंग्रजी 'व्ही' आकाराची खूण करून दाखवली की समजाव की तिने ती 'नंबर टू' मार्केटमधे खरेदी केली आहे. सुपर मार्केटमध्ये विकला जाणारा बहुतांश माल दिल्ली सारख्या ठिकाणाहून येतो. इथले घाऊक विक्रेते जीन्सच्या १०० किलोच्या गठ्ठ्याला पंधरा ते अठरा हजार रुपये मोजतात. काही प्रकारच्या कोरिअन कपड्यांकरता ही किंमत पन्नास हजार सुद्धा असू शकते. या मार्केटमधल्या 'के छुबा' नावाच्या प्रसिद्ध विक्रेत्याने पुरवलेल्या माहितीनुसार इथे तरुणी तसेच मध्यम वयीन स्त्रिया कोरिअन कपड्यांच्या खरेदीकरता नेमाने येतात. कोरिअन टॉप्स आणि फ्रेंच ब्रॅंडचे कपडे अगदी सारख्याच किमतीला म्हणजे सुमारे १५० रुपयाला विकले जातात. हल्लीच येऊ घातलेल्या कोरिअन पॉप कल्चर मुळे फ्रेंच ब्रॅंडसच्या तुलनेत कोरिअन ब्रॅंडसची विक्री पाचपट अधिक होते. नागालॅंडच्या प्रसिध्द फॅशन डिझायनर 'विनगुमेनो केविचुसा' यांच्या पाहणीनुसार कोरियाच्या पॉप कल्चरच्या चलतीमुळे कोरियाच्या कुठल्याही मालावर ग्राहकांच्या ताबडतोब उड्या पडतात. सुमारे एक दशकापूर्वी आलेल्या कोरियन 'अरीरंग टी.व्ही' चॅनल मुळे इथल्या तरुणाईला पहिल्यांदा कोरिअन पॉप कल्चरची ओळख झाली. अरीरंग टी.व्ही चॅनलचे बडे तारे आणि तारका दिसायला तरुण नागा मुलामुलींसारखेच असल्याने त्यांना ते आपलेसे वाटू लागले. त्यांचे कपडेसुद्धा स्थानिक बाजारात सहज उपलब्ध असल्याने इथले तरुण कोरियन स्टार्सची नक्कल करू लागले. केशभूषेपासून सुरवात होऊन ते फॅड वेषभूषेपर्यंत आलं. परंतू सर्वसामान्य नागा माणसाला खंत आहे ती या तरुणाईच मूळ मातीशी असलेलं नातं तुटत चालल्याची. हे तरुण स्वतःला नागा म्हणवतात खरे, परंतू त्यांना त्यांची भाषा येत नाही, त्यांचा इतिहास त्यांना माहित नाही, पण त्यांना कोरियन संस्कृतीबद्दल पुष्कळ माहिती आहे. त्यांना कोरिअन बोलतासुद्धा येऊ लागलं आहे. कोहीमासारख्या ठिकाणी दर आठवड्याला कोरिअन भाषेचे क्लासेस चालतात. एवढेच नाही तर इथल्या दिल्ली बोर्डाच्या शाळेने उर्दूसोबत कोरिअन भाषेचाही पर्याय मुलांना उपलब्ध करून दिला आहे. भले हा पेच स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याचा असेल किंवा खिसेभरू वृत्तींनी मुद्दाम जोपासलेला चंगळवाद, कोरियन संस्कृतीची इथे चलती आहे हे वास्तव कोणी नाकारू शकत नाही. 'सेंटीला यॅंगर' यांच्या निरीक्षणानुसार नागालॅंड हे जणूकाही विमानाची धावपट्टीच झाली आहे. दररोज इथे अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया यासारख्या देशांमधून नवनवी प्रलोभने लॅंड करतायत आणि सगळयांपेक्षा वेगळं दिसायच्या नादात तरुणाई याला बळी पडत आहे. हल्लीच इथे दिसू लागलेल्या फॅशन टीव्हीने इथल्या फॅशनची माहिती पुरवणाऱ्या वेगवेगळ्या ब्लॉग्स आणि वेबसाईटसना पुष्कळ खाद्य पुरवलय त्यामुळे अत्याधुनिक राहण्याच्या या चढाओढीला आता अजूनच चेव चढलाय. खरोखरच इथल्या व्यापाऱ्यांना आता श्रमाचं सार्थक झाल्यासारखं वाटत असणार. चेहऱ्यावर अभिमानाची झलकसुद्धा न झळकवता इथलीच एक फॅशन डिझायनर 'लोथा' म्हणते, "हम हम है, बाकी पानी कम है". हे सगळं पाहून मी तर एवढंच म्हणेन, " लेखीन आपकी बगावत से हमारी आंखे नम है"

# महती वर्डप्रेसची

श्रेया रत्नपारखी

प्रवेश करता येथे
कळफलक टंकू वाटे
बघता क्लिष्ट वाटले जरी
कठीण त्यात काही नसे

वर्डप्रेस ? हे काय आहे नेमकं ? आणि आम्हाला त्याची काय गरज ? असा प्रश्न प्रत्येक वाचकाच्या मनात आत्ता येत असेल. संगणकीय तंत्रज्ञानात तरबेज असलेल्यांना किंवा ज्यांचा स्वत:चा ब्लॉग आहे ते मात्र याबद्दल ऐकून असतीलच. वर्डप्रेस ही एक ब्लॉगरसारखीच, ऑनलाईन ब्लॉगिंग प्रणाली आहे.

वर्डप्रेसमध्ये देखील दोन प्रकार आहेत. एक वर्डप्रेस.ऑर्ग आणि दुसरा वर्डप्रेस.कॉम.

१. वर्डप्रेस.ऑर्ग म्हणजे आपण एखाद्या सर्व्हरवर काही जागा आणि डोमेन नेम विकत घेऊ शकत असलो, तर त्या जागेत वर्डप्रेसची प्रणाली आपण टाकू शकतो. तिथे हवे ते बदल करायला आपल्याला मुभा असते.

२. वर्डप्रेस.कॉम म्हणजे मात्र ब्लॉगरसारखीच. आहेत त्या मर्यादित सुविधांचा वापर करून ब्लॉग तयार करणे. अर्थात यातही पुन्हा css upgradation नावाचा एक पैसे भरूनचा पर्याय आहे. यात दिलेल्या सुविधांमध्ये तुम्हाला स्वत:ला , ब्लॉगचे काही रंग-रूप बदलावेसे वाटले तर त्याकरता css मध्ये जे काही बदल करावे लागतात ते करायची मुभा असते.

आपल्याला आता वर्डप्रेस.कॉम संबंधी माहिती घ्यायची आहे. त्यामुळे आता मी यापुढे जेव्हा वर्डप्रेस असा उल्लेख करीन तेव्हा तेव्हा तो वर्डप्रेस.कॉम संबंधी आहे हे कृपया लक्षात घ्या.

वर्डप्रेस ब्लॉगरसारखीच आहे म्हटलं खरं पण काही मूलभूत फरक या दोघांत आहे आणि तो म्हणजे........

१. ब्लॉगरवरचा ब्लॉग सजवायला तुम्ही जावास्क्रिप्ट कोड वापरू शकता जे वर्डप्रेस.कॉमवर वापरायला मात्र अनुमती नाही. वर्डप्रेसच्या निर्मात्यांच्या म्हणण्यानुसार अश्या कोड्समधूनच ब्लॉगच्या सुरक्षिततेला धोका पोचू शकतो, त्यामुळे जर हे असे कोड वापरायचेच असतील तर खुश्शाल वर्डप्रेस.ऑर्ग वापरा. तुमच्या जागेत काय हवा तो धुमाकुळ घाला ;-)

२. पण असं जरी असलं तरी ब्लॉगचे रंग-रूप बदलण्याकरता वर्डप्रेसकडे बरेच पर्याय उपलब्ध आहेत, जे ब्लॉगरवर वापरयाचे म्हटलं तर कोडींग केल्याशिवाय शक्य नाही आणि त्यामुळेच वर्डप्रेसचं वेगळेपण उठून दिसतं.

आता .कॉम की .ऑर्ग हा डोक्यातला गोंधळ जरा दूर सारा आणि वर्डप्रेस वरचे हे पर्याय समजावून घ्या. खरं तर वर्डप्रेस समजून घेण्याकरता स्व: वर्डप्रेसने ही ट्युट्स तयारी केलेली आहेत, जी इथे वाचता येतील / इथे पहाता येतील.

१. वर्डप्रेस ने 'मराठी 'भाषेला अधिकृतपणे मान्यता दिलेली असल्याने, ब्लॉगवर दर्शनी दिसणारे सर्च किंवा संपादन ही लेबल्स देखील मराठीतून दिसतात आणि तुमचा ब्लॉग जास्त नैसर्गिक वाटतो.

२. ब्लॉग तर तयार केलाय पण त्यावर लिहायचं काय असा प्रश्न पडला असेल तर वर्डप्रेसकडे याचे उत्तर आहे. प्लिन्की नावाच्या एका संकेतस्थळाशी आपला ब्लॉग जोडला की त्यांच्याकडून आपल्याला रोज एखादा विषय मिळतो. शक्य असेल तर लिहिलं नाहीतर सोडून दिलं. पण २०११ च्या सुरूवातीपासून वर्डप्रेसने स्वत:च हे काम सुरू केलयं. आपल्याला रोजच्या रोज ब्लॉग लिहायचा की आठवड्यातून एकदाच, हे एकदा ठरवलं आणि त्याप्रमाणे ह्या ब्लॉग ला भेट दिली की आपल्याला रोज नित्य नवा विषय मिळतो.

३. एकदा वर्डप्रेसवर खाते सुरू केले की,त्या अंतर्गत आपण कितीही ब्लॉग सुरू करू शकतो. आणि प्रत्येक ब्लॉगकरता वर्डप्रेस आपल्याला देतं ३ जीबी जागा...कितीssssss ! ३ जीबी.

४.बऱ्याचदा आपण वेगवेगळी माहिती आपल्या ब्लॉगवर डकवायचा प्रयत्न करत असतो. कधी एखादी विडियो फाईल, कधी ऑडीयो क्लिप, कधी पिडीएफ, कधी दुसरी काही सुविधा. अश्या काही संकेतस्थळ / सेवांशी वर्डप्रेस चे हितसंबंध असल्याने त्यांचा एचटीएमएल कोड ब्लॉगवर डकवण्याची कसरत करण्यापेक्षा, वर्डप्रेस फॉर्मॅट म्हणून निवड केली की आपोआप हवा तो कोड निवडला जातो आणि आपण काम सोप्पं होऊन जातं.

५. वर्डप्रेस ब्लॉगरपेक्षा वेगळं गणलं जाण्याचं एक मुख्य कारण म्हणजे...वर्डप्रेसची कस्टम मेन्यु ही सुविधा. हेडर आणि पोस्ट याच्या मध्ये एक नेव्हिगेशन बार आपल्याला प्रत्येक ब्लॉगमध्ये दिसतो. ब्लॉगरमध्ये जी पृष्ठे आपण तयार करतो त्याची यादी आपल्याला एकापुढे एक दिसते. त्याव्यतिरिक्त काही वर्गवारीची नावे तिथे घालायची झाल्यास टेम्पलेटमध्ये बदल करावे लागतात. वर्डप्रेसमध्ये मात्र याची गरज लागत नाही. तुम्ही काय वाट्टेल ते म्हणजे पृष्ठे, वर्गवाऱ्या, इतर पोस्टचे दुवे इ. घालू शकता. सब मेन्यु तयार करू शकता. थोडक्यात ब्लॉगवर आलेल्या व्यक्तिला एका झटक्यात ब्लॉगची वैशिष्ट्ये जाणवू द्यायची असतील तर कस्टम मेन्युसारखी सोय़ असणं गरजेचे आहे.

६. दुसरी एक सोय म्हणजे फिचर्ड इमेजेस. याचा अर्थ या सोईचा वापर करून आपण प्रत्येक पोस्ट्करता / पेजकरता वेगळे हेडर दाखवायची व्यवस्था करू शकतो. अर्थात सगळयाच टेम्पलेट्करता ही सोय उपलब्ध नाही..काही ठराविक टेम्पेलेट ही सोय देऊ शकतात.

७.वर्डप्रेस मध्ये ब्लॉगरसारखी एचटीएमएल मध्ये बदल करण्याची मुभा नसल्याने टेम्पलेट मध्ये बदल करता येत नाहीत, इतकंच काय पण ब्लॉगरसारखी हवी ती टेम्पलेट उचलून बदलण्याचीही मुभा नाहीये. पण तरी देखील आजपावेतो १०२ मोफत टेम्पेलेट्स आणि १५ प्रिमियम पेड टेम्पेल्ट्स वर्डप्रेसने स्वत: उपलब्ध करून दिलेल्या आहेत. आपल्या आवश्यकतेनुसार आपण हवी ती टेम्पलेट निवडून ब्लॉगचे रंग-रूप बदलू शकतो.

८. तिसरी एक सोय वर्डप्रेसमध्ये आहे,ती म्हणजे स्टिकी पोस्ट. एखादी महत्वाची पोस्ट तुम्हाला सातत्याने ब्लॉगच्या मुखपृष्ठावर दिसावी असं वाटत असेल तर त्या पोस्टला प्रकाशित करताना स्टिकी पोस्ट म्हणून प्रकाशित करावे.

९. दिवसभर आपण इतक्या गोष्टी जालावर वाचत असतो. सगळ्याच नाही,पण काही गोष्टी आपल्याला आपल्या वाचकांपर्यंत आवर्जून पोचवाव्या असे वाटते. अश्या वेळी वर्डप्रेस आपल्याला प्रेस धिस नावाचे एक बुकमार्कलेट देते, जे आपल्या ब्राऊजरच्या टुलबारमध्ये लावायचे असते. एखादी आवडलेली बातमी /पृष्ठ शेअर करण्याकरता ह्या बुकमार्कलेटचा वापर करायचा, की त्या बातमीचा सारांश त्याच्या दुव्यासकट आपल्या वर्डप्रेस पोस्ट एडीटरमध्ये दिसतो, त्याला नाव, वर्गवारी देऊन आपण ते प्रकाशित केले तरी त्यात मुळ पानाचा दुवा असल्याने आणि बातमी पूर्ण नसल्याने आपल्यावर चौर्यकर्माचा आरोप तरी येऊ शकत नाही. बाकी एखादी बातमी अशी शेअर करायला मूळ मालकाची काहीच हरकत नसावी.

१०. आपल्याच एखाद्या पोस्टशी संबंधित आपल्याच ब्लॉगवरच्या आणि इतर ब्लॉगवरच्या पोस्ट आपल्या पोस्ट खाली दिसण्याकरता रिलेटेड पोस्ट चा वर्डप्रेसकडे आहे.पण दुर्दैवाने तो फक्त इंग्रजी ब्लॉग करताच चालतो.

११. आपल्या ब्लॉगवर आपण एखादा दुवा दिलेला असेल तर; तो दुवा असलेले पान कसे दिसत असेल याची झलक स्नॅप टू ईट या विजेट्द्वारे पाहाता येते. दिलेल्या दुव्यावर माऊस नेला असता त्या दुव्याचा स्नॅपशॉट दिसतो.

१२. ब्लॉगरमध्ये फक्त १० पानांचीच परवानगी आहे. अर्थात एचटीअएमेल मध्ये बदल करून ही संख्या वाढवता देखील येते. पण वर्डप्रेस मात्र अमर्यादीत पाने तयार करायची मुभा देते.

१३. तयार केलेल्या पानावर फक्त मजकूरच हवा की बाजूला साईडबार विजेट देखील हवी हे ठरवण्याचा अधिकार देखील वर्डप्रेस आपल्याला देतं. प्रत्येक पानाला एकच मापदंड नाही. एखाद्या पानावर आपण साईडबार विजेट दाखवू शकतो, एखाद्या पानावर गरज नसेल तर काढूही शकतो. ही सोय आपल्याला मिळते पेज ऍट्रिब्युट मुळे.

१४. एखादा विडीयो, एखादी ऑडीयो क्लिप, एखादा दोन-चार ओळींचा सुविचार, फोटो गॅलरी हे सगळं नेमक्या वेगळेपणाने दाखवण्याची सोय आहे. आपण फक्त पोस्टचा प्रकार निवडायचा, की त्यापमाणे पोस्ट दिसत अर्थात हे बरचंस टेम्पलेटवर अवलंबून आहे.

१५. आपण लेख तर लिहिला; पण लोकांना कळणार कसं आपण काहितरी ताजं लिहिलं आहे यावर ? वर्डप्रेसवरचे लेख तुम्ही आपोआप आणि ताबडतोब फेसबुक प्रोफाईल / किंवा आपल्या मालकीचे फेसबुक पेज, ट्विटर, लिंक्ड इन, याहू आणि लाईव्ह मेसेंजर इ. ठिकाणी पाठवायची व्यवस्था करू शकता. इथे लेख प्रसिद्ध झाला रे झाला की त्याचा दुवा तिथे पोचलाच म्हणून समजा. तुमच्या मित्रमंडळींना त्याची माहिती लगेचच मिळते. हा ! आता ते वाचतात की नाही हा भाग अलहिदा ;-)

१६. समजा तुम्हाला लेख लिहायला वेळ नाहिये पण आलेला एखादा ईमेल तुम्हाला तुमच्या ब्लॉगवर प्रसिद्ध करायचा असेल तर इथला मजकूर कापून तिथे डकवत बसायची अजिबात गरज नाही. वर्डप्रेस ने आखून दिलेल्या सूचनांचं पालन करून आणि त्यांच्या दिलेल्या फॉर्मेट मध्ये आपण त्यांना, त्यांनी आपल्याला ठरवून दिलेल्या ईमेल वर फॉरवर्ड करू शकतो.

१७.	इतकंच कशाला, समजा आपण कुठेतरी बाहेर आहोत,जवळ संगणक, इंटरनेट नाहीये पण आपल्या वाचकांना काहीतरी महत्वाची बातमी सांगायची आहे तर काय कराल ? आता बऱ्याचशा लोकांकडे स्मार्ट फोन आहेत हो, तुम्ही म्हणाल, त्यावरून लेख पोस्ट करू, त्यात काय मोठ्ठंसं ! हे ही खरंच म्हणा ! पण मग एखाद्याकडे स्मार्ट फोन देखील नाहीये, फोन मध्ये इंटरनेट जोडणी करता जीपिआरएस ची सोय देखील नाहीये. आता काय कराल ? बोला ! सोप्पं आहे. वर्डप्रेस च्या पोस्ट बाय व्हॉईस ची मदत घ्या. अगदी साध्या लॅंडलाईनचा वापर करून देखील तुम्हाला आपल्याला आपलं म्हणणं वाचकांपर्यंत पोचवता येतं.

१८.	समजा सुरूवातीला आपण वर्डप्रेस.कॉम वर ब्लॉग चालू केला पण मागाहून ही सगळी बंधनं नको वाटली तर वर्डप्रेस.कॉम वरून वर्डप्रेस.ऑर्ग वर आपला आख्खा ब्लॉग हलवायची मुभा तर आहेच,शिवाय काही पैसे भरले तर आपल्याला वर्डप्रेस या सगळया ट्रान्सफरमध्ये मदत देखील करते.

१९.	एखादा लेख आपण लिहिला पण त्यातील काही माहितीबद्दल आपण साशंक असू तर वर्डप्रेसच्या रायटींग हेल्पर मार्फतच आपण एक किंवा अनेक मित्र-मैत्रिणींना आपण लिहिलेला लेख पाठवू त्यात दुरुस्त्या सुचवायला सांगू शकतो, मत विचारू शकतो.

२०.	समजा येणाऱ्या वाचक व्यक्तीचे वर्डप्रेसवर खाते नाही पण फेसबुक किंवा ट्विटर वर खाते आहे आणि आपल्या एखाद्या लेखावर त्या व्यक्तिला मत मांडायचे झाल्यास आपले फेसबुक अथवा ट्विटर खात्याद्वारे प्रवेश करून आपले मत मांडू शकतात. त्याकरता वर्डप्रेसचे खातेधारक असण्याची बिल्कुल आवश्यकता नाही.

२१.	आपल्या ब्लॉगवर येणाऱ्या वाचकांना आपला ब्लॉग फॉलो करायची इच्छा असेल तर फॉलो नावाचं एक बटण खाली तळाशी दिसतं, त्यावर टिचकी देऊन , उघडून, त्यात आपला ईमेल आय़डी वाचकाने दिला की आपसूक त्या ईमेलवर आपले लेख वाचकांना मिळतात.

२२.	ट्विटर वर १४० अक्षरांच्या मर्यादेत इतकी भरगच्च माहिती आपल्याला क्षणोक्षणी मिळत असते, ती जर आपल्याला आपल्या ब्लॉगवर शेयर करायची झाली तर काय करणार ? नुसता त्या ट्विटचा दुवा देऊन त्यात काही गंमत नाही. एखाद्या वाचकाला त्या ट्वीटला उत्तर द्यायचं असल्यास, री ट्विट करायचे असल्यास किंवा फेव्हरीट करायचे असल्यास ते इथेच ब्लॉगबसल्या ;-) म्हणजे ब्लॉग वाचता वाचता करू शकतात ते ट्विटर ब्लॉकबर्ड पाय या सोयीमुळे.

२३.	आपल्या लेखांवर वाचकांच्या प्रतिसादाची अपेक्षा तर आपण करतोच, त्यासाठी प्रत्येक लेखाखाली एक छोटासा प्रतिसाद देण्याकरता फॉर्म असतो, नाव,ईमेल पत्ता आणि प्रतिसाद इतकीच माफक माहिती त्यात भरायची असते. पण त्याव्यतिरिक्त काही जादा माहिती आपल्याला वाचकांकडून हवी असल्यास काय करणार ? त्यावेळी वर्डप्रेसचा फॉर्म बिल्डर आपल्या मदतीला येतो.

२४.	आपल्या वाचकांशी संवाद साधण्यकरता पोल ( मतदान) घेणं हा सगळयात चांगला पर्याय आहे. वाचकांचे मत विचारात घेतल्याने त्यांनाही महत्व मिळते. त्याकरता वर्डप्रेस चा पोल पर्याय उपयुक्त आहे.

२५. आपल्या लेखात त्याविषयासंबंधी काही छायाचित्र, इतर दुवे, टॅग्ज जर्जोडायचे असतील तर वर्डप्रेसचचे झेमंटा या सेवेशी असलेले हितसंबंध कामी येतात. अर्थात हा पर्याय फक्त इंग्रजी भाषेतील ब्लॉग्जकरताच उपयुक्त आहे.

२६. अर्र्रर्र, वर्डप्रेसबद्दल आपल्याला आत्ता माहिती मिळाली पण जर काही दिवस आपल्या हाती ही माहिती लागली असती तर आपण वर्डप्रेसवरच ब्लॉग तयार केला असता. असं वाटतंय ना ? काही हरकत नाही...अजूनही वेळ गेलेली नाही. काळजी नसावी. वर्डप्रेसच्या आयात सेवेबद्दल माहिती करून घ्या. तुमचा ब्लॉग कोणत्याही ठिकाणी असला तरी तो वर्डप्रेसवर आयात करता येईल.

२७. याखेरीज वर्डप्रेसने छायाचित्रे स्लाइडशो मार्फत दाखवणे, पोस्ट / पेज ला पासवर्ड देणे, एकच मोठ्ठी पोस्ट अनेक पानात विभागणे यासारख्या उपयुक्त सोयी उपलब्ध करू दिलेल्या आहेत. काही अपवाद वगळता एकही पैसा न भरता त्या वापरता येतात. आणि नेमक्या अशाच सोयी वापरण्याकरता ब्लॉगरवर एचटीएमएल मध्ये बदल करत बसावे लागतात. म्हणूनच केवळ एक जावास्क्रिप्ट वापरता येत नाही या कारणाकरता खट्टू होऊन अनेकदा माझा ब्लॉग वर्डप्रेसवरून ब्लॉगरवर हलवायचा विचार केला तरी वर्डप्रेस अश्या काही सुधारणा घेऊन सामोरं येतं की पुन्हा नव्याने त्याच्या प्रेमात पडावसं वाटतं :-) , त्या अर्थी ही लव्ह ऍण्ड हेट रिलेशनशिप आहे म्हणायला हरकत नाही.

( या लेखातले तंत्रज्ञानाशी संबंधित असलेले शब्द, वाचकांच्या गोंधळात भर पडू नये याकरता मराठी प्रतिशब्द न शोधत बसता इंग्रजीतच वापरलेले आहेत.)

# ❋ न्यायमुर्ती कै. रामचंद्र शंकर वझे - आद्य मराठी ऩाडीग्रंथ शोधक

विंग कमांडर (नि) शशिकांत ओक

प्रस्तावना

नाडी ग्रंथांची ओळख मराठी लोकांना आता नवलाईची राहिली नाही. गेल्या १५-२० वर्षांच्या काळात महाराष्ट्रातील अनेक शहरात नाडी ग्रंथ भविष्य पहाण्याची – अनुभवायची सोय आता झाली आहे. या अदभूत भविष्य कथनांचा महत्वाचे वैशिष्ठ्य असे की ताडपट्यावर कोरुन लिहिलेले हे भविष्यकथन तमिलभाषेत असून मोडीसारख्या कूट लिपीत ते  नोदवून ठेवलेले आढळते. आपल्या हाताच्या (पुरुषांसाठी उजव्या व स्त्रियांच्या डाव्या) अंगठ्याच्या ठशांवरून योग्य ते ताडपत्राचे पान शोधले जाते आणि त्यात व्यक्तिचे नाव, जन्मदिनांक, शिक्षण, नोकरी -व्यवसाय आदीची माहिती कोरून येते आणि पुढील आयुष्याचे थोडक्यात भविष्यकथन केले असते. माफक फीत ते आपल्याला उपलब्ध होते. त्याचा अनेकांनी प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे.

हवाईदलातील विंग कमांडर शशिकांत ओक या प्रस्तूतच्या लेखकाला, विविध भाषेतील पुस्तकातून, भाषणातून, चर्चेतून या विषयाला चांगलाच उजाळा देता आला. मराठी वाचकांची उत्सुकता प्रचंड प्रमाणात जाग्रृत होऊन हजारोंच्या संख्येने नाडी ग्रंथांचे अवलोकन केले जाऊ लागले. त्यातूनच मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापुर, सांगली, सोलापुर, अकोला, नाशिक, जळगाव, धुळे आदि शहरात नाडी ग्रंथ केंद्रांची स्थापना झाली. त्यांची महाराष्ट्रातील सध्या संख्या ४०च्यावर आहे. संपुर्ण भारतात देखील नाडी केंद्रांचे जाळे पसरले आहे. २००पेक्षा जास्त नाडी केंद्रांच्या पत्याची यादी नुकतीच “Naadi Predictions  - A Mind Boggling Miracle “ व “नाडीग्रंथ भविष्य - चौंका देनेवाला चमत्कार” या अनुक्रमे इंग्रजी व हिंदी पुस्तकात उपलब्ध आहे. शिवाय तमिळ, गुजराथी भाषेत पुस्तके प्रकाशित झाली आहे. कानडीतून लेखमालिकेच्या स्वरूपात ‘कर्मवीरा’ या साप्ताहिकातून काही भाग प्रकाशित झाला आहे.

या सर्वावरून असे लक्षात येते की नाडी ग्रंथ हा विषय चेष्टेवारीचा किंवा तथातकथित विज्ञानवाद्यांनी “थोतांड आहे” म्हणून टाळण्याचा नाही. कै. रा. शं. वझ्यांच्या सारख्या न्यायमुर्तींनी ज्यांची पूर्ण हयात “पुराव्याशिवाय मान्य करणार नाही” या बाण्याने केलेल्या निस्पृह व सचोटीच्या नोकरीत (सन १९२६ ते १९५४) गेली अशा व्यक्तीनी यावर अभ्यास करून अनेक विज्ञानवाद्यांना नाडीग्रंथांबद्दल आणखी अभ्यासपुर्ण शोध घेणे कसे आवश्यक आहे असा पाठ घालून दिला आहे.

असे म्हणता येईल की याची सुरवात वाङ्मयशोभेच्या सन १९५९ व ६३ दिवाळी अंकातील कै. शांताराम आठवले यांच्या भृगु संहितेवरील लेखातून झाली. ते लेख खूप लोकप्रिय झाले. १९६८च्या दसऱ्याच्या मुहुर्तावर त्य़ा लेखात आणखी भर घालून एकत्रित पुस्तक निर्मित झाले त्याचे नाव होते – “नाडी ग्रंथ - एक अभ्यास”. आजही हे पुस्तक नाडीग्रंथांवरील माहिती देणारे पहिले पुस्तक मानले जाते.



*१ न्यायमुर्ती कै रामचंद्र शंकर वझे.*

'नाडी ग्रंथ – एक अभ्यास' या पुस्तकात न्यायमुर्ती कै. वझे यांचा उल्लेख प्रकर्षाने आला आहे. त्या मधून कै. वझे यांचे व्यक्तिमत्व थोडक्यात साकार होते. त्यांचे तीन नंबरचे चिरंजीव प्रभाकर रामचंद्र वझे (वय ७२) यांच्य़ाक़डे त्यांच्या वडिलांच्या अर्थात कै. रा. शं. वझ्यांच्या हस्ताक्षरात लिहून ठेवलेल्या वह्या व त्यांच्याशी संबंधित अनेक नातलगांच्या नाडीकथनांच्या एका रजिस्टरनुमा बाडात नोंदी संग्रहित आहेत. प्रभाकर यांच्यापाशी अशी एक ताडपट्टी देखील आहे. ज्यावर कूटतमिळ ऐवजी "इंग्रजी" मध्ये नाडीकथन कोरलेले आहे. (प्रस्तूत लेखकाला अशा तऱ्हेची इंग्रजीत लिहिलेली ताडपट्टी प्रथमच पहायला मिळाली) प्रभाकर व त्यांचे अन्य बंधू अनुक्रमे मोठे विनायक(८१) दत्तात्रय (७८), व धाकटे अरुण (७०) यांनीही काही रंजक आठवणी सांगितल्या. त्या सादर करीत आहे.

आपल्या वडिलांच्या आठवणी सांगताना प्रभाकर म्हणतात, "माझ्या वडिलांचा ज्योतिषाचा अभ्यास होता. त्यांना ग्रहस्थितीचे बारकावे व त्यांचे प्रभाव याचे सखोल ज्ञान होते. त्यांनी तरुणपणी मुंबईतील नंदी नाडीवाचकाकडून आपले भविष्य १९२५च्या सुमारास पाहिले होते. नंतर कारणपरत्वे त्यांनी देशातील उत्तरभारतापासून दक्षिणेत तमिळनाडूमधील अनेक नाडी केंद्रांना भेटी दिल्या. त्यामधून त्यांनी पाराशर होरा, शुक्र नाडी, रवी नाडी, ब्रह्म नाडी अशा विविध संहिता व नाडी पट्ट्या अवलोकन केल्याचे दिसून येते. मिळवलेल्या भविष्यांची कथने त्यांनी एका रजिष्टरमधे इंग्रजी भाषेत लिहून ठेवलेली आढळतात."



*२ प्रभाकर रामचंद्र वझे*

प्रभाकर पुढे म्हणतात, "आम्हा प्रत्येक भावासाठी त्यांनी एक एक रजिष्टर बनवले होते. त्यांचे व वरिष्ठ बंधू विनायक यांचे रजिष्टर आजही जपून ठेवलेले आहे. त्यातील उल्लेख फारच अदभुत आहेत. काही उदाहरणे

कथन करताना प्रभाकर म्हणाले, “मला MES (Military Engineering Service) मधे असिस्टंट गॅरिसन इंजीनियरपदावर नोकरी मिळाली. लोहगावच्या हवाईदलातील विभागात त्यांचे काम व कार्यालय होते. काही महिन्यात त्यांना सरकारी कामात रस वाटेना. नोकरीची रजिनामा देण्याचे मनावर घेतले तेंव्हा त्यांना वडिलांनी थांबायला सांगून नाडी कथानातून काय आदेश मिळतो का हे पाहण्याला वयाच्या ६५ व्यावर्षी ते मुद्दाम मद्रासला गेले. ही गोष्ट साधारण ६४ सालची असावी. तेथे नाडी वाचक नयनार यांच्याकडील शुक्र नाडीतून ‘सध्या नोकरी करावी लागेल’ असे लिहून आल्यामुळे प्रभाकरांनी राजिनामा देण्याचा बेत वडिलांच्या आदेशावरून रहीत केला. पुढे ते बढती मिळून जीई (गॅरिसन इंजिनियर)झाले. त्यावेळी सिव्हील कामात लोहगावच्या तळावरील अनेक इमारती व घरे बांधली गेली. ते सहज म्हणाले, ‘आम्ही तेव्हा ९२ बी मधे रहात असू’. (प्रस्तूत लेखक ही हवाईदलात असताना लोहगावच्या पोस्टींग मधे ९१ बी या त्यांच्या शेजारच्या क्वार्टरमधे ३५ वर्षांनंतर १९९९ ते २००१ पर्यंत राहत होता) पुढे ५ वर्षांनी मात्र पुणे सोडून प्रभाकरांना दूर पोस्टींगला जाण्याची वेळ आली तेंव्हा घरची सर्व परिस्थिती विचारात घेऊन वडिलांच्या विनंतीला मान देऊन ती नोकरी त्यांनी सोडली व स्वतःचा कॉंट्रॅक्टरचा व्यवसाय सुरु केला. याचा ही उल्लेख नाडी कथनात पुर्वी आला होता.

दरम्यान त्यांना नंदिना ‘मुलगी’ झाली तिचे नाव ‘न-द-न’ अशा अक्षरात असेल हे ही खरे ठरले, नंदिनी नंतर प्रभाकरांना अपत्ये काय होतील? असे त्यांच्या वडिलांनी रवी नाडीत सन ६७च्या सुमाराला विचारले. तेंव्हा तिच्या पाठीवर ‘मुलगा’ होईल असे म्हणून त्याची कुंडली मांडून ग्रहस्थिती दाखवली गेली. पुढे १९६९ मधे प्रभाकरांना ‘मुलगा’ झाला त्याचे नाव ‘सुहास’ असे ठेवण्यात आले. त्याच्या जन्मानंतर पाहिल्या गेलेल्या ‘ब्रह्म नाडी’मधील त्यांच्या वडिलांच्या रजिष्टर नोंदीप्रमाणे तेंव्हा नुकत्याच जन्मलेल्या नातवाची ग्रहस्थिती नेमकी तीच वर्णन केली होती फक्त लग्न ‘कर्के’ ऐवजी ‘मकर’ असे होते. असे त्यातून अभ्यासले असता लक्षात येते.

नंदिनी ५वर्षांची असताना तिच्याबद्दलचे अनेक उल्लेख आश्चर्यकारकपणे पुढे बरोबर आले. उदाहरणार्थ, शिक्षणात तल्लख, कॉमर्सची पदवीधर, विवाहानंतर नागपूरला व त्यानंतर काही वर्षांनी मद्रासला जावे लागेल, नंतर कॉम्प्यूटरचे शिक्षण घेऊन ‘उपदेशक’ म्हणजे ‘शिक्षिका’ होईल. पुढे आणखी काळानंतर आपली स्वतःची संस्था काढून त्यात शिक्षणदेण्याचे कार्य करेल. (ती M. Com ला first class first आली होती) व (ते अगदी बरोबर झाले आहे कारण विवाहानंतर नागपुरला, मद्रासला NIIT मधे दहा वर्षे काम करून नंदिनी सध्या दोन मुलींसह ‘वृक्ष’ नावाने ती शिक्षणसंस्था तेथे चालवते आहे) प्रभाकर म्हणाले, ‘सन १९६७ सालात ‘कॉम्प्युटर’ ही संकल्पना फक्त माहिती होती. मात्र प्रत्यक्षात ते काय असते याची भारतात कोणालाच महिती नसताना त्याचा आवर्जून आलेला उल्लेख विशेषत्वाने मला चक्राऊन टाकणारा वाटतो.’एकदा एक मुलगी तिचे कथन ऐकायला बसली होती. नाडी शास्त्री वाचताना अढखळला. कारण त्यात तिला विवाहसौख्य नसल्याचे लिहिले होते. (त्या काळात ती आधीच घटस्फोटिता होती व पुढे ही कथनाप्रमाणे अविवाहितच राहिली!)

आपल्या सुहास नावाच्या मुलाबद्दल सांगताना ते म्हणतात, ‘त्याला विमानाशी निगडीत (नाडी पट्टीत विमानाला ‘जटायू’ असा उल्लेख आला आहे) तो नोकरीत असेल. पण पायलट नसेल. हे कथन ही अगदी अचुक आहे. त्याचा विवाह विदेशी (प्रत्यक्षात फिलिपायनी) व्यक्तीशी पुण्यात होईल व तो परदेशातच स्थायिक होईल असे कथन त्याच्या बालपणी २-३ वर्षाचा असताना केलेले कथन ही नंतर बरोबर आले.

आपल्या जुन्या आठवणी सांगताना प्रभाकरांच्या पत्नी सौ. सुवर्णा म्हणाल्या, 'आमच्या या विवेक बंगल्यातील – जेथे आपण सध्या गप्पा मारतोय - या हॉलमधे आमच्याकडे त्यावेळी तमिळ नाडीवाचक राहायला आलेले होते. चांगले महिनाभर राहिले होते. त्यांच्या आवडीचे जेवण जवळच्या हॉटेलातून मागवले जात असे. त्या नाडी वाचकांचे नाव आता लक्षात नाही पण ते नयनारांचे जावई होते. त्यांची पत्नी जमेल तशा इंग्रजीतून तमिळमधून भाषांतर करून सांगत असे. आमच्या श्वशुरांच्या मित्रमंडळींचे व काही नातलगांचे कथन ते स्वतः मराठीतून कच्चे व नंतर इंग्रजीत पक्के करून रजिष्टरमधे नोंदवत असत. अनेकांनी त्या महिनाभरात नाडी ग्रंथांचे अवलोकन केले होते. त्यानंतर असे कोणी तमिळ नाडी ग्रंथवाचक आमच्या घरात येऊन राहिल्याचे आठवत नाही.'

प्रभाकर यांनी नंतर ते जेंव्हा मुलीकडे चेन्नईला गेले असताना अलीकडच्या काळात म्हणजे १७ सप्टेंबर, १९९८ला ज्या नाडीग्रंथांनी वडिलांना आकर्षित केले होते त्या नाडी ग्रंथांचे आपणही अवलोकन करुया असे वाटून कांचीपुरमच्या डी बालासुब्रमण्यम यांच्या अगस्त्यनाडी केंद्रातून पाहिले.

विनायक हे कै. वझ्यांचे मोठे चिरंजीव. त्यांच्या बद्दलचा उल्लेख कै. शांताराम आठवल्यांच्या पुस्तकात आला आहे. शेंदुर्णी (खानदेशात) जन्म. वडिलाच्या व्यवसायाचे 'लॉ'चे शिक्षण. काही काळनंतर जज म्हणून नोकरी कराल वगैरै कथन तंतोतंत खरे ठरले. दि. १६ ऑगस्ट १९६४ला वडील त्यांची शुक्र नाडीपट्टी पहात असताना त्यांना सोलापूरहुन दिल्लीला (हस्तिनापुर नाडीतील उल्लेख) जाण्याचा योग आहे. तेथे पाच भाषांसाठी काम करावे लागेल. काही काळानंतर परत याल व वरच्या हुद्यांवर काम करता वडिलांपेक्षा जास्त मानमरातब मिळवाल. दोन मुलगे होतील. (मोठा संजीव, परदेशात स्थायिक होईल. त्याच्या आजोबांप्रमाणे बहु भार्यायोग आहे व धाकटा संदीप.) माझ्या वडिलांचे तीन विवाह झाले. तेच माझ्या मुलाच्या नशिबी पण आले.

विनायक आपल्या वडिलांच्या आठवणींबद्दल सांगताना म्हणाले, 'वडिलांचा जन्म ३० मार्च १८९९चा. देहावसान २८ जानेवारी १९८७ झाले. लॉची पदवी मुंबईतून मिळवताना हिंदू लॉसाठी ते सुवर्णपदकाचे मानकर होते. वकिली करण्याचा विचार असताना तात्कालिक कारणांनी त्यांना जजच्या नोकरीसाठी अर्ज करावा लागला. अर्जाचा रीतसर नमुना मित्राला दिल्याने त्यांनी ऐत्यावेळी साध्या कागदावर केलेला नोकरीचा अर्ज मंजूर होऊन ते नोकरीत रुजू झाले. पुढे त्यांनी महाराष्ट्रात विविध ठिकाणी जिल्हा मॅजिस्ट्रेटच्या पदांवर काम करून वयाच्या ५५व्या वर्षी म्हणजे सन १९५४मधे निवृत्ती पत्करली. वडीलांना टेनिस खेळायचा षौक होता. तसेच ते निष्णात ब्रिज खेळत. रँग्लर महाजनी व रँगलर परांजपे त्यांच्या अनेक स्नेह्यांपैकी होते. काही काळ ते मुंबई उच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार होते. सांगलीकर संस्थानिकांचे कायदा सल्लागार म्हणून काम केल्यावर त्यांची नियुक्ती प्रभात फिल्म कंपनीच्या पडत्याकाळी लिक्विडेटर म्हणून झाली होती. पुण्यातील बालगंधर्व चौकात येणाऱ्या घोले रस्त्याला मिळणाऱ्या रस्त्याला सध्या कै. रा.शं. वझे मार्ग असे नाव आहे. तेथे त्यांचा विवेक बंगला आहे. आम्ही तिघे भाऊ सध्या इथे राहातो. दत्तात्रय हा सख्खाभाऊ डॉक्टर होऊन आर्मीत कर्नल हुद्यावरून निवृत्त झाला.

त्यावेळच्या नाडीपट्यात पत्नीचे माहेरचे नाव हटखून येत असे. जसे आमची आई - वडिलांची दुसरी पत्नी. जानकी (क्र.२) तिचे माहेरचे नाव वेणू. प्रभाकर व अरुणच्या आईचे जानकी (क्र.३) तर माहेरचे नाव दुर्गा. नाडी पट्टीतून अचुक लिहिले होते. माझी पत्नी सुनीतीचे शकुंतला, प्रभाकरची पत्नी सुवर्णाचे आधीचे नाव जयश्री वगैरे

उल्लेख आश्चर्यकारक वाटतात.

दत्तात्रय म्हणाले, 'मी आर्मीत असताना होशियारपुरमधील भृगु संहिताचे अनुभव घ्यायला तीनदा जाण्याचा योग फसला. चौथ्यांदा पावसात जाण्याची पाळी आली व काही कष्टाने कथनाच्या पट्या मिळवल्या. त्यावेळी नोकरीतून निवृत्तीचे विचार येत होते. याचा उल्लेख आला व सध्या नोकरी सोडता येणार नाही. असे कथन नोकरी पुर्णकरून झाल्यावर खरे ठरले. ते मद्रासला पोस्टींगवर असताना त्यांची इच्छा असून ही तमिळमधील नाडीचा अनुभव त्यांना घेता आला नाही. त्याकाळच्या प्रथेनुसार मुले वडिलांपासून चार हात दूर असत. त्यामुळे वडिलांशी सलगी करून त्यांच्या नाडीग्रंथांवरील अनुभवांबद्दल किंवा मतांवद्दल अधिक माहिती मिळवणे शक्य झाले नाही. असे सर्व बंधूंचे मत पडले.

जसे वझ्यांच्या नोंदीतील अनेक कथने अचुकपणे घटित झाली तर काही कथने घडली नाहीत. उदा. संदीप या विनायकांच्या दुसऱ्या मुलाचे शिक्षण वडील व आजोबांसारखे लॉचे न होता कॉमर्सचे झाले व पुढील कथन अचुक आले नाही. विनायक यांचे शिवाजीनगर शिवाय आणखी एक घर पुण्यात मुकुंदनगरमधे होईल हे कथन घडले नाही. नाडी पट्यात एखाद्या शहरातील शिवाजीनगर, मुकुंदनगर अशा उपनगरांचा उल्लेख आल्याचा अनुभव प्रस्तूत लेखकाला प्रथमच होता.

प्रभाकरांना आणखी एक मुलगा व मुलगी होईल ते घडले नाही. प्रभाकरांचा मुंबईत व्यवसाय होईल असे घडले नाही. पण एका कच्छी गुजराथी माणसाशी व व्यवसायासाठी मित्रता होईल हे घडले. त्यांची नावे प्रतापभाई व अनिलकुमार अशी नाव असतील ती नव्हती. प्रभाकरांचा नव्या प्रकारच्या मातीच्या विटा बनवणे आणि धातूंच्या मिश्रणाच्या कामाशी संबंध असेल. सिमेंट्च्या विटा व पोलादी बांधकामाचे साहित्य मानले तर ते भाकित म्हणून खरे ठरते. जानकी नं ३ वडिलांच्या आधी न जाता सन २००६ पर्यंत जीवंत होत्या.

प्रभाकरांनी मोठ्या मनाने वडिलांच्या हस्ताक्षरातील लेखनसाहित्य व ताडपट्या हाताळायला दिल्या. वडिलांचे भारदस्त व्यक्तिमत्व व ज्योतिषाचा अभ्यास व नाडीशास्त्रींना हाताळायचे कसब यामुळे अलंकारिक तमिळभाषेतील कथन समजणे एक कसरत होती. असा अवघड प्रवास वडिलांनी विशेषतः निवृत्तीच्या काळात वयाच्या ६० नंतर भारतभर करून करून दाखवला.

कै वझ्यांनी नाडीग्रंथ अभ्यास कार्याचा महाराष्ट्रात पाया घालून नाडी ग्रंथांना अवलोकण्याची प्रेरणा दिली व कथनांच्या नोंदी करण्याचा वस्तुपाठ घातला असे म्हणावे लागेल. आज नाडी ग्रंथांची २०० पेक्षा जास्त केंद्रें भारताच्या विविध भागात चालू असून नाडी लेखनाचा अभ्यास तमिळ भाषा व लिपीचे सखोल ज्ञान असणाऱ्या हैयोहैयैयो सारख्या तज्ज्ञांकडून होत आहे ही मराठी लोकांसाठी विशेष अभिमानाची गोष्ट आहे.

कै. रा.शं. वझ्यांच्या स्मृतीला आठवण म्हणून दि. १४ ऑक्टोबर २००७ला नाडीग्रंथांवरील पुण्यात संपन्न झालेल्या पहिल्या नाडी ग्रंथ ज्योतिष अधिवेशनात श्री. प्रभाकरांचा शाल श्रीफळ व गौरवचिन्ह देऊन सत्कार केला गेला.

# ✵ फेसबुक – मी, आम्ही,तू ,तुम्ही, ते, त्या, ती, सर्वांसाठी

✍ विनायक फडके

विकले जाईल ते बनवायचे हा व्यावसायिकक खाका. प्रत्येक व्यावसायिकाचा असतो. प्रत्येक प्रोडक्शन हे गिऱ्हाईकाची गरज लक्षात घेऊन केले कि माल नक्की विकला जातो. हे तंत्र ज्याला जमलं तो उत्तम धंदेवला होतो.भौतिक जगात भौतिक प्रोडक्शनला महत्व आहे.
उदाहरणार्थ घरगुती संसारी गोष्टी, कपडेलत्ते, वगैरे तर वैचारिक युगात लेखकाचं महत्व विचारात घेतलं जातं. फेसबुक मात्र माणसाच्या मनाचा विचार करतं. म्हणूनच ते मनाला भिडत आपल्याला आपलं वाटतं म्हणून ते झटकन व्यापक झालं, विस्तारलं. ऑफिस ते घर व कारखाना ते खेळ असं सर्वव्यापी झालं. हे त्या निर्मात्याचं यश आहे. समाज मनाचा अत्यंत बारकाव्याने केलेला अभ्यास आहे आणि तुमची आमची सर्वांचीच मन कॅच केली आहेत ह्यात वाद नाही.

पण आपल काय? आपण नक्की इथे का आलो? कसे आलो? कधी आलो? आणि हे एवढे जण इथे नक्की का आले या प्रश्नांची उत्तर मात्र थोडेशी उपयुक्तता आणि बरचसे औदासिंन्य निर्माण करते. मी ज्यावेळी पहिल्यांदा इथे प्रवेश केला तेव्हा सोफ्टवेअरमुळे गोंधळून गेलो कुठे काय बघायचे तेच कळे ना आत्ताही फारसे काही कळतंय असे नाही पण कामापुरते जमतंय त्यामुळे बऱ्याच जणांना रोज भेटता येतंय इतकंच. पहिले काही दिवस शोधाशोधीत गेली. नातेवाईक बरेच मिळाले, पण जुने मित्र मात्र फारसे नाही मिळाले; एक दोनच फक्त कारण आमच्या पिढीला हे तितकंसं झेपलं नव्हतं, जितकं ते तरुण पिढीला आपलंसं वाटले. हळूहळू आत्मसात झालं आणि नवीन सून सासरी एकरूप होते तसं आपलंसं झालं, कारण ते हाताळता येऊ लागलं.

सुरुवातीला हे सर्व जे तुम्हाला दिसलं तसंच मला हि दिसलं, पण काही दिवसांनी जाणवू लागलं. जे दिसलं तसं ते तसं नव्हतंच ते फारच वेगळं होत. कधी कधी दिसतं त्याच्या नेमकं उलट असत आणि तसंच इथेही ते उलट होत. हे जाणवल्यावर मात्र मन विषन्न झालं, कारण पुढे रस्ता बंद दिसंत होता, बेचैन झालं, कारण मागे जाता येत नव्हतं, सैरभैर झाल कारण उपाय सुचत नव्हता. अनेक मनांचा तिथे पूर्ण गुंताच दिसत होता. तरीही मनं मात्र गुंतायला हवी तितकी आणि तशी गुंतली नव्हती की छान चं वेणी घालता येईल. विंचरायला गेलो तेव्हा जटा आड आल्या. फणी पुढे जाईच ना. पूर्ण कोरडा तेलाचा अभाव असलेल्या केसांचा रुक्ष पुंजका. तेलाची स्निग्धताच नव्हती म्हणूनच रुक्षता जास्तच जाणवली.

सर्वात पाहिली गोष्टं जाणवली ती म्हणजे जो तो आपल्याच मित्र-मैत्रिणींच्या वर्तुळात गोल गोल फिरतोय त्याच्या बाहेर फारसं कोणी जात नाहीये. एकमेकांना लाईक क्लिक करत पत्त्याच्या बंगल्यासारखे एकमेकांना टेकून उंच उंच जाऊ पाहत आहेत. सुरुवातीला लाईक नंतर कमेंट्स व त्या नंतर कंटाळा, म्हणजे मग गरजे पुरतंच, रोजरोजच्या गोष्टी करून कंटाळा आला हे काहीतरी नवीन जरा चेंज वाटलं पण लवकरच कंटाळा आला. कारण प्रत्येक माणसाला नेहमीच व सारखे सारखे काहीतरी नवीन हवे असते. नाविन्याची आस !

दुसरे असे जाणवले की कोणी फक्त नातेवाईकांच्यातंच घुटमळतंय त्या पलीकडे जातही नाही आणि ईच्छाही दिसत नाही. आज भाजी काय केली, रेसिपी सांग, टी व्ही वर कोणत्या सीरिअल मध्ये काय काय झाले? टेलिफोन चे बिल भरण्यापेक्षा हे नक्कीच बरे, ह्या भावनेने लवकर आपलेसे झालेले हे फेस बुक. मी आणि माझे फक्त. संकुचित दृष्टी. कुपमंडूक वृत्ती. विहिरीतील बेडूक.

तिसरा प्रकार जाणवला तो म्हणजे जे अनेक फ्रेंड्स जमवतात ते फक्त फ्रेंड्सच्या नंबरांचाचा चलन फुगवटा करताहेत. हजारोजण असतील तर संवाद तरी कसा होणार? पण एक हौस बस इतकेच! खरच त्या मागचा त्यांचा उद्देश नेमका काळत नाही. प्रत्यक्ष मित्र कमी आहेत. मला खूप बोलायचा आहे पण कोणी ऐकायला नाही. ४- ६ जणांनी ऐकलं नाही तरी एवढ्या मित्रांपैकी ४-६ जण तर ऐकतील निदान लाईक क्लिक तरी ! कारण मी एकटा आहे. माझे एकटे पण मला हे करायला भाग पडतंय. मला टाईम पास करायचा आहे कारण तो माझ्याकडे भरपूर आहे आणि बोलायला कोणी नाही.जाणवतंय ते एकाकीपण जे सर्वसाधारण वार्धक्यात बहुतेक जणांना जाणवतं ते आज तरुणांना जाणवतंय , हे कारण या अनेक मित्र नेटवर तरी एकत्र करण्या मागचे आहे. हे एकाकीपण ही उद्याची सामाजिक समस्या आहे फेसबुक मूळे ती लक्षात आली. या वास्तवाची समाजाला जाणीव झाली. फेसबुक हे एक मंथन आहे ह्यातून विषही बाहेर येणार आहे आणि अमृतसुद्धा बाहेर येणार आहे कारण मंथन म्हटलं कि हे सारे आलेच. शक्ती ही शक्ती आहे तिचा वापर आपण कसा करायचा त्यावर सारे अवलंबून आहे आपण जास्तीत जास्त चांगला वापर करूया म्हणजे सगळयांचेच भले होईल.

चौथा प्रकार पढत मुर्खांचा! कारण बरेच शब्द उसने होते. कधी तरी कुठे तरी वाचलेले. तेच तेच चघळलेले. चघळून चघळून चोथा झालेले , कधी कधी तर त्यांचा अर्थ लिहिणाऱ्यालाही माहित नसावं किंवा समजलंही नसावं हे वाचकालाही जाणवत होते. तरीही लिहित होते. लिहित नव्हते छापत होते. कधी कधी ओरडत होते, रडत होते, आक्रंदन करत होते, आरोप करत होते. कधी स्वतःची कधी चोरलेली प्रेमकाव्य पोस्ट करत होते. स्टेजवर. चहूबाजूंनी लाईट येतात ते अंगावर घेऊन चमकतात तसे दुसऱ्यांचे शब्द गाऊन गाऊन चमकायचा प्रयत्न करत होते. कोणी आपलं ऐकतंय का? लहान मुल आपल्याकडे कोणी लक्ष देत नाही ह्याची जाणीव झाल्यावर करतं ना तसे. मी कोणीतरी आहे हे जगाला दाखविण्याचा अतोनात प्रयत्न.

पाचवा प्रकार - काहीजण आपापले ग्रुप करून तक्रार, आक्रोश, विषाद, नाराजी, असेही सूर काढत होते, विव्हळत होते, आक्रंदत होते, अगदी सामुहीकरित्या कोण कुणापेक्षा जास्त आतुरता दाखवतोय याची जणू स्पर्धा लागली होती. अनेक विषाद एकत्र करून एक आनंद मिळवता येत नाही. खर सांगू का आपलेपण असल्याशिवाय खरे रडायला येतंच नाही. गहीवरायला होतंच नाही. आपले पणाशिवाय असतो तो आक्रोश. जगाला दाखवायला कि आय एम. हे रान आहे आणि रानात रडण्याला अरण्यारुंदन म्हणतात," इथे ऐकायला कोणीच नसतं कारण असतात फक्त जनावरं." हे माहित असून रडायला येत नसलं तरी रडावं लागतं. नाहीतर कळणार कस आय इस ते. माणसांनी डोंगरावरचं जंगल तोडलं म्हणून फेसबुकच्या कर्त्याला सुचल की हे अरण्य आपण लोकांना घरात उपलब्ध करून देऊ आणि झालंही तसंच, कारण शहरी वाळवंटात हि कोरडी का होईना फुंकर वाटली. प्रत्येक जीवाला ओढ लागली आपल्यालाही ओरडायची संधी घरी चालून आली आहे. आता घरी बसून ओरडता येईल. अरण्यात जाऊन ओरडायला नको आणि इथे ओरडल्यामुळे याला लोक अरण्या रुंदन म्हणणार नाहीत कारण इथे सगळ्यांनाच काही तरी सांगायचं असतं, बोलायचं असतं त्यात आपले दोन शब्द काय हरकत आहे ? खर्च तर येत नाही, वेळही जातो, करूया सुरु. लोकांना आवडलं तर ऐकतील नाही तर सोडून देतील. इथे "रडू नको", "गप्प बस" असे तर कोणी कधीही म्हणणार नाही. दुसऱ्याच्या कानात नाही तरी स्वतःच्या कंपाऊंडवाल वर तर लिहायला हरकत नाही. येणारे जाणारे तर बघतील, वाचतील, मन मोकळं करता तर येईल जे प्रत्येकाला आवश्यक आहे. हे फेसबुकचं सर्वात मोठ यश आणि मानवी नैराश्याला वाहायला दिलेली मोठ्यात मोठी संधी.

नैराश्याची नदी एकेकी थेंबांची नदी. दिशाहीन विचारांना वाहून नेणारी नदी हे गंभीर आहे. पवित्र गंगेत पाहेजेते सोडून तिची झालेली आजची स्थिती हीच फेसबुकच्या जन्माची स्थिती, म्हणूनच या आणि अशा साईट बद्दल मानस शास्त्रज्ञांना आज खरोखरच काळजी वाटते आहे.

सहावा प्रकार - सामाजिक एकता करणाऱ्यांचा ! म्हणताना तरी हे (सर्व) एकटा करतो म्हणतात, संघटना करतात. मग आपापसात मानापमानाचे नाट्य सादर करतात आणि मग एकातून आणखीन एकी करण्यासाठी?? दुसरा ग्रुप तयार करतात. म्हणजे एक होण्यासाठी दोन होतात??????? त्याचं ते एडमिन (प्रमुख) बनतात. मग त्यातून पुंन्हा तिसरा, चौथा, असे एकी कारण करणारे अनेक ग्रुप करून एकी करतात आपल्यातली एकता वाढवत जातात अमिबा सारखे आणि पुन्हा पहिल्या ग्रुप मधले अनेक जण त्या दुसऱ्या ग्रुपमध्ये जातात. असे पुन्हा अनेक ग्रुप बनतात. त्यात पुंन्हा तेच तेच चेहेरे दिसतातच म्हणजे नेता बदलला तरीही समाधान नाही पुंन्हा नवीन ग्रुप नवीन नेता करत करत शेवटी एक नेता एक ग्रुप म्हणून एकटा ग्रुप हे त्यांचे वास्तव आहे फेसबुक मूळे ते जगासमोर आले ते जगाला कळले पण अजून ते त्यांना कळत नाही, कारण सगळेच शहाणे म्हणून एक एक करत एकटे झाले ही ह्यांची एकता इति अहंकाराः . नेता बदलता बदलता स्वतः नेता होतात ज्यांना शेवटी नेता मानणारेच कोणी राहत नाही.

सातवा प्रकार, बरेच जणं एकमेकांनाच लाईक क्लिक करत होते, पोक करत होते त्या पुढे गाड्या सरकत नव्हत्या तसे लिस्ट मध्ये फ्रेंड्स अनेक होते पण नुसता फेस. तशी प्रेमंही जमली पण टिकली किती माहित नाही ते फार झालं तर वास्तविक जगातही बुरखे असतात. इथे तर बुर्ख्यावर बुरखे होते कळेच ना कारण बुरख्यातहि खरे खोटे होते. त्यामुळे मन तर सोडाच पण चेहेऱ्याची ओळख होईना मूळ चेहराच दिसे ना तर मन कुठे दिसणार आणि मैत्री कशी होणार? होते ती फक्त ई मैत्री सगळेच ई ई ई ! शरीराने तर दूरच पण मनानेही दूर. हाय, हैलो, हाऊ आर यु ! फाईन, हम्म्म ,गुड डे बस पुढे बोलायलाही वेळ नाही.
फील गुड वाटतं जवळ पण प्रत्यक्षात दूर दूर दूर

अथवा प्रकार होता सीरिअल सेलिब्रेटीज, यांना मात्र फेसबुक फार भावलंय. सतत लोकांसमोर राहण्याची हौस, इच्छा, आणि खरोखरच त्यांच्या व्यवसायाची गरज या सर्व गोष्टी फेसबुकने त्यांना पुरवल्या आहेत आणि त्यात वर जमल तर डायरेक्ट संपर्क सुद्धा साधता येतो. त्यामुळे फेस बुक त्यांच्या फारच मर्जीतले झालंय. आय टी चा उपयोग आणि वाहत्या गंगेत हात धुऊन घेण्याची उत्तम संधी.

आपापले ग्रुप मात्र आपल्याला रीस्पोंस देत होते. एकत्र भेटल्यावर ज्या शब्दात बोलतात त्याच शब्दात बोलत होते. कारण खरोखरच त्यांना कामातून प्रत्यक्ष भेटायला वेळच मिळत नव्हता त्यांच्यासाठी हे वरदान होते. उपयोगी होते आणि जाहीर तसेच मेसेज करून एकांतात सुद्धा एकच वेळी बोलता येण्याची सोय होती. कॉलेज संपल्यावर एकमेकांना भेटणेही शक्य होत नाही त्यांना हि हे अतिशय भावले.संसारतील आणि नोकरी धंद्यामुळे खरोखरंच वेळ न मिळणाऱ्यांना वेळ मिळेल तेव्हा भेटण्याची एक अमूल्य संधी


माझ्यासाठी म्हणाल तर सुरवातीला हे टाईमपास होते. मी तर खेळ खेळायचो. जास्त काही माहीतच नव्हते. इंग्रजी कामापुरतं कळंत होतं पण लिहिता येत नव्हते. आयुष्य भर भरपूर लिहील होतं पण स्वतः साठी. आणि ते ही मराठीत इथे कसे लिहिणार. मराठी सोफ्टवेअर माझ्याकडे काम करत नव्हती काहीतरी प्रोब्लेम यायचा. एकदा अनपेक्षित पणे काहीतरी पोस्ट जी मेल वर आली ती मराठी होती म्हणजे देवनागरी! ती तिथे टाईप करता हि येत होती हे लक्ष्यात आल्यावर मात्र हुरूप आला. पण सगळे लिहिलेले पुंन्हा यात लिहायला हवे होते दुसरा इलाज हि नव्हता. मग लिहायला सुरुवात केली आणि रोज एक पान पोस्ट करत गेलो. विषय जुनेच होते पण दृष्टीकोन पूर्ण पणे नवीन होता आजवर खरोखरच कोणी मांडला नव्हता त्यामुळे भरपूर प्रतिसाद मिळाला एक महिन्यात ३००-४०० नवीन वाचक मिळाले. पुस्तक लिहिणे ते प्रसिद्ध करणे हे आज खूप महाग आहे आणि आता पुढे ई- बुक्स च येणार त्यामुळे एकही पैसा खर्च न करता आपले विचार जगभर जाऊ शकतात ती संधी मला मिळाली हे फेस बुक चे उपकार आहेत. अप्रसिद्ध लेखकांसाठी हि एक संधी आहे असे मला जाणवले.

सारांश फेस बुक हे एक साधन आहे आपण ते कसे वापरायचे ते आपल्या हातात आहे. आपण त्याचा जास्तीत जास्त सदुपयोग करून घेऊ शकतो.फेस बुक ने आपल्याला काय दिले? काय दाखवले?? मी वर म्हटलेच आहे मंथनातून विषही येणार आणि अमृतही येणार आपण अमृत घ्यावे.

# पुस्तक परीक्षण - नाडी ग्रंथ भविष्य {आवृत्ती ५वी}

विंग कमांडर (नि) शशिकांत ओक

चला नवग्रहमंदिर यात्रेला.




माझ्या पाचव्या आवृत्तीच्या रूपाने नाडी ग्रंथावर पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. साप्ताहिकाच्या आकारातील या नव्या पुस्तकाचा शुभ्र कागद, तीन ऐवजी दोन कॉलममधील मांडणीमुळे संपूर्ण चेहरा मोहराच बदलला आहे.

प्रथम वाचकांना, नाडी ग्रंथ पाहू इच्छिणाऱ्यांना हे पुस्तक वेगळया विश्वात घेऊन जाईल. शिवाय नाडी ग्रंथांचे अवलोकन केलेल्यांना व ओकांची आधीची पुस्तके वाचलेल्यांना नवीन माहितीचे लेख पुन्हा आकर्षित करतील.

तमिळनाडू राज्यात ताडपट्यावर कूट तमिळ भाषेत कोरून लिहिलेल्या भविष्याला नाडी भविष्य म्हणतात. ह्या नाडीग्रंथाचा इंग्रजी-हिंदी व काही ठिकाणी मराठी भाषेत अनुवाद करून सांगण्याची सोय सध्या महाराष्ट्रात, व महाराष्ट्राबाहेर मराठी लोकांसाठी अनेक नाडी भविष्यकेंद्रात ठिकठिकाणी कोठे उपलब्ध आहे, त्यांचे ५० पत्ते-फोन नंबर, फी आदीची दि ३१ मे २००९ पर्यंतची सुधारित माहिती त्यात आहे.

उपशीर्षकात म्हटल्याप्रमाणे नाडी ग्रंथातील शांती-दीक्षा कांडातून अनेक मंदिरांच्या यात्रेला जाण्याचे आग्रहपूर्वक सांगितलेले असते. तेंव्हा मंदिरांना श्रद्धापुर्वक भेटी द्याव्या असे मनात असते. परंतु भाषेचा दुरावा, दूरचे अंतर, वेळ, पैसा व सर्व सोपस्कारकरून खरोखरच काही उपयोग होईल का अशी शंका, यामुळे यात्रा करणे लांबते वा टाळले जाते. पुजा-अर्चा, जपसाधना करावी का?, यांचे फळ मिळते काय? याची वैज्ञानिक कारणमिमांसा ‘शांतीदीक्षा केल्याने काय लाभ? ’ हे प्रकरण वाचल्यावर वाचकांच्या मनातील या बाबतच्या शंका दूर व्हाव्यात.

दक्षिणेतील नवग्रहांचे स्थानमहात्म्य, इतिहास, प्रत्येक ग्रहाचे व्यासकृत स्तोत्र, नैवेद्य याशिवाय नकाशा, जाण्या-राहण्याची सोय अशी उपयुक्त माहिती या पुस्तकात आहे. शिवाय नाडी ग्रंथप्रेमींतर्फे पुण्यात १४ ऑक्टोबर २००७ला झालेल्या अधिवेशनाचा अहवाल व त्यात चर्चेला आलेले विषय या पुस्तकाचे आणखी एक आकर्षण आहे.

एखाद्याची नाडी भविष्याची पट्टी मिळण्याची घटना ही नदीच्या पुरातील पाण्यात टाकलेल्या दोन काड्यांची भेट पुन्हा काड्याच्या पेटीत होण्याइतकी अशक्यप्राय कशी आहे, या रंजक उदाहरणावरून पटवून देण्याची ओकांची हातोटी कौतुकास्पद आहे. आपणाकडून माहिती काढून तीच पुन्हा आपणाला सांगतात या आक्षेपाला

उत्तर या आवृत्तीत मिळेल. नाडीपट्टच्या फोटोंचे काय महत्व आहे याचे वर्णन वाचून अनेक नाडीप्रेमींना विचारकरायला बाध्य करेल.

'नाडी शास्त्री संमोहनाद्वारे नाडी भविष्य कथन करतात' असे विक्षिप्त तर्क केले जातात. प्रसिद्ध संमोहन तज्ञ डॉ.प्रा.खानापुरे यांनी त्यावर विदारक प्रकाश टाकला आहे.

नाडी ग्रंथाच्या आधारे पुर्वजन्मातील व्यक्तीरेखा शोधण्यात यशस्वी झालेल्या डॉ. दिलिप नाहरांची फोटोसह शोधयात्रा वाचून वाचकांना थक्क व्हायला होईल. नाडीवर वेबसाईट काढणारे- उदय मेहता, बडोद्यात केंद्र चालवणारे - निलेश त्रिवेदी, खेडचे उद्योजक श्री. हिराभाई बुटाला, श्री संतोष ओक, तरुण राजस खळदकर, उत्साही- विंग कमांडर राकेश नंदा, स्त्री नाडीवाचक सोलापूरच्या मल्लिका मीरा आदी नाडी प्रेमींचा प्रेरणादायक परिचय मोबाईल नंबर व फोटोसह या आवृत्तीत पहायला मिळेल.

या पुस्तकातील कथित नवग्रह यात्रेला जाण्याकरिता विविध यात्रा कंपन्यांनी पुढाकार घेऊन नाडी केंद्रांशी संपर्क केला तर अशा यात्रा आखल्या जाऊन अनेक इच्छुकांची सोय होईल.

अधिक माहितीसाठी  नाडीग्रंथावरीलल काही ई पुस्तकांचे दुवे इच्छुकांसाठी खाली जोडत आहे.

- नाडी ग्रंथ भविष्य 2008 Marathi Edition
- बोध अंधश्रद्धेचा - उर्फ नाडी भविष्याने केला अंनिसचा पराभव Marathi Edition १९९९
- Naadi Predictions 2006 English Edition:
- चौंका देनेवाला चमत्कार- नाडी ग्रंथ भविष्य 2006 Edn in Hindi:
- विज्ञान आणि अंधश्रद्धा निर्मूलन by Princ. Adwayanand Galatge in Marathi:
- विज्ञान आणि चमत्कार [भाग १ ला ] | विज्ञान आणि चमत्कार [भाग २ रा ] | विज्ञान आणि बुद्धिवाद

# ✵ गडदुमा

रामचंद्र सोनू जाधव

शिरगांव हे देवगड तालुक्यातील मध्यवर्ती ठिकाण. गावापासून तालुका अदमासे पंचवीस किलो मीटर अंतरावर. गावाच्या सीमेजवळ एका लहानशा टेकडीवर एक इतिहासकालीन लहानसा किल्ला.येथून तांबळवाडी अगदी जवळ, म्हणून लोक याला तांबळवाडीचा कोट असेही म्हणत. ह्या एकंदर परिसराला गडदुमा हेच नाव जास्त प्रचलित होते. गडदुमा हा कदाचित गडदुर्गम या शब्दाचा अपभ्रंश असावा. दुर्गम भागातील गड म्हणून गडदुम किंवा गडदुमा.

गडदुम्याचा कोट झाडाझुडपांनी एवढा वेढलेला असे की आत काय आहे हे बाहेरून दिसत नसे. कोटाचे रुपांतर गर्द राईमध्ये झालेले असल्यामुळे गडदुम्याची राई असेही लोक म्हणत. या राईविषयी किंवा त्याच्या आजूबाजूच्या परिसराविषयी फारसे कोणी बोलत नसत. या कोटाच्या पाठीमागे गर्द झाडी व एक खोल अशी दरी किंवा घळण असे. येथील परिसर, विशेषतः दुपारी व तिन्ही सांजेला भयाण वाटे. या कोटाच्या बाजूची जमीन आमच्या आजोबांनी खंडाने, कसायला घेतली होती.मी त्यावेळी प्राथमिक शाळेत होतो व आजोबा जमीन नांगरताना त्यांच्या मागे मागे फिरत असे. मधूनच कुतूहल वाटत असे की या गडदुम्याच्या बाजूला किंवा कोटामध्ये कोणीच का फिरकत नाही व कोणाला कांही विचारले तर लोक बोलायचेच टाळत आणि जसजसे याचे उत्तर टाळले जाई तसतशी उत्सुकता ताणली जायची की गडदुमा म्हणजे काय आणि त्या कोट किल्ल्याच्या आतमध्ये काय असेल?

मोठी माणसे आम्हाला काहीतरी सांगून गप्प बसवीत की तिथे भुते असतात आणि दुपारच्या वेळेला किंवा तिन्ही सांजेला कोणी एकटा दुकटा सापडला तर तो झपाटला जातो. मला कांही हे उत्तर तेवढेसे पटत नसे, परंतु कांही दिवसातच आमची धाकटी आजी झपाटली गेली आणि वेड्यासारखे चाळे करू लागली आणि म्हणून मनाची समजूत करून घ्यावी लागली की वडिलधारी माणसे सांगतात ते खरेच असले पाहिजे.

एक दिवस आमची गाय दुपारच्यावेळी घरी परत आली नाही व कोणीतरी येऊन सांगितले की गडदुम्याच्या वाटेकडे पळताना गायीला पाहिले. सर्वांच्याच पोटात धस झाले की गाय गडदुम्याकडे गेली की ती घळीत पडणार व नंतर ती दिसूदेखील शकणार नाही. गडदुम्यापासून आमचे घर तसे जवळच होते. मी गायीला शोधायचे निमित्त करून गडदुम्याकडे गेलो परंतु घरी नाही सांगितले की तिकडे जातो म्हणून,नाहीतर जाऊच दिले नसते. मी असेन त्यावेळी साधारण सातवी आठवीमध्ये. मला स्वतःला या भयाण वाटणाऱ्या परिसराविषयी अनेक गोष्टींची उत्तरे हवी होती. ती घळण किंवा दरी कितीशी खोल असेल? ज्याने गुन्हा केला असेल त्याला त्या कोटातील राजा गुन्हेगाराला सजा म्हणून त्या घळीत फेकून देई व अशा मृत माणसांचा आत्मा त्या बाजूला जो कोणी जाईल त्याला झपाटत असे अशीही आख्यायिका होती. झपाटल्यानंतर काय होते, मी पण झपाटला जाईन का? हा कोटकिल्ला कोणत्या राजाचा होता व त्याठिकाणी कोणीसुद्धा का जात नाही? कोट किल्ल्याच्या आतमध्ये काय आहे? इत्यादि अनेक प्रश्नांची उत्तरे मला जाणून घ्यायची होती.

गायीला शोधण्याच्या निमित्ताने भर दुपारच्या उन्हामध्ये मी कोटकिल्ल्याच्या पाठीमागे असलेल्या घळणीकडे धीर करून गेलो. खोलवर नजर पोहोचत नव्हती व आजुबाजूला गर्द झाडी, भयाण शांतता व पक्षांचे ओरडणे हे सर्व पाहून मला अतिशय भीती वाटली. अंगाला दरदरून घाम फुटला व भीतीपोटी मी तेथून घराकडे धूम ठोकली. तोपर्यंत गाय आपल्या वाटेने स्वतःहून घरी परतली होती. मी जरी घाबरलो होतो तरी मन बेचैन होते.

पुन्हा एकदा न घाबरता प्रयत्न करणे आवश्यक होते. मला आतापर्यंत कोटकिल्ल्याच्या पाठीमागे काय आहे याची थोडीफार कल्पना आली होती. परंतु आता मी बेचैन होतो कोटकिल्ल्यामध्ये जाण्यासाठी. मग मी एके दिवशी तिन्ही सांजेला कोणाचे माझ्याकडे लक्ष नाही असे पाहून कोटकिल्ल्याच्या गर्द राईमध्ये गेलो. आत गेल्यावर मी पाहतो तर काय, झाडी फक्त बाहेरूनच होती. आतल्या बाजूला एका पडक्या वाड्याचे भक्कम बांधकाम असलेले अवशेष होते. आत एका राजाला किंवा सुभेदाराला शोभेल अशा दिवाणखान्याची मांडणी, बाहेरच्या बाजूला भरपूर पाणी असलेली विहीर, समोर एक छानसे अंगण व अंगणामध्ये एक सुबक आणि सुंदर तुलसी वृंदावन. मी आतून घाबरलो होतो पण आतील देखावा पाहून थक्क झालो होतो. परंतु आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट म्हणजे या तुलसीवृन्दावनाकडे पाहिल्यानंतर येथे रोज कोणीतरी येऊन पूजा करीत असावे असे वाटत होते. परंतु नंतर वाटले की हा माझ्या मनाचा भ्रम असावा, कारण येथे तर कोणीच येत नसे.

पुरेसा काळोख होत आल्यामुळे मी आता घरी जायला निघालो. कोटकिल्ल्याच्या बाहेर पडण्यापूर्वी एकदा मागे वळून बघितले आणि मागे वळून बघितले तर काय ! माझ्या आईच्या वयाची एक अतिशय सुंदर आणि देखणी बाई,नऊवारी शालू ,संपूर्ण दागीन्याने मढलेली, हातामध्ये सुवर्णाचे तबक, पूजेचे सामान व ती तुलसीवृंदावनाची पूजा करीत होती. तिने लावलेल्या दिव्याचा लखलखाट सगळीकडे पसरला होता आणि डोळे दिपून गेले होते. माझ्याकडे बघून ती छानसी हसली व प्रसाद म्हणून मला आपल्या तबकातील फूल देऊ लागली. तिच्या हातातून फूल घेण्यापूर्वी मी तिला वाकून नमस्कार केला व मी पुन्हा तिच्याकडे पाहण्यापूर्वी ती अदृश्य झाली व तिने देऊ केलेला प्रसाद घेण्याचे तसेच राहून गेले. आता या गोष्टीला अनेक वर्षे होवून गेली. गडदुम्याची घळण काळाच्या ओघात बुजली गेली. कोटकिल्ल्याचे अवशेष देखील आता फारसे शिल्लक राहिले नाहीत.

परंतु आजही कांही प्रश्न अनुत्तरीत आहेत कि मला जिने दर्शन दिले ती कोण होती? किल्लेदाराची पत्नी की साक्षात देवी माता ? आणि तिने मलाच का दर्शन दिले?आता कोणी विश्वास ठेवो अथवा न ठेवो ही सत्य घटना असून मला आजही तिचे दर्शन ध्यानामध्ये सतत होते व ती मला स्मितहास्य करून त्यावेळी देऊ केलेला प्रसाद देण्याचा प्रयत्न करते.

" या देवी सर्वभूतेषु श्रद्धारुपेण संस्थिता !

नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नाम: !! "

# अभूतप्रेम

तनवीर सिद्दीकी

'अजून एक बनव' - एका हाताने ग्लास सांभाळत आणि एका हात टेबलावर ठेवून स्वत:ला सावरत शाहिद अस्पष्ट बोलला.

'बस..बस..पुरे..आधीच चढलिये तुला..' - लोकेशने समजूत घातली..

'@#%&, टाक रे..' .. शाहिदचा स्वर आता थोडा भिजून हलका झाला होता..

'अरे पण झाल तरी काय?..कोणी काही बोललं का? ती काही बोलली का ?... आपण काहीतरी मार्ग काढूच की..सांग तरी... ' - लोकेश

शाहिद आपल्याच तंद्रीत होता. समोरची पूर्ण बाटली एकट्यानेच संपवणे ही जणू काही काहीतरी मोठी महत्वाची जबाबदारी आपल्या अंगावर टाकली गेली आहे अश्या अविर्भावात तो पटापट एक-एक पेग रिचवत होता. लोकेश काहीतरी विचारतोय, एक-दोन पेग रागात, जास्त चढल्याने त्याच्या शर्टवर पडून शर्ट भिजलाय, त्याला काही काही भान नव्हते. डोक्यात विचारांचे तांडव चालले होते. डोळयासमोर झापड येत होती. तो शांत आकाशाकडे बघत अधून मधून ग्लास तोंडाला लावत शांत बसला होता. चेहऱ्यावर कुठलाच भाव नाही... राग, द्वेष, ईर्ष्या... कसलेच नाही..लोकेश ही एव्हाना विचारून दमला होता. त्यानेही शाहीदला थोडा वेळ एकटाच सोडण्याचा निर्णय घेतला. त्याच्या पाठीवर एक सहानुभूती मिश्र मैत्रीची एक थाप मारत तो उठून तो खाली आपल्या रूमवर आला.

शाहिद अजून गच्चीवरच होता. रातकिड्याचा आवाजच काय तो फक्त शांततेशी लढत होता. फक्त एक-दोनच झुरके ओढलेली सिगरेट हातातच जळून अर्ध्यापर्यंत आली होती. मध्यरात्रीला मिनिटाभराचा अवकाश असेल..!! सोसायटीच्या रखवालदाराच्या शिट्या धूसर ऐकायला येत होत्या..आणि त्यात कुत्र्याची भू-भू.. ..पण शाहीदची शून्यावस्था मात्र काही भंग होत नव्हती. तो असंच अजून..आपला आभाळात अंधार मोजत..!!.. आणि त्यात हा विचारांचा गदारोळ...!!

.....किती आनंदात गेला होता तो!! किती दिवसांनी त्याच्या महत्प्रयासाला देव पावल्यासारखे वाटले होते. आणि आता?.. आता तर सगळी स्वप्ने,सगळया इच्छा धूसर झाल्यागत दिसत होत्या. "देव देतो आणि कर्म नेते" अस म्हणतात पण यात देव देवून चुकला की कर्म हिसकावून घेवून जातंय म्हणून दोषी हेच काही उलगडत नव्हत. आयुष्यात अश्या किचकट अभूतपूर्व परिस्थितीला सामोरे जावे लागेल असं त्याने कधी उभ्या जन्मात तर सोडा पण 'आडव्या' स्वप्नात ही विचार केला नव्हता. सर्वच विधिलिखित असते हे मान्य, पण अचानक एवढ्या मोठा पेचप्रसंग आयुष्यात यावा अन त्यात देवाने मानसिक रित्या हतबल आणि भावनिक रित्या मृत करून टाकावे हेच त्याला पटत नव्हते. 'हे अस का झाल?' , 'मग झालंच तर माझ्याबरोबरच का झाल?', 'आता मी काय करू?', 'मी हा निर्णय एकटा घ्यायच्या लायकीचा आहे?', 'निर्णय चुकला तर?' - असे भरपूर प्रश्नबाण हृदयावर वार करत होते. पण निरसनासाठी कुठला प्रश्न पहिले विचारत घ्यावा हा प्रश्न सुटत नव्हता. मेंदू मूक वाटत होता. श्वास बधीर झाला होता.आकाशातल्या अंधाराबरोबर जणू त्याच्या उघड्या सताड डोळयासमोरच्या दु:खकाळोखाची स्पर्धाच चालू होती..!!

एव्हाना कुत्र्यांचा आरडओरडा उतरणीला आला होता.जग नेहमीप्रमाणे दुसऱ्या दिवशीच्या दैनदिनिच्या युध्दासाठी सज्ज होण्यासाठी निद्रा राणीबरोबर आराम करत होते.चांदण्या आभाळाचे पांघरून घेवून अधून मधून एक-दोन डुलक्या मारून वामकुक्षीचा आस्वाद घेत होत्या.दारूची संपलेली बाटलीही टेबलावर शांतपणे पहुडली होती.एवढावेळ साथ देणारी न ओढलेली सिगरेटही त्याच्या हृदया प्रमाणेच पण एका ठराविक मर्यादेपर्यंत जाळून त्याच्या बोटापर्यंत आली होती. एक हलकासा चटका त्याच्या बोटांना लागला तोच तो भानावर आला. अंधुकशी, हलकीशी वेदनामय किंकाळी देत त्याने थोटूक भिरकावून दिल. अर्धवट उघड्या डोळयांनी आजूबाजूचा वेळेचा अन परिस्थितीचा कानोसा घेतला. काहीतरी माचीस वगैरे शोधत काळोखात अंधाराचा अंदाज घेत उठण्याचा प्रयत्न करू लागला. एक आकृती त्याच्याजवळ लगबगीने त्याला सावरायला येताना त्याच्या दिशेने सरकताना त्याला दिसली.

तो लोकेश होता..!!

शाहिदचा हात पटकन आपल्या मानेमागे खेचत लोकेशने त्याला उभे केले. आणि खडसावत बोलला.

'@#%&..चल पुरे आता..जेवून घेवू..थोडा आराम कर आता..जास्त झाली आहे तुला '

शाहिदला काय झाले आहे नक्की? उद्या विचारतो..अस मनाशी ठरवत लोकेशने शाहिदला खाली रूमवर आणले.

x x x x x x x x x x

चित्रात, स्वप्नात, चित्रपटात, गोष्टीत, कवितेत अगदी उघड्या डोळयांच्या बाहुपाशात दिसणारी भावी जोडीदाराची संकल्पना 'मधु' या व्यक्तिमत्त्वाशी अचूक जुळली याचा अतोनात आनंद शाहिदला गगनात मावेनासा झाला. अगदी पहिल्या भेटीत जेव्हा हस्तांदोलन करताना मधु जेव्हा त्याच्यासमोर आली तेव्हा त्याच्या हृदयाचा एक ठोका तर चुकलाच..!! "वो जो भी होगी जब भी मेरे सामने आयेगी ना, तो दिल मे गिटार बजेगी देखना.." अस जेव्हा तो आपल्या स्वप्नाळू दुनियेत विरून लोकेशला सांगायचा त्याची पूर्ती आज झाल्यासारखी त्याला वाटत होती.तिचा आज ऑफिस मधला पहिलाच दिवस होता . ओळखीपाळखीचा कार्यक्रम चालू होता . तिने समोर येवून एक'प्रोफेशनल' स्मितहास्य दिल. शाहिद सुखावून गेला. त्याला ते प्रोफेशनल' स्मितहास्य पण फार अगदी मनमोहक वाटल तो मधूच्या पहिल्याच नजरभेटीत घायाळ झाला होता.त्या भिरभिरेपणात त्या सोंदर्यवतीचा हात त्याच्या हातात पाच मिनिटे असंच अटकून आहे अन तो नाजूकपणे विळख्यातून सुटण्याची धडपड करत आहे याची त्याला शुद्धच नव्हती. लोकेश बाजूला आपल्या पाळीची वाट पाहत होता. त्यानेही शाहीदला नकळत कोपरा मारून जागे करण्याचा प्रयत्न केला. पण तेही व्यर्थ..!! शेवटी पहिल्या भेटीतच बुजगावणे झालेल्या शाहीदला पूर्व अवस्थेत आणण्यासाठी एका मंजुळ आवाजाची वातावरणात 'इंट्री' झाली होती.

"मी मधु.. मधु कामतेकर" ..

"अ?..हो..हो.... मी शाहिद.. शाहिद खान...."

"Nice to meet you" - परत मंजुळ आवाज

मधुनेच अप्रत्यक्षरीत्या 'झाली की ओळख आता तरी हात सोडा' असा भाव डोळयात आणत सांगितले.

"Ohh Sorry..." तिचा हात अजून आपण बावळट सारख धरून ठेवलाय याची जाणीव त्याला झाली आणि लगेच हात सैल झाले. ती पुढे सरकली. शाहिद मान खाजवत ओशाळून खाली बघू लागला. आजूबाजूला काही दबके हास्यफवारे फुटलेत हे त्याच्या कानाने टिपले पण खाली बघत असल्याने पुढे जावून पण खास मागे वळून मधूने खास शाहिदला दिलेला प्रेमळ अन कुतुहल पूर्ण 'लुक' मात्र त्याच्या नजरेतून चुकलंच..!!

"ती बघत होती तुझ्याकडे.." - कैन्टीन मध्ये लोकेश चा मिस्कीलपूर्ण खडा..!!

"नाही रे नसेल..खर काय?" - शाहिदला उत्तर हवेच होते..

"..............................." -लोकेशच मंद हास्य..

"सांग रे..खर काय?.." - शाहिदची बेचैनी आकाशापर्यंत पहोचली.

"जेवा गप्प....तू काय मोठा राजा आहेस?....का बघेल तुला ती?" - लोकेश अजूनही थट्टेच्याच मूड मध्ये

'असू दे.. चल जेव..आपल्याला काय?..' शाहिद ने विषय संपवला..

.....

........

मधु..मधु यशवंत कामतेकर..

वय -..२५ वर्ष २ महिने १४ तास आणि २७ मिनिटे

उंची- ५ फुट ६ इंच.

वर्ण - गोरा.

अजूनही अविवाहित..!!

डिझायनिंग विभागात कारकून..

त्या पहिल्या दिवसाच्या संध्याकाळपर्यंत शाहिदने नकळत इथ्यंभूत माहिती काढलीदेखील..!! अर्थात त्या गोष्टीचा अंदाज कोणालाच आला नाही म्हणा. पण एका छुप्या एकतर्फी प्रेम कहाणीची सुरवात मात्र ऑफिसमध्ये सुरू झाली होती.....

x x x x x x x x x x x

प्रेम..!! या शब्दाच खर अस्तित्व काय?. जात काय ?. नक्की व्याख्या काय ?.. कोणीच सांगू शकत नाही. पण प्रेमात माणूस आपल्या अस्तित्वापलिकड़े स्वप्न बघू लागतो . अशक्य गोष्टीही शक्य वाटू लागतात . मग ते कधीही आणि कोणावरही झालेल असो ..!! त्याचे सर्व दोष एकतर अचानक आवडू लागतात नाहीतर किमान त्या सर्व उणीवाशी तडजोड करण्याची भावना आणि ताकद आपल्यात येते . समोरचा जसा असेल तसा स्वीकार करण्याची मानसिकता तयार होते . आणि एकंदरीत आपल्या आवडीचा जीव त्याच्या असणाऱ्या सर्व चांगल्या वाईट सवयीबरोबर कसा मनात रुततो काही कळतच नाही ....

शाहिदलाही असंच काहीतरी झाल होत ..!!. संपूर्ण तन-मन-श्वासात 'मधु' नावाचा एक जहाल विषाणू फार वेगात संक्रमित होत होता. खंबीर मनाला प्रेमाची बुरशी लागत होती.

तसं दोघांच्या स्वभावाचा-व्यक्तिमत्वाचा एकत्रित विचार करून जर अनुमान काढला तर जशी क्षितिजाची दोन टोके..!! मधु तशी कमी बोलणारी..मितभाषी..जवळ जवळ कंटाळवाणीच. आणि शाहिद हसरा-बोलका-बडबड्या दिलखुश माणूस. मधु तशी सोज्वळ..पण वक्तशीर. कोणाच्या जास्त अध्यात मध्यात नसणारी. दिवसभर काम एके काम आणि मर्यादित बोलण हसण आणि मग घर. अगदी जेवताना सुद्धा सर्वात जास्त मिसळायची नाही. त्रयास्थसारखी घोळक्यात असून पण एकटीच. याउलट शाहिद तसा कामात ठीक ठाक पण उनाडक्या..कामाचा जास्त बाऊ न करणारा.. ह्याला चिडव, त्याची खेच अस मजेशीर जीवन जगत पूर्ण ऑफिसच वातावरण ही मजेशीर ठेवणारा..करणारा.. सर्व जण त्याला पसंद करत..आणि या साहेबांची गाडी मात्र वेगळयाच स्टेशनवर थांबली होती. आणि त्यामुळे त्याने मधुच्या नीरस जीवनात मैत्री आणि प्रेमाचा रंग ओतण्याचा चंग बांधला.

"काय मधु?.. काय आणलाय डब्यात?.". - आतापर्यंतच दुसर संभाषण..

मधु ने न बोलता डबा पुढे केला.. आता कारल्याची भाजी होती.

तसा शाहिदला राग यायला हवा होता. सर्वजण एकत्र बसले होते. आणि मधूने 'हव तर घे' अश्या स्वरुपात डबा पुढे केला होता.

"अग मधु, या ऑफिसमध्ये बोलायचे पैसे कापत नाहीत पगारातून.. बोलण फुकट आहे..बोलत जा बिनधास्त.."

क्षणभर सर्वजण शांत. एकतर मधु जास्त बोलत नाही..तिच वैयक्तिक आयुष्य. त्यात हा टोमणा. ओळख ना पाळख..काय रिस्पोंस देईल देव जाणे..!!

"हा हा हा हा ....." ती चक्क हसली..मधु कामतेकर..चक्क मनमोकळेपणाने हसली.. सर्वजण खूप खुश झाले..

"अरे बापरे, तू हसतेस पण..?..." - शाहिद चा टोमणा नंबर दोन..

"हा हा हा हा.. हो मग..!!" - मधूला तो हलकासा विनोद खूप आवडला होता बहुतेक..!!

"नशीब आमच...बर उत्तर नाही दिलंस तू?... भाजीच नाव काय आत डब्यात चिकटवलय काय?.. मला तर कळलीच नाही कुठली भाजी ही?.."

"अरे वेड्या..कारल्याची भाजी ती..घे मस्त आहे.." - इति मधु..( पहिल्याच बोलण्यात थेट 'वेडा' म्हणते..?..सर्वजण क्षणभर कुतुहुलाने चूप.. )

आपण अचानक शाहिदला वेडा बोललोय हे मधु लाही उमगल.. ती ओशाळली..

"ओह्ह. सॉरी हा..चुकून.." - मधु ओशाळली होती..

"राहू दे ग..माझ टोपण नाव आहे ते.." - शाहिदकडे सर्व गोष्टीवर उत्तरे होती..

हसत मिसळत डबा खाण्याचा कार्यक्रम संपला. यावेळी मधु ही मनपूर्वक सामील झाली होती. यावेळी मात्र लपत लपत शाहिद आणि मधुच डोळ्याने झालेलं संभाषण सर्व मंडळीकडून हुकल होत...!!

आता सर्व सुरळीत चालू होत.

सर्वच स्वभाववैशिष्टे भिन्न असून पण हळू हळू शाहिद मधु कडे खेचला जावू लागला होता. तिच कमी बोलण, कमी हसण पण त्याला आवडायला लागल होत. मध्ये मध्ये फुकटच काहीतरी काम काढून मधुशी संवाद करायचा. तिला बोलत करायचा. हसवायचा. तसं मधूलाही शाहिद विषयी एक आकर्षण होतंच. तिलाही त्याच्याबरोबर वेळ घालवण आवडायचं. हळू हळू मधूही शाहिदच्या स्वभावशी समरूप होवू लागली. ऑफिस मध्ये कामासोबत इतर सर्व गप्पा टप्पात मधु सुद्धा सहभागी होवू लागली होती. जेवण करताना शाहिद च्या विनोद कौशल्यावर दाद देण्यात एका मंजुळ आवाजाची भर पडत चालली होती. पण या सर्वा समोरच्या मैत्रीला प्रेम म्हणता येईल का? मधूला मी असं काही 'विशेष' आवडत असेल का? - शाहिदच्या मनात अधेमध्ये शंकेची पाल चुकचुके. पण निदान आपल्या प्रयत्नाने, वागण्या बोलल्याने मधूच्या वागण्यात बदल झालंय ना...पुरे..बाकी प्रेम वगैरे विचारता येईलच की नंतर..

बदल..!! अगदी सोपेपणात विचार केला तर दोन उपशब्दाच संकुल..म्हणजे बल आणि दल..एखाद्या दलात स्वत:ला सामावून घेण्यासाठी बलपूर्वक केलेला प्रयास. मग ते बल तुम्ही लावा किंवा कोणी दुसऱ्याने. पण व्याख्या अशीच ठरते..नाही?..असे प्रसंग आपल्या जीवनात अनेकदा येतात..मग ते जीवनाविषयी असो, स्वत:च्या परिस्तिथी विषयी किंवा सभोवतालच्या समाजाच्या आपल्या विषयीच्या गरजेविषयी.. पण बदल हे होतंच असतात..होतातच.. फारतर त्याला सुधारित नाव म्हणून अनुकूलन म्हणू आपण फारतर..

मधूचा स्वभाव मनमोकळा झाला होता. नेहमी तिची नजर शाहिदला शोधत असायची. जेवताना धमाल उडत होती. आजकाल संध्याकाळी ऑफिस सुटल्यावर पण दोघा-तिघांनी त्यांना एकत्र फिरताना पाहिलं होत. शाहिद अचानक कामात वक्तशीर झाला होता. त्याचे सिगरेटचे प्रमाण फार कमी झाले होते.

आणि अचानक एके दिवशी शाहिद ने एका संध्याकाळी मधूला प्रोपोझ केलाच...!!!

x x x x x x x x x x x

दिवसभर श्वेतवर्ण दिसणारे फेसाळलेले समुद्राचे पाणी सूर्याचे लालसर रंग वापरून त्याच्या अफाट शक्तीला रोखणाऱ्या मळक्या कट्ट्याला आदळत होते..कमी जास्त उंचीच्या लाटा कोणालाही न जुमानता, कोणालाही न विचारता आपल्या कौशल्याचा खेळ किनाऱ्यावरून येणाऱ्या जाणाऱ्याना दाखवत होत्या..अधून कुतुहुलाचे पडणारे कटाक्ष बहुतेक त्यांना सुखावत असावेत..!!!! रस्तावरच्या फेरीवाल्यांना , भिखारयाच्या 'सुरेल' गाण्यांना तिथून अंगठाभर दिसणाऱ्या हाजीअलीच्या आवारातून दिलेली अजान व्यत्यय आणत होती..!! कमी वेळ असणारी पण आस्तिक म्हणवणारी काही दुरूनच ओठांना बोटे चाटत पुढे जात होती, थोडा जास्त वेळ असलेली आणि आस्तिक ही म्हणवून घेणारी जरास थांबून जमल्यास एक दोन ओळया पुटपुटून, नाहीतर डोळे बंद करून, हसून-रडून -चिंतीत काहीतरी करत आणि परत पूर्ववत होत पुढे पावले टाकत होती..जास्तच वेळ असलेली आणि अस्तीकतेची व्याख्या दिसणारी भल्या मोठ्या अंगाच्या सागराच्या उदरातून कोरलेल्या चिंचोळया पायवाटेतून दर्गा दर्शनाला पळत होती...तिथून परतणारी माणसे काही 'सिक कबाब' दाबत होती तर काही रांगेतल्या पहिल्या 'भिकारयाकडून' बंदे सुटे करून पुढच्या सर्व 'भिकाऱ्यांना' ( भिकारी कंसात लिहिणे भागच होते..!! नाही?..) वाटत जात होते...( त्यापेक्षा त्यालाच पैसे देवून 'सबलोक बाट लो रे' असं जमल असते...असो...देवाला दिसणार कसे?...)

अरुणदेवाची 'शिफ्ट' आता संपण्यातच जमा होती. दिवसभर ऊन-घाम-जीवन वाटून दमलेला भास्कर आता 'अरबीत' डुंबण्यात सज्ज होत होता..त्याचा कारभाराचा हलकाच कार्यभार सांभाळण्यासाठी रस्त्यावरच्या नीट मोजमाप करून खोचलेल्या खांबाच्या शिरातली ठिपके(बल्ब) आता हसू लागले होते..वाहनाची वर्दळ वाढू लागली होती..दमलेली पाखरे घोळक्यात आपापल्या घरी परतताना दिसत होती..'जोडप्यांचा' ऋतू चालू झाला होता..फेरीवालाच्या आवाजाला आता जोर चढला होता. दिवसभर आयुष्याशी कुस्ती खेळणारी आणि रोड क्रॉस करून हाजी ला प्रणाम करणारी सर्व डोकी आता त्याला विसरून पुढच्या वळणावरच्या 'क्रॉसरोड' समोर पाणी

पुरी,रगडा साठी रांग लावत होती..चंद्र राखणीसाठी तयारी करत, इथून तिथून 'इंट्री' मारत पोझिशन ठरवत होता..

या बदलत्या वातावरणाला भिक ना घालता एक संथ पण अखंड धूर हाजीला कट्ट्यावर दिसत होता आणि त्या धुरामागाचा चेहरा मात्र आस्तिक-वेळ -नास्तिक-काहीही या सर्व कल्पना ना सुरुंग लावत हाजीकडे एकटक बघत होता..कोणाचीतरी वाट पाहत..

एकामागून एक 'वूदंग गरम' मात्र थोड्या थोड्या अंतराने समुद्राचा रंग बदलण्याचा प्रयत्न करत होती..उरलेल्या जळक्या राखेच्या आधारावर...!!!!!

" काय रे साल्या, उतरली का तुझी ?" लोकेश ने मागून पाठीवर थाप मारली . एव्हाना शाहिदची सिगरेट संपली होती .

" मी ठीक आहे आता " - शाहिद ने स्पष्ट केले .

" मग इथे का बोलावलस ?.. अरे हो तुला गम्मत माहितीये ?.. आज मधु पण आली नव्हती ..आम्हाला वाटल .." - लोकेश ने डोळा माराला ..

" मी दिवसभर मधु बरोबरच होतो ..इथेच.." - शाहिद ने समुद्राकडे बघत अजून एक गौप्यस्फोट केला..

"अरे वाह्ह.. मग?..काय विशेष?..प्रोपोझ वगैरे केलास की काय?"

"कालच संध्याकाळीच केला होता.."- शाहिदचा अजून एक गौप्यस्फोट

"च्यायला..मग नाही बोलली होती वाटत..अच्छा म्हणून एवढा प्यालास काय?....काय झाल?..काय कारण?.. जात, धर्म, पैसा, की अजून काही?..अरे मित्रा आयुष्यात बदल हे करून घ्यायचेच असतात. आयुष्य जे आपणास जे दाखवत जाते ना, त्या हिशोबाने बदलत जायचं असत.. हे सगळ तिला तू समजावलं असशिलच... आता नाही ऐकत तर काय करणार..?..जावू दे रे..... अजून कोणीतरी चांगली भेटेल रे...... बर झाल लवकरच कळाल उत्तर तुला.. चल निघू.. होता है, दुनिया है..बस अपने आप को दुनिया के रंग मे ढालते चलो और आगे बढो..चल "- लोकेश त्याला समजावण्याचा प्रयत्न करत होता..

"ती मला हो बोललीये.." - शाहिदची नजर बोलताना अजूनही समुद्राकडेच...

"मला समजलं नाही.." लोकेश बुचकळ्यात पडला.." म्हणजे ती हो बोलली आणि तुला टेन्शन आहे..चक्क पिण्याएवढ?..या जगातला तू पहिला माणूस असशील ज्याला मुलीने होकार देवूनसुद्धा एवढ टेन्शन येवून त्याने दारू प्यावी..!!

एव्हाना शाहिद ने दुसरी सिगरेट पेटवली होती.

"बोल बे" - लोकेश किंचित चिडला..

"हम्म..ऐक तर.."

"मधु कामतेकर..यशवंत आणि कोमल कामतेकर यांची एकुलत एक अपत्य. कुटुंब मुळचे लंडनला स्थायिक. लहानपणापासून अगदी ऐशो आरामात वाढलेली. अभ्यासात, खेळात निपुण. बापाचा पसरलेला बिझनेस. फक्त तोंडाने बोलाव की ती वस्तू घरात हजर. शाळेत पण सर्वांना आवडत अस ते मुल. लहानपणापासून जाम बडबड, खेळकर अगदी माझ्यासारख..१० वर्षापूर्वी तिचे आई वडील वारले तेव्हा पासून ती अशी गप्प गप्प राहते. भारतात तिची मावशी राहते ती तिला इथे घेवून आली. तेव्हापासून इथेच आहे....."

"पण मग यात वाईट काय आहे?.. थोडे बदल तर जीवनात होतातच की रे..थोडी फार तडजोड करावी लागतेच रे..आणि आता तर ती पण हसमुख झालीये" - लोकेश समजूत घालत होता.. आता शाहिद कडून घेतलेली अर्धी सिगरेट लोकेशच्या ओठात होती.

"१० वर्षापूर्वी तिचे आई वडील का मेले माहित आहे?"

"नाही. काही अपघात?.."

" त्या आधी मधू कामतेकर......." शाहिद ने सिनेमैटेक पोझ घेतला.

"काय?.." - लोकेश अजूनही बुचकळ्यात.

" त्या आधी मधू कामतेकर हा एक मुलगा होता.." - आता पहिल्यांदा शाहिदने लोकेशकडे पाहीले.

"What?.. तू काय बोलतोय तुला तरी कळतंय का?...काळाची उतरली नाही वाटत..!!." - लोकेश ला स्वत:च्या कानावर किंवा शाहिद च्या बोलण्यावर विश्वास बसत नव्हता.

"हो" - शाहिद ने थंडपणे सांगितले.

"You mean Sex Change?.. लिंगबदल?.." - लोकेश ला मुद्दा स्पष्ट करावासा वाटला.

"Yup.."

"चल घरी जावू..बस झाल प्रेम..चल उठ.."

शाहिद अजूनही उठला नव्हता..अजून भरपूर सांगायचे होते त्याला..त्याने नजरेनेच लोकेश ला थांब म्हणून सांगितले.

"चार वर्षानंतर मुलगा जन्माला आला त्यामुळे कामतेकर परिवार फार खुश होते. खूप जल्लोषाने मधूच जगात स्वागत झाल.आणि त्यानंतर संगोपनातही काही कसर राहिली नव्हती. त्याचे लाड,मागण्या सर्वच हाताच्या फोडासारख्या जपल्या जायच्या. पैशाची कमतरता नव्हतीच. सर्व सुरळीत चालू होते. पण जसं जसं एकुलत एक अपत्य मोठ ह्यायला लागल तेव्हा एक फार मोठी त्रुटी दिसू लागली होती. मधूचा आवाज तसा लहानपासुनच बायकी. ठीक आहे असेही दोष असतात म्हणून आई बाबांनी पहिले पहिले दुर्लक्षित केले. पण शाळेत जावू लागल्यानंतर त्यांना 'मधु' मध्ये छोटे छोटे पण अमुलाग्र बदल दिसायला लागले होते. बदल म्हणण्यापेक्षा त्रुटीच म्हणा. त्याला मुलींचे कपडे घालायला आवडायचे, त्यांच्यासारख नटण, मुरडण, वगैरे वगैरे. शाळेतपण तो जास्त मुलींमध्ये मिसळलेला असायचा. लहान असताना विरंगुळा समजून या सर्व गोष्टी दुर्लक्षित होत होत्या. पण नंतर मात्र हा बदल त्याच्या बोलण्या-चालण्यात जाणवू लागला होता. आता आई बाबानाही ही गोष्ट नजरेत यायला लागली होती. पण मधू लहान असल्याने दमदाटी आणि हलकी फुलकी मारहाण करून त्याला सुधारवण्याचा प्रयत्न केला जात होता. पण सर्वच विफल..!! शाळेतून काढून त्याला फक्त मुलांच्या शाळेत टाकण्यात आले. पण त्याच्या सवयी काही बदलत नव्हत्या. एव्हाना मधूलाही त्रास व्हायला लागला होता. शाळेत मुलांकडून चिडवल जाण, मग त्यात दुबळ ठरून मार खाण, कोणी लवकर मैत्री न करणं या सामाजिक अव्हेलनांना तो शिकार होवू लागला होता. तो मानसिक आणि शारीरिक दृष्ट्या विकृत आणि आजारी पडू लागला होता. एक-दोनदा अजाणपणे तो आई बाबानाही "मी एकटा का?, मला सर्व जण चिडवतात का?, माझ्याशी कोणी मैत्री का

करत नाही? " वगैरे विचारे तर त्यावर आई बाबाही निरुत्तर असायचे. तेही उडवा उडवीची उत्तरे देवून त्यालाच दमदाटी करत. त्यानाही तसा त्रास होत होता. एकुलता एक मुलगा अन तोही असं निघावा- त्यांना भार सहन होत नव्हता. मधू समलिंगी तर नाही ना?..असं ही एक वाईट विचार त्यांच्या मनात येवून गेला. शेवटी खूप विचार करून त्यांनी एका मोठ्या डॉक्टरशी संपर्क करण्याचा निर्णय घेतला. मधूची पूर्ण शाब्दिक, शारीरिक आणि मानसिक तपासणी झाली. आणि अहवालात मांडण्यात आलेले निष्कर्ष फार किचकट आणि धक्कादायक होते..."

बोलता बोलता शाहिद थोडासा थांबला. त्याने लोकेशला नजरेने खुण करून सिगरेट पेटवायला सांगितले.

मग?..पुढे?.. - लोकेश.

" कसं असत लोकेश, आतापर्यंत आपण मानवाचे दोनच मुख्यता: विभागात मोजणी करत आलो आहोत - स्त्री आणि पुरुष. त्या नंतर इतर उपविभाग निघाले ही गोष्ट वेगळी पण तितकीच खरी आहे . पण बहुतांशी विभाग दोनच. या विभागात गणना करताना मुख्यता: थोडाश्या परीक्षा/निरीक्षणे असतात. जसं सोनोग्राफी द्वारे लिंगनिश्चिती किंवा जन्माला आल्यावर या व्यक्तीचे शरीर रचनात्मक आणि जनुकीय घटक. पण अजून एक गोष्ट जी या सर्वा इतकीच महत्वाची असूनही विचारत घेतली जात नाही ती म्हणजे त्या व्यक्तीची स्वत:च्या लिंगाबद्दल असणारी जाणीव - याला GENDER IDENTITY पण म्हणतात. मधू मध्ये हाच प्रोब्लम होता.

मधू दिसण्यात मुलगा होता. तरी त्याच्यात पुरुष नावाच्या लिंगाविषयी मानसिक जाणीव नव्हती. त्याला स्त्री या लिंगाशी जास्त आकर्षण होते, जाणीव होती. लहानपणापासून या जाणिवेकडे झालेली दुर्लक्षपणा त्याला अजून त्यात ओढत गेला. त्याला मुलींचे कपडे घालणे, त्यांच्यातच मिसळणे आवडू लागले. शाळा बदल्यानंतर त्याचा हाच स्वभाव त्याचा एकटेपणाचे कारण बनू लागला. तो स्वत:ला मुलांमध्ये SECURE समझू शकत नव्हता..- अहवाल बघून आई वडिलांची तर दातखीळच बसली.. काय करावे कळत नव्हते.. पण विज्ञानात यालाही एक उत्तर होते..

डॉक्टर पुढे म्हणाले की जर असंच मधू ला ठेवलं तर तो मोठा होवून अशी एक विकृती बनेल ज्याला नेहमी असं मानसिक त्रास होईल की आपला आत्मा जणू चुकीच्या शरीरात बंदिस्त झाला आहे आणि हा समज त्याला एकतर जगू देणार नाही किंवा तेवढी मानसिकता मग मधू मध्ये तयार करावी लागेल जी सोपी गोष्ट नाही. पण

यावर दुसरा उपाय म्हणजे लिंगबदल करून घेणे. हे कायदेशीर आहे आणि त्याच्या आरोग्यासाठी पण बर. किमान त्याला समाजात भिन्नलिंगी म्हणून तरी जगात येईल..

मधूच्या आईवडिलांनी क्रांतिकारक निर्णय घेतला. त्यांनी मधू च लिंगबदल करायचं ठरवलं. पण त्यांना ते स्वत:लाच मानसिकरीत्या झेलता आल नाही. मधू असल्याने नाव बदलाव लागल नाही. पण मुलाची मुलगी झाली. समाजाने ते स्वीकारलं नाही. इज्जतीचे वाभाडे निघाले. कामतेकर परिवाराला वाळीत टाकण्यात आले. त्यांचा कारभार, नाती गोती यावर फरक पडायला लागला. वडील त्या धक्क्याने वारले. मग मागोमाग थोड्या दिवसाने आई पण. मधू आता पूर्णपणे अनाथ झाली. तिची आत्या तिला भारतात घेवून आली. तिच शिक्षण वगैरे मग इथेच झाल. ..- पुढच जवळ पास तुला माहीतच आहे. " - शाहिद ने एक मोठा श्वास घेतला. एक छोटासा अश्रू नकळत समुद्रात पडला होता.

"काही नाही रे, दुसरी कोणीतरी भेटेल तुला. देवाचे आभार मान की तुला हे सर्व आधीच माहित पडल..आणि त्या मधूचाही विचार आता सोडून दे " - लोकेश समजूत घालत होता.

शाहिद हसला. अगदी मंद.पण अगदी दिलखुलास ...मनापासून. लोकेशला चूकचुकल्यासारखे झाले.

"काय झाल?"

"मी मधू बरोबरच लग्न करणार आहे.." - शाहिद. आता समोरचा समुद्रही लोकेशसारखाच चकित झाला होता.

"काय?.. Are You OK?.. You mean you and Madhu..?..." - लोकेश ला विश्वास बसतनव्हता

"हो."

"पण का?' I mean you deserve much better than her yaar...""

"तसं नाही रे. हे बघ माणूस आयुष्यात सर्वच हव तसं मिळवू शकत नाही. किंबहुना त्याला सर्व मिळालेले त्याच्या आवडीचे असतेच असेही नाही. त्यात बदल होत राहतात. काहीवेळा काळ बदलतो अन काहीवेळा आपण.

एखाद्या मुलीला प्रेम करताना लग्न करतना आपण फारतर आजपर्यंत काय काय गृहीत धरतो?..जात , धर्म , करियर, शिक्षण आणि अश्याच छोट्या मोठ्ठ्या तडजोडी नाहीत का ?.. त्यात आपण काही बदल अपेक्षित धरतो काही समोरचा. तर काही अपेक्षा काळाकडून असतात. बरोबर ना?..

आणि नाहीतरी मधूला वाटल असत तर मला काय कोणालाच हे सत्य कधीही कळाल नसत. तशी गरजच नव्हती. ती आता एक परिपूर्ण स्त्री आहे. खंबीर आहे. शरीराने आणि मनानेही. सामाजिक पातळीवर तिचा झालेला छळ- अस्वीकार, भोगी आलेल्या अवहेलना, आमरण साथ देत आलेले एकटेपण, भावनांचा गदारोळ आणि वैयक्तिक आयुष्याची अस्वस्थ वाटचाल या सर्वातून स्वत:ला सावरून ती या निर्दयी जगासमोर जगात आहेच ना..?.. या गोष्टीत कोणी तरी तिला समजून घेईल अशीच तिची छोटीशी इच्छा..!! त्या अजान पोरीला याचीही कल्पना आहे की तीने हे सर्व मला सांगितलं खर पण जर मी पण अविश्वासू निघालो तर परत तेच सर्व दु:ख डोंगर तिला पुन्हा दिसतील. पण नाही..ती ला मी आवडतो . खूप प्रेम करते ती माझ्यावर. माझही तितकंच प्रेम आहे तिच्यावर. कालच तिने मला सर्व सांगितलं. खूप वाईट वाटल मला. म्हणून तर ती दारू आणि धिंगाणा. पण आज पूर्णवेळ इथेच बसून विचार केला. अगदी सरळ आणि प्रात्यकक्षिकतेने ..

मला माहितीये की फक्त मधुच हे गुपित असंच टिकवून ठेवून- माझ्यापुरतच मर्यादित ठेवून पण पण मी तिची मदत करू शकतो. पण मन ऐकत नाही. मी खर प्रेम केलंय तिच्यावर. माणूस बदलत जाणाऱ्या किंवा सर्व गोष्टीमुळे आपल्यात आलेल्या बदलांना अनुकूलन म्हणतो, प्रगती म्हणतो, क्रांती म्हणतो. पूर्वीपासून चालत आलेल्या आणि मनाला न पटणाऱ्या अघोरी रूढी परंपरातून आणि प्रथाथून आपण कधीच बाहेर आलो आहोत . ते तर मानवाने बनवलेले आहेत. हा तर नैसर्गिक बदल रे. याला आपण का स्वीकारू नये?.."

- शाहिदच्या डोळयात एक विलक्षण चमक होती. आयुष्यात पहिल्यांदाच त्याने स्वत:ला आणि त्याला लोकेशने त्याला एवढा गंभीर पाहिलं होत. तेही असं क्रांतिकारी निर्णय घेताना ..!!

"हे गुपित आपल्या दोघातच राहिल असं मला विश्वास आहे ..- शाहिद ने भुवया वर करून लोकेशला शंकायुक्त विचारलं..

" बस क्या.." - लोकेशने होकारार्थी मान हलवली.

दोन मित्र लगेच मजा मस्करी करत खांद्यात खांदा घालून निघाले होते. रात्र जन्माला येत होती..

x x x x x x x x x x x

आणि दुसऱ्या दिवशी जेव्हा शाहिद ने जेवताना भर ऑफिस मध्येच मधूला लग्नाची मागणी घातली तेव्हा ती गडबडून गेली होती. हसावं की रडावं तिला कळत नव्हते. तिला अतोनात आनंद झाला होता. लाजून लाजून ती लाल झाली होती. सर्वीकडे टाळया चा आवाज, जल्लोष होत होता.लाजत लाजत अचानक रडायला लागली अन शाहिदला धावत येवून घट्ट मिठीत विसावली.ती का रडतेय?.. अस थोड्या लोकांना चुकचुकलच.. तेवढ्यात लोकेश बोलला.

" लग्नात उशीर होतोय. विरह सहन होत नाहीये बहुतेक..म्हणून वाईट वाटतंय ना..?..होय ना वहिनी?.." - अन परत एक हास्यतुषार..

चटकन मधू लाजत शाहिद पासून दूर पळाली. अन दूर उभ राहून हसायला लागली. अगदी निखळ..सोज्वळ.. जर कालचा समुद्र जर ते हसू पाहत असता तर शाहिदने त्याला नक्की सांगितलं असत....

"बघ रे, तुझ्या रुंदीशी स्पर्धा करायला माझ्या बायकोच- मधुच हसूच पुरेस आहे..लावतो का पैज?.."

# ❋ गाण्यांचा खजिना आणि १ जीबीचा खेळ

✍ प्रथमेश सुरेश शिरसाट

आपल्यापैकी बऱ्याच जणांकडे हल्ली Multimedia मोबाईल फोन्स असतात आणि संगीत रसिक मंडळी अहोरात्र कानाला हेडफोन लावून किंवा ब्ल्युटूथ डिव्हाईस लावून गाण्यांचा आस्वाद घेत असतात अर्थात याचे फ़ायदे तोटे जनून घेऊन काही मंडळी हेडफ़ोनशिवाय देखील गाणी ऐकतात, असो हा ज्याचा त्याचा प्रश्न झाला. तर आपल्याला नेहमी वाटत असते की आपल्या मोबाईल फोनमध्ये किंवा आयपोडमधील मेमरी कार्डामध्ये जास्तीत गाणी राहावीत. पण मेमरी पुरेशी नसल्यामुळे आपली गैरसोय होते आणि उत्तमातील उत्तम गाणी तर आपल्या मोबाईलमध्ये ठेवावीच लागतात.

प्रत्येक गाण्याच्या फाईलची साईज ही शक्यतो ३ ते ६ एम बी इतकी असते काही काही फाईल्सची साईज तर अगदी १० ते १२ एम बी सुद्धा असते ज्यामुळे आपल्या १ जी बी च्या मेमोरी कार्ड मध्ये साधारणतः २०० ते ३०० एवढीच गाणी राहतात.

गाण्याची साईज वाढण्याचे मुख्य कारण गाण्याचा बीट रेट असतो.हा बीट रेट जर कमी केला आणि गाण्याची मुळ क्वालिटी (म्हणजेच ओरिजिनल क्वालिटी) ठेवली तर आपल्या गाण्याची साईज नक्कीच कमी होईल. यासाठी मी इंटरनेटवर एक भन्नाट सोफ्टवेअर शोधून काढले आहे. त्याचे नाव आहे MP3 Reducer. मला वाटतं जास्त काही बोलण्यापेक्षा नावंच पुरेसं आहे. याचे नाव जरी Mp3Reducer असले तरी .wav या फॉरमॅटमधील फाईलची size सुद्धा कमी करता येते. हे सोफ्टवेअर डाऊनलोड करण्यास अतिशय सोपे आहे आणि व्हायरसमुक्त सुद्धा आहे.


- MP3 Reducer डाऊनलोड करण्यासाठी येथे क्लिक करा.

आपल्या माहीतीसाठी या सोफ्टवेअरची installation प्रक्रिया मी खालीलप्रमाणे दाखवत आहे.


वरील लिंकवर क्लिक केल्यावर MP3 Reducers नावाचे एक zip (Compressed) फाईल(फोल्डर) डाऊनलोड होईल.



आता त्या फोल्डर वर Right क्लिक करून Open With ------> Compressed( Zipped) Folders हा पर्याय निवडा आणि डाउनलोड केलेले फोल्डर (फाईल) उघडा. त्यात तुम्हाला installer नावाचे फोल्डर सापडेल.




installer फोल्डर उघडा आणि त्यातून Mp3Reducer नावाच्या फाईलवर डबल क्लिक करा.





तुमच्या समोर Compressed (Zipped) Folders Warning नावाची विंडो उघडेल त्यातील Run या बटणावर क्लिक करा.





आता तुमची मुख्य सोफ्टवेअर installation ची प्रक्रिया सुरु होईल. ती अनुक्रमे खालील प्रमाणे असेल.


१.


MP3Reducer Install Program - Welcome
Welcome to the MP3Reducer Install program.
This program allows you to install MP3Reducer on your hard drive.
It is strongly recommended that before proceeding, you ensure that no other Windows programs are running.
If you do not wish to install MP3Reducer, click 'Exit' now, otherwise click 'Next' to continue.
< Back
Next >
Exit


२.


MP3Reducer Install Program - Information
Please read the ReadMe.html file
< Back
Next >
Exit


३.


MP3Reducer Install Program - Directory
MP3Reducer's files will be installed in the following directory:
C:\Program Files\MP3Reducer
Disk space needed : 2 Mb
Available disk space : 13756 Mb
Click 'Next' to continue.
< Back
Next >
Exit


४.


MP3Reducer Install Program - Confirmation
This program will install MP3Reducer into C:\Program Files\MP3Reducer.
Click 'Start' to install MP3Reducer.
< Back
Start
Exit


५.


MP3Reducer Install Program - Installing
File : C:\Program Files\...\MP3Reducer
77%
< Back
Next >
Cancel


६.


MP3Reducer Install Program - End
MP3Reducer has been successfully installed.
Click the following button if you want to see the latest information concerning MP3Reducer :
View ReadMe.htm
Select the following option if you want MP3Reducer to be launched after exiting this install program :
Launch MP3Reducer
< Back
Next >
Exit


७.





Exit या बटणावर क्लिक केल्यावर तुमची Installation ची प्रक्रिया संपेल, तुमच्या काँप्युटरवर Mp3Reducer नावाचे सोफ्टवेअर install होईल आणि आपोआपच Mp3Reducer सोफ्टवेअरची विंडो ओपन होईल. आता तुम्हाला हवी ती Music फाईल Open audio file या बटणावर क्लिक करून निवडा आणि Select New Bit Rate मध्ये जाऊन 32 kbps इतका ठेवा.




आता मी नटरंग या सिनेमातील एक गाणे निवडले आहे ज्याची मुळ size १०.९५ mb इतकी आहे. save reduced files to या पर्यायाद्वारे output location (म्हणजेच नवीन कमी size ची फाईल सेव्ह करायची जागा) निवडा. ही जागा निवडण्यासाठी तुम्हाला Browse या बटणावर क्लिक करावे लागेल. मी Desktop वरच नविन फाईल सेव्ह करणार आहे म्हणून मी तशी जागा (location) निवडली आहे.




नंतर तुम्ही Start reduce या बटणावर क्लिक करा. नंतर तुम्हाला Mp3Reducer ची प्रक्रिया होणारी विंडो दिसेल. त्याती Abort या बटणावर क्लिक करा नका (Abort या बटणाचा उपयोग तुम्हाला reducing ची प्रक्रिया जर थांबवायची असेल तर आणि तरच क्लिक करा).




ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर तुम्हाला Complete ची विंडो दिसेल त्यातील OK या बटणावर क्लिक करा. की झाले तुमचे काम !!!




आता आपण आपली तयार झालेल्या फाईलची size बघुया. या नविन तयार झालेल्या फाईलची size बघण्यासाठी मी Desktop वरील त्या फाईलवर फक्त माझा माऊस पॉईंटर नेऊन ठेवला की लगेच मला त्या फाईलची संपूर्ण कुंडली (माहिती) दिसली.




ज्या फाईलची मुळ size होती १०.९५ mb आणि आता त्याच फाईलची size आता झाली आहे १.०९ mb म्हणजे ९० % size कमी झाली आहे. मंडळी आता विचार करा तुमच्या १ जी बी च्या मेमरी कार्डमध्ये आता ८०० हून अधिक गाणी राहतील. या सोफ्टवेअरच्या मदतीने एकावेळी फक्त १ च फाईल लहान करता येते. तुम्हाला जर एकाचवेळी १ पेक्षा जास्त फाईल्सची size कमी करणारे चकटफू सोफ्टवेअर सापडले तर ते नेटभेट च्या चाहत्यांना नक्कीच कळवा. मला यापेक्षा वएगळी काही सोफ्टवेअरर्स सापडली होती पण Mp3Reducer च्या तुलनेत फार कठीण होती आणि त्यांची फाईल लहान करण्याची क्षमता देखील बरीच कमी असल्याचे मला आढळून आले, म्हणून मी या सोफ्टवेअरची निवड केली. अशाच प्रकारे आपण आपल्या संगणकातसुद्धा गाण्यांची साईज कमी करून खुप गाण्यांचा संग्रह करू शकतो, यामूळे आपल्या संगणकातील जागही वाचेल आणि आपण जास्तीत जास्त गाण्यांचा आस्वाद घेऊ शकू.

# चप्पलपुराण

सुनिल पाटकर

नदीचं मूळ आणि साधूच कुळ कुणी शोधू नये असं म्हणतात. मला वाटतं तसंच चपलांचा इतिहास कुणी शोधू नये. पादुका, खडावा, चप्पल,बूट असा हा चपलेचा अनंतकाळाचा प्रवास ... गावातील एका झाडाखाली चप्पल बांधणी पासून चकाचक अशा माँल पर्यंत प्रवास करत पोहोचलेले चप्पल आणि बूट....

चपलांच्या दुकानात गेलं की इवल्याश्या आकारा पासून अगदी फताड्या पायापर्यंत सर्वच आकारामध्ये चप्पल आणि बूट पाहायला मिळतात.बुटांतही नावीन्य आहेच..लेदरचे चकाकणारे बूट ते रफ अँड ट्फ स्पोर्ट्स शूज पर्यंत रंगीबेरंगी बुटांचा प्रवासही वाखाणण्याजोगा .माणसाच्या आयुष्यात चप्पल आणि बुटांना तसे तुच्छ स्थान...पण खरं सांगू थोडा विचार केला तर त्यांचे स्थान बहुमोल असे आहे.कपड्यानंतर माणूस सर्वाधिक काय वापरत असेल तर ती चप्पल !. प्रत्येक सुखदु:खात , दऱ्याखोऱ्यात.,काट्याकुट्यात ,ऊनपावसात चप्पल आणि बूट आपल्याला साथ देतात.आणीबाणीच्या प्रसंगात उपयोगात येणारे हमखास हत्यार म्हणजे चप्पलच .

देवाच्या दर्शनाला उभे असलो तरी आपली नजर चपलांकडे असतेच की.चप्पल आणि बूट कुणी चोरणार नाही ना ? हा विचार मनात येतच असतो.खडाखडा बुटांचा आवाज करत चालणारे पोलिस -सैनिक पाहिले की अंगावर रोमांच उभे राहतात.प्रभुरामचंद्र वनवासात गेल्यावर त्यांच्या पादुका सिंहासनावर ठेवून भरताने राज्यकारभार केला होता.आता नेत्यांचा चपला उचलून हुजरेगिरी करून अनेक जण स्वामीनिष्ठा दाखवताना आपण पाहतो.अंगावर चप्पल नाहीतर बूट फेकून मारण्याचे नवीन फँड हल्ली जोर धरतेय. जाँर्ज बुश, पी.सी.चिदंबरम ,अडवाणी, बिहार विधानसभाध्यक्ष , उमर अब्दुल्ला, अशोक चव्हाण यांच्यावर चप्पल-बूट फेकून मारलेली उदाहरणे आहेत.अभिनेता जितेंद्र पासून आरोपीने न्यायाधीशाला चप्पल-बूट फेकून मारल्याचे आपण वाचलेले आहे.त्यामुळे सद्यस्थितीत चपलांना महत्त्व प्राप्त झाले.

चप्पल ,बूट ,ज्युता ,सँन्डल ,शूज ,सभ्य भाषेत पादत्राणे तर गावरान भाषेत पायताण -वहाण असे विविध शब्दप्रयोग आपल्या वापरात कायम असतात.नोकरीसाठी मुलाखत देणाऱ्या उमेदवाराला कपड्यांइतके चप्पल-बुटांकडेही लक्ष द्यावे लागते ,छेड काढणाऱ्या मवाल्यांपासून दूर राहायचे असेल तर महिलांना चपलांचा कित्ती-कित्ती आधार वाटतो.मेरा ज्युता है जपानी म्हणत चप्पल सिनेमात पोहचली.बुटांवर कँमेरा मारल्या खेरीज हिरोची सिनेमात एंट्री कधी झालेय ?.लग्नकार्यात वराचे जोडे लपवल्या शिवाय करवलीला हक्काची कमाई कशी होणार ?.पिकपिक आवाज करणारे बूट घालून चालणाऱ्या लहान मुलाकडे सारेच कसे प्रेमाने बघतात. टाचांच्या चपला घालून स्त्रियाही उंच व्हायला बघतात.कोल्हापुरी चपलांचा आवाज तर भारदस्तपणा दाखवणारा.जीन्स पँटवर शोभणारे बूट तरुण तरुणींचे व्यक्तिमत्त्व कसे खुलवते.आपल्या सामाजिक वैयक्तिक जीवनात चपलांना कळतनकळत महत्त्व आलेले आहे.हे महत्त्व वाक्प्रचार-म्हणींपर्यंत पोहचले आहे.पाहुण्याच्या बुटाने विंचू मारणे ,बापाचे जोडे मुलाला झाले की मुलगा मोठा झाला.मुलीचे लग्न जुळवताना जोडा झिजवावा लागतोच.पायातली वहाण पायात बरी असं म्हणत एखाद्याची लायकी काढली जाते.त्याला चपलेशी उभा करू नका..चपलेने हाणा असा शब्द रागाच्या भरात निघतो. हे सार खरं असले तरीही रात्री-अपरात्री घराबाहेर पडताना पायात चप्पल

घालून जा रे असा वृद्ध व्यक्तींचा हमखास सल्ला असतो. केवढा हा चपलेवर भरवसा...आपल्या सोबत असणाऱ्या या चपलेने आपले विश्व किती व्यापलंय ना ?,

लहानपणी आई आणि आता पत्नी मला बजावते अरे ते बूट बदल आता किती झिजलेत ?

माझे बूट खराब झाले म्हणून मी कचऱ्याच्या कुंडीत टाकून दिले.काही दिवसांनी माझे तेच बूट एका भिकाऱ्याच्या पायात मी पाहिले.माझी गरज संपलेले ते बूट आज कुणाची तरी गरज झाले होते.स्वत: झिजून दुसऱ्याला सुगंध चंदन देते हे आपल्याला माहीत आहे .पण स्वत: झिजून आपल्याला आनंद देणाऱ्या चपलेच्या बाबतीत आपण सापत्नभाव ठेवतो ,आयुष्याच्या संपूर्ण प्रवासात आपल्याला साथ देणारी चप्पल आपल्या कडून तशी दुर्लक्षित राहते.

# मैत्रीचे नाते जपून बघा

विशाखा मशानकर



**My Daddy Fool Fool Fool**

**My Daddy Fool Fool Fool**

"फादर्स डे" च्या दिवशी अचानक वर्गातून आलेल्या या आवाजाने मी अवाक् झाले. नविन शाळा नविन विद्यार्थी यामुळे बरेच प्रश्नार्थक चिन्ह होते. त्या मुलाला मी जवळ बोलाविले तर त्याच्यासोबत त्याचे ५-६ मित्र पण आलेत. सहज हसून मी त्याला विचारल, " का रे राजा का अस बोलतोस ??" त्याच्या आधी त्याचे मित्रच ओरडलेत "अनुरागच्या च्या आई वडिलांचा डिवोर्स झालाय म्हणून हा नेहमीच अस बोलतो." मी त्या सर्व मुलांना जागेवर बसायला सांगितलं आणि अनुरागला थांबवून घेतलं. त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.माझ बोलण झाल्यावर लगेच त्याच उत्तर, "तुम्ही माझ्या आईला बघितलत ? किती छान आहे न ती ?? दिसायला आणि स्वभावाने पण.......मग इतक्या छान बाईला जो माणूस टाकून देतो तो फूलच कि नाही ???"

तेव्हढ्यात माझा पिरेड संपला. नंतरचा पिरेड ऑफ असल्याने मी टीचर्स रुममध्ये येवून बसले. पण मनान मी त्या अनुराग जवळच होते. केव्हढा आक्रोश त्याच्या मनात वडिलांबद्दल !!! आई वडिलांच्या चुकांचे लहान मुलांवर कळत न कळत असे परिणाम दिसू लागतात. त्यातल्या त्यात १० -१२ वर्षाच्या मुलाचं वय फार नाजूक असत. आपण त्याला बऱ्याच वेळा "प्रोब्लेम एज" असही म्हणतो. साधारणत: ८-१० वर्षापर्यंत मुल आपण जे सांगू तसे वागत असतात. त्यांच्या जीवनाची चावी आपल्या हातात असते. आपल्या डोळयांनी ते सार विश्व बघत असतात. मुल १० वर्षांचं झाल कि सभोवतालच जग अनुभवायला शिकत. आणि मग त्याला घरून शाळेतून तसेच शेजाऱ्या - पाजाऱ्याकडून जे डोज मिळतात त्यावर त्यांच्या आयुष्याची इमारत उभी रहाते.

याच काळात घरातील घडामोडींना वेग आलेला असतो. सिनिओरीटी वाढल्यामुळे आई वडिलांची पदोन्नती पर्यायी त्यांना सतत भासणारी वेळेची कमतरता.......मुलांकडून भरमसाठ अपेक्षा....... यात मुलाच बालपण कुठेतरी हरवून जात. आणि मग त्या बालमनात धुमसत राहते एक शांत आग ........... या आगीला थोडी जरी हवा मिळाली कि मग तिचा स्फोट होतो. न कळत मग आपल्या तोंडून प्रश्न निघतो, इतक्या लहान वयात याला हे कळल कस ?????

मायेचा स्पर्श, प्रेमाचा ओलावा, थोडा वेळ, मैत्रीपूर्ण संबंध.........हेच आपल्या अणि आपल्या मुलाच्या रेशमी बंधनाचे अलंकार !!

# भेट

रवींद्र दंतकाळे

सकाळपासून लगबग सुरू असलेल्या तुकाच्या घरी बाहेरच्या चुलीवर गाडग्यातल्या आमटीला एव्हाना उकळी फुटली होती. गाडग्यातून बाहेर पडणाऱ्या वाफा आतली आमटी शिजल्याचा गंध बाहेर घेऊन पडत होती. गौराक्काच्या भाकऱ्या थापण्याच्या आवाजानं परिसर उगीचच भरून राहिल्यागत वाटलं होतं. भाकऱ्यांची थप्पी एकावर एक चढत होती. त्याला चुलीजवळ आणून एकेक भाकरीला चांगलं कोळशाच्या निखारावर भाजून कडक करण्यात गुंगून गेली होती गौराक्का.सकाळचे बहुधा आठ-नऊ वाजले असतील.

तसं तुकाच्या घरी कुणी सर्व्हिसला जाणारं नव्हतं किंवा त्याच्या इवल्याशा खोपटात कुणाला टाईम पाळण्याचं बंधनही नव्हतं. कोपऱ्यात गुंडाळून ठेवलेल्या गोधडीवर बसून तुका उगीचच शेणानं सारवलेल्या जमिनीवर रेघोट्या मारत व्हता.

"तुक्याऽऽ ए तुक्याऽऽऽऽ..."

बाहेरनं आवाज आला.एवढा वेळ शांत असलेला तुक्या धडपडत उठला आणि आवाजाच्या दिशेनं कटाक्ष टाकला.तिथं म्हादा आला व्हता. म्हादा तुक्याचा मावसभाऊ.

"का रं म्हादा, लई हुशीर केलासा..." तुक्यानं पुसलं.

"हावं झाला हुशीर पर तू मात्र बिगी बिगी आटप. लौकर निघाया हवं..."

म्हादानं आल्याआल्या पिशवी ओसरीवर ठेवली.

"ये वाईच. अन् बैस जरा घडी. म्या शिदोरी बांधून आलोच..."

म्हादानं उपरणनं उगीचच तोंडावर हात फिरवला. तवर तुक्यानं च्या चा ग्लास आणून म्हादासमोर ठेवलं.

"ही घी, च्या. म्या आताच घेतला व्हता."

"आरं... च्या बी काय नगं ! त्वा चल बिगीबिगी. धुपारची येसटी चुकाया नगं... तालुक्याच्या गावी जाऊनशान म्हिठाई घ्यायची हाय नव्हं...?"

"अं... व्हय व्हय... आलुच म्या कापडं घालून अन् पैका घेऊन..."

तुका आत गेला. तुक्याच्या बायकोनं अंधाऱ्या खोलीतून कापडी पिशवी, अन डबा त्याच्याकडे दिला. अन् पदरानं डोळे पुशीत बराच वेळ थांबली.

ठेवणीतलं कापडं घालून तुका बाहेर आला. मुंडासं बांधलं अन् दोघं पायवाट तुडवत निघाली.दुपारंच रपरप हाणणारं उनं. पाऊलवाट धुळीनं माखलेली. लगतचा ओढादेखील आपलं अस्तित्व हरवून बसलेला.

हमरस्ता नजीक आला. एखाददुसऱ्या वाहनाचा ठिपका दिसायचा आणि मोठा मोठा होत परत विरुद्ध दिशेनं नाहीसा व्हायचा...!खोपटीवजा एक पडकी झोपडी होती. तिचा वापर म्हणजे हॉटेलसारखं करण्यात आलं होतं. साडेतीन ओंडक्याच्या लाकडावर तोल सांभाळत असलेलं टेबल. खुर्च्या म्हणून समोरच दोन ओंडक्यांवर फळी टाकलेली. वर झाडाची सावली अन् कुठल्यातरी जाहिरातीचं होर्डिंगच्या कापडाचं वापर छतासारखं केलेलं. बिनकामाची दोन-चार टाळकी जमलेली. कुठल्यातरी जुन्या जमान्याचा पेपर उगीचच फडफडत होता.हाशहुश करत म्हादा अन् तुका हमरस्त्याला आली. खोपटाकडं जरा गर्दी होती. बोचकी, गाठुडं घेऊन गडी आणि बायामाणसं बसची वाट बघत बसली होती. त्यामुळे एस.टी. यायला आवकाश होता. हे साधं गणित.

तुक्यानं सदऱ्यातनं चंची काढली. चंचीची दोरीनं बांधलेली गाठ सोडली. त्यातनं सुपारीचं खांड काढलं अन् आडकित्ता काढला. सुपारी आणि आडकित्त्याकडं न पाहता त्यानं सुपारी व्यवस्थित कातरली.काही काळ असाच गेला.

त्या शांत वातावरणात एकदम चैतन्य संचारल्यागत हालचाल झाली. बायामाणसं उठून बसली तर पोरांनी कालवा केला. लांबून रस्त्यावरनं लालरंगाची बस येत व्हती. दुरून येणारा हा ठिपका जवळ आल्यावर मोठा झाला. बस थांबती का न्हाई ही धाकधुक मनात. बहुधा सगळ्या मंडळींचा हात बस थांबवण्याची विनंती करत हलवत होती.

बस थांबली. दरवाजा उघडला गेला. त्यासरशी गुळाच्या ढेपाला मुंग्या चिकटाव्या तशी माणसं दरवाजासमोर चिकटली गेली.

"एऽऽऽऽ दमा... बस खाली हुणार हाय. चढू नगा..."

"एऽऽऽऽ मावशे सर बाजूला ती बोचकं पडल अंगावर सर..."

कंडक्टरच्या कालव्याला न जुमानता बसमधील प्रवाशांची खाली उतरण्यासाठी तर खाली असलेल्या नव्या प्रवाशांची नव्या दमानं आत प्रवेश करण्यासाठीची लढाई सुरू होती.

पाच मिनिटांच्या अंतरावर सगळ स्थिरस्थावर झालं. लगबग शांत झाली, कालवा शांत झाला....

'डबल बेल' मारली गेली आणि एसटीनं पुन्हा नव्या जोमानं पुढच्या मार्गक्रमाणाला निघाली.सिटवरच्या कडेला आपलं बूड व्यवस्थित टेकवून बॅलन्स सांभाळत कंडक्टर आला.

"हं बोला, हिकडं नवीन कोण आलयं...?"

"दोन हाफ पंढरपूर द्या"

म्हादानं सदरातनं शंभरची नोट काढून कंडक्टरला देत म्हणाला.

"अं... हाफ ? कोण हैती?" कंडक्टर.

"ही काय हामीच हावं..."

"बघू कार्ड" पंचिंग मशिनची लयबद्ध टिक टिक करत कंडक्टर म्हणाला.

परत म्हादा आणि तुक्यानं सदऱ्याच्या खिशात हात घालून प्लॅस्टिकच्या पिशवीत चार-पाच वेळा घडी घालून ठेवलेले कार्ड बाहेर काढले आणि कंडक्टरला दिले.कंडक्टरनं त्याची खातरजमा करून तिकीटं फाडली, आणि पुढच्या सिटची तिकीटं फाडालया निघाला. म्हादा अन् तुका बराच वेळ खिडकीतनं पळती झाडे पाहत बसून राहिली होती.

सरगम टॉकीज आलं. बस निम्मी रिकामी झाली. नवीन स्टॅंड आलं. आता तर सगळीच बस रिकामी झाली.खाली उतरलेल्या म्हादा अन् तुका पिशवी सांभाळत गर्दीतनं मार्गक्रमण करू लागले.

रस्ते, गल्लीबोळं ओळखीची. यंत्रागत चाललेली दोघं हॉस्पिटलच्या गेटपाशी थबकली. मल्टिस्पेशलिटी असलेल्या हॉस्पिटल पाहून दोघांच्या जीवाची घालमेल झाली. क्षणभर तिथंच दोघं तिथंच थांबून राहिली.

हॉस्पिटलच्या मेन दरवाज्यातनं सफारी घातलेला आणि मोबाईलवरून बोलणारा आवाज आला. दोघांनी तिथं पाहिलं तर तो अनिल होता. जावई होता तो तुक्याचा...

एवढ्यात अनिलचं लक्ष त्यांच्याकडं गेलं.

"अरे व्वा ! मामा कधी आलात तुम्ही?" म्हणून मोबाईल बंद करून झपझप पावलं टाकत तो गेटकडे आला.

"अं काय न्हाय, धुपारच्या येसटीनं आलुय.""...जानकी कशी हाय...? अन् बाळ कसं हाय?" म्हादानं अलगदच अनिलला पुसलं.
"दोघंही एकदम मस्त आहेत. या चला आत बघा तुमची लेक आणि नात..."
जमिनीवरील किंमती टाईलवर चालताना दोघांना अवघडल्यासारखं झालं होतं. हॉस्पिटलचा टापटिप आणि भव्यपणा पाहून दोघं भांबावली होती.स्पेशल रूम आलं. अनिलची आई, छोटा भाऊ आणि मामा गप्पा मारत बसली होती.या तिघांना पाहताच ती सर्व उठली.
"नमस्कार मामंजी, या या... बसा"
अनिलच्या मामानं त्यांचं स्वागत केलं. छोट्या भावानंही नमस्कार केला आणि अनिलच्या आईनं स्मित हास्य करत हात जोडले.
"रामराम घ्येवा" आपसूकच तुक्याच्या तोंडून वाक्य निघालं.
शेजारी ऐसपैस कॉटवर जानकी आणि शेजारी ऍटॅच असलेल्या पाळण्यात ते गोंडस बाळ झोपलं होतं. शेजारी औषधांच्या बाटल्या, गोळया, काही फळं आणि बिस्कीटं होती. भिंतीवर लटकवलेल्या एलसीडीवर कुठलातरी मराठी कार्यक्रम सुरू होता.
जानकी अलगद उठली. तसं तुका एकदम पुढं आला..
"आरं नगं नगं बैश तिथंच त्वा..."
"बापू कधी आलासा ?" जानकीनं विचारलं.
"हा काय आत्ताशी आलो. जावईबापू वाटतंच गाठ पडलं म्हून तर इतपर्यंत यवस्थित आलु. नायतर आमच्यासारख्याना दिस गेला असता हुडकाया..."
"काय म्हणताय ताईसा..." म्हणून कातर आवाज झालेल्या म्हादा म्हणाला.
तशी बाप-लेकीचा कौतुक सोहळयात रमलेली अनिलची आई भानावर आली.
"काही नाही. आता तुम्ही आजोबा झालात. आणि गौरक्का आल्या नाहीत का तुमच्यासोबत..?"
"न्हाय पुढच्या बारीला येते म्हणली." असं म्हणून म्हादानं पिशवी अन् गठोड जानकीकडं दिलं.
पिशवीत बाळासाठी लहान शिवलेलं टोपडं होतं. शिवलेल्या दुपट्या होत्या. मऊकापडाचं लहानशी गोधडी होती...
"अरे वाऽऽऽ फारच छान आहेत हो, या टोपी आणि दुपट्या"
अनिलच्या आईकडून नकळत कौतुकाद्गार बाहेर पडले.तसा जरा म्हादा खुलला...
"व्हय... रातंदिस बसून शिवल्याती."
अनिलनं डबा उघडून पाहिलं तर त्यात येच्च होतं.
"हे काय आहे...?" म्हणून त्यानं डब्यामधील त्या पदार्थाची चव घेऊनही पाहिलं.
"ही जानकीसाठी हाय. यच्च हाय. जंगलातलं डिंक, बदाम, खोबरं, गुळ घालून वाटत बसली व्हती हिची आय..." म्हादा म्हणाला.
"अरे ही बाळंतीण बाईसाठी चांगलं असतं. तुमचे ब्रँडेड व्हीटॅमिन्स यापुढे फिक्के पडतात"
अनिलची आई यच्चची चिमूट हातात घेऊन पाहत म्हणाली.

आत्तापर्यंत तुका आणि म्हादाला आलेलं दडपण नाहीसं होत चाललं होतं. जानकीला पहिली मुलगी झाली म्हणून सासरची मंडळी काय म्हणतील याची सकाळपासूनची धाकधुक आता कुठं निवळायला लागलं होतं. अभद्र विचाराचं मळभ आता दूर झालं होतं. अनिलनं बाळासाठी आणलेले एकेक खेळणे पाहण्यात म्हादा आणि तुका दंग झाली होती.

"हे घ्या मामा बर्फी"

अनिलनं उंची मिठाईवाल्याकडनं आणलेल्या सोनेरी बॉक्स त्यांच्या हाती ठेवला.

"घरी आणि नातेवाईकांनाही द्या... आणि मामींना भेटायला येऊन जा म्हणावं..."

"जी व्हयं... नक्की सांगतुया"

आदबीनं म्हणत, म्हादानं मिठाईबॉक्स आपल्या कापडी पिशवीत ठेवत म्हणाला.

"चला परत येतु आम्ही. आता सांच्याला शेवटची गाडी हाय."

तुका म्हणाला."अरे काही खाल्लं नाही, घेतलं नाही असे कसे जाता तुम्ही?" म्हणून अनिलच्या भावानं बळबळंच त्यांना शेजारच्या हॉटेलमध्ये घेऊन गेला.

ताटं रिकामी झाली, बडीशेप आणि बिल आलं. बिल पाहून म्हादा अन् तुका थोडे चरकले. पण तोपर्यंत पाचशेची नोट तिथं ठेवण्यात आली होती.अनिलच्या भावानं नोट ठेवली आणि शिवाय वरनं दहा रुपये टीपदेखील ठेवली.

"चला आता" बडीशेपचा बकाणा भरत तो म्हणाला. त्या रुमवर सगळेच जमले होते.

म्हादा आणि तुका दोघांनी हात जोडलं, म्हादाचा जोडलेला हात हातात घेऊन अनिल म्हणाला,

"मामंजी आम्हाला मुलगी झाली म्हणून काही वेगळं समजू नका. एक गोंडस जीव आमच्या गोकुळात आला हीच मोठी गोष्ट आहे आम्हाला त्यामुळं तुम्ही जानकीची काळजी करू नका. निश्‍चिंत मनानं घरी जावा."

"जी व्हयं..."

पुढे शब्दच नव्हते...!

जानकी आणि पाळण्यातील बाळाला पाहून डबडबलेल्या डोळयांतील आसवांना अगदी तृप्त मानाने मोकळी वाट करून तुका आणि म्हादा सर्वांचा निरोप घेऊन बसस्टँडची वाट पकडली. पाऊलं झपझप पडत होती, आणि त्यांच्यावरील डोक्यावरंच ओझं मात्र हलकं झालं होतं....!

# आरसा

रुपेश पेवेकर

हा काचेचा आरसा
दिसायला नसतो खाससा
काय असते त्याची महती
तरी तो करतो त्याचे काम संयमी...

त्याचे रुप साधेसुदेसे
तरीसुद्धा त्याचे दिवाणे फारसे
तो ज्याच्या समोर असावा
त्याचे रुप त्याला दाखवावा...

तो असतो महिलांची पसंत
जणु तो महिलांचेच वेसण
एकदा का त्याच्या समोर बसले
तासनतास त्याच्या समोर घालवले...

त्याच्या समोर नसतो कोणता भेदभाव
त्याच्या समोर कोणही नसतो उच्चनिच्च
त्याच्या समोर नसते कोणतेही जातपात
त्याच्या समोर असतात सर्वच सारखेच...

# नशा (गझल)

अतुल उमाळे

नशा (गझल:,दुबई)
भान कसे राहिले नाही मैफिलीत आज
नशा काही जास्त झाली किती झिंगलो मी आज!

लाटांमधले प्रतिबिंब माझे संगे किनारयाला
हरवले माझे तुकडे काही विखुरले भावसागरात!

'तिला' विसरण्यासाठी प्यायलो होतो जरी
प्याल्यातच थांबले का ते आठवनथेंब खास!

इथेच पडली भिंत अन उध्वस्त इथे आडोसा
तरीही तेवते वात दिव्याची वादळांच्या कैफात!

भान कसे राहील नाही मैफिलीत आज
'नशा' काही जास्त झाली किती झिंगलो मी आज!

# चुकलंच सालं

आल्हाद महाबळ

आकाशातलं सारं दुःख
जमिनीवर येऊन पडलं

चुकलंच सालं

कात्रीच लागली की सगळयाला
तिच्या हसण्याला
पावसाच्या कानगोष्टींना
लगबगणाऱ्या खारीला
अन् म्हातारीच्या दिडवीत दिठीला

चुकलंच सालं
आभाळभर आकांक्षांना
मेहनतीने मोठं केलं
भाळभर नशीबात मावणार किती?
सगळं सालं सांडूनच गेलं

चुकलंच सालं

कात्रीच लागली की सगळयाला
मधाच्या पोळयाला
अपेक्षेच्या नात्यांना
डोंगरावरच्या देवाला
अन् पायथ्यापासच्या गुरवाला

चुकलंच सालं
चुकलंच सालं वेड्यासारखं प्रेम वाटत बसणं
भुकेला धोंडा मिळतोय तरी अश्रू ढाळत बसणं

एकूण काय?
तिथून इथवर
इथून तिथवर
डोळयांपासून टाचेपर्यंत, भेगाळलेल्या
सगळंच गणित चुकलं की

चुकलंच सालं
तिचे हलते डूल बघत बसलो
ओठ टेकवले नाहीत हे ही चुकलं
आजीच्या पायावर डोकं नाही ठेवलं
हे तर चुकलंच चुकलं

चुकलंच सालं

आजवर चुकलेल्यातलं
थोडकं मोडकं बरोबर शोधताना
तिच्या प्रेमाला पारावार नको
आज्जीच्या मायेला आवर नको

... चला एवढं तरी चुकत नाहीये सालं
एवढं तरी चुकलं नाहीये सालं...

# आयुष्याचे गणित

सौ. प्रियांका पाटणकर

आयुष्याचं मांडलेलं गणित
नेहमीच बरोबर नसतं
बेरीज-वजाबाकीच्या उत्तराला
गुणा-भागायचंच असतं ॥१॥

जीवनी घडलेल्या चुकांना
समजून सावरायचं असतं
प्रेमात पडल्या नंतरही
भावनांना जपायचं असतं ॥२॥

माझ्या नशिबी असंच का ?
मुळीच विचारायचं नसतं
दुसऱ्याला सुखी हो म्हणताना
हसणं हे लपवायचं नसतं ॥३॥

विश्वासाला पात्र ठरणं
अतिशय सोप्पं असतं
तोच जिवंत ठेवणं मात्र
खूप खूप कठीण असतं ॥४॥

परमपित्या परमेश्वराशिवाय
माझं इथे काहीच नसतं
माझं माझं माझंच प्रेम
हेचि अंतिम ध्येय नसतं ॥५॥

त्याग आणि कर्तव्यांतूनी
स्वत:ला घडवायचं असतं
आपलेपणाच्या बंधनाने
मनातच राहायचं असतं ॥६॥

आपण चालत असताना

पाठी कुणा ठेवायचं नसतं
साथ कुणाची नसली तरी
रडायचं तर बिलकुल नसतं ॥७॥

जे आपल्या जवळ नाही
त्याचं हट्टीपण करायचं नसतं
मजजवळी जे काही आहे
तेचि भरपूर मानायचं असतं ॥८॥

मायेच्या अतुट बंधनाने
मनास मनाने जोडायचं असतं
मदतीची हाक कानी येता
तना-मनाने धावायचं असतं ॥९॥

येता शत्रु सामोरी जरी
मन साफ ठेवायचं असतं
सद्वर्तनाची पायरी चढोनी
गणित मात्र सोडवायचंच असतं ॥१०॥

# दिवाळी

प्रमोद दलाल

आली दिवाळी आली दिवाळी
दाही दिशांना होते रोशनाई || धृ ||

सजविता घरे स्वर्गासारखे
दिवे लाविता चांदणे जसे
करीते आई गोड पदार्थ
सर्वत्र असतो गोड सुगंध || १ ||

धनत्रयोदशीला पहिला दिवा
वसुबारसा येण्या घेती धावा
आनंद आणते बहार दिवाळी
लक्ष्मी देवी धनाची ओवाळी || २ ||

लहानग्या मिळता ड्रेस हो नवी
आनंदाला त्यांच्या सिमाच नाही
चोहीकडे असते धडामधुम
दु:ख जाते जणु होवून गूम || ३ ||

दिवाळीत होता फटाक्याची मौज
येण्यास आतुर होते भाऊबीज
गरीब श्रीमंत सर्वांची दिवाळी
हर्ष उल्हासाने करीता साजरी || ४ ||

अशी हो दिवाळी आनंदाची
सर्वांना वाटते हवी हवीशी
आली दिवाळी आली दिवाळी
दाही दिशांना होते रोशनाई || ५ ||

# ए आई...तू बरोबर केलंस

तनवीर सिद्दीकी

काही नाही गं...ए आई....तू बरोबर केलंस मला मारून..

मीच पापी ग या जन्मा येवून पण तुझे अभ्र हुकले असते

कसं होणार?..पुढे काय?..खूप प्रश्न सोबत झाले असते

हे अभागी पुण्यव्रण आजन्म तुझ्या ललाटी आले असते

पाळण्यात दिसती पाय माझे दिशा तेव्हाच ठरली असती

मी रडताना पाहणाऱ्या खूळखुळ्याचे मात्र कौतुक झाले असते

काही नाही गं...ए आई....तू बरोबर केलंस मला मारून..

मीच पापी ग या जन्मा येवून पण तुझे अभ्र हुकले असते

मी मुलगा असतो तर नवसाचे पेढे तुझे वाटूनही उरले असते

कर्ज माझ्या जन्म - बत्तास्यांचे मीच आमरण भरले असते

माझ्याच चटणीत पाणी का? हे 'निरपेक्ष' नियम मूक राहतीलही

हात पिवळे होताना मात्र माझ्या तू भाकरयांचे हिशेब धरले असते

काही नाही गं...ए आई....तू बरोबर केलंस मला मारून..

मीच पापी ग या जन्मा येवून पण तुझे अभ्र हुकले असते

'पोट्टा शाळेत मुतून आला' डोईपारणे आयुष्यभर फेडले असते

या क्षुद्राने अश्रू पुसत धुणी-खरकट, पाणी रहाटीवर ओढले असते

मुलगा-मुलगा एवढंच पुरे बाकी आभाळ कर्तुत्वाची तमा करेल

ही 'झाशीची राणी' कोणाची ग? का ताळे तोंडाला पडले असते ?

काही नाही गं...ए आई....तू बरोबर केलंस मला मारून..

मीच पापी ग या जन्मा येवून पण तुझे अभ्र हुकले असते

एकच खुपतंय जरासच चुकतंय सांगण्याची मुभा मागते

सर्व पिल्लास फक्त प्रेम हव ग तरच केलेल्याची जाग जागते

**'मुलगा' चा 'आ' आणि 'मुलगी' चा 'ई' 'आई' चाच फरक आहे ग**

सोप्पी तशी निसर्गाची परीक्षा तू मात्र एकालाच मुल मानते

काही नाही गं...ए आई....तू बरोबर केलंस मला मारून..

मीच पापी ग या जन्मा येवून पण तुझे अभ्र हुकले असते..

पण काही नाही गं..

ए आई..... रडू नकोस हा.....होईल तुला मुलगा होईल...

.

.

.

मी जातेय ना देवाकडे... मी सांगते हा..

# ✵ कुणीतरी आहे तो

पूनम पिंगळे

कुणीतरी आहे तो
कुणीतरी आहे तो
जो शब्दाविनाही माझे मन जाणणार
जगातले सर्व सुख माझ्या पदरात टाकणार

कुणीतरी आहे तो
जो कातरवेळी माझ्या मनास हळूच स्पर्शून जाईल
अन ओळख विचारताच नुसताच हसून देईल

कुणीतरी आहे तो
जो स्वप्नांपालीकडील विश्व मला दाखवेल
आणी त्याच्या विश्वात रमताना मला स्वताचाही विसर पडेल

कुणीतरी आहे तो
ज्याच्याशिवाय सारे काही शून्य असेल
ज्याच्या सोबत सारे विश्वच स्वर्ग भासेल

कुणीतरी आहे तो
ज्याचा असेल मला ध्यास
ज्याचासाठी जगण्याचा असेल माझा हव्यास

कुणीतरी आहे तो
ज्याच्या प्रेमात मी अशी एकरूप होणार
जसे नदीचे पाणी सागरात विर्घलणार

कुणीतरी आहे तो
जो माझ्या पासून दुरावणार तर नाही ना
माझ्या आनंदी विश्व ला संपवणार तर नाही ना

असाच कुणीतरी आहे तो
ज्याची मी आतुरतेने वाट बघते
माझ्या मनास का हि वेडी आशा छळते ?

कुणीतरी आहे तो

# एकटी

पूनम पिंगळे

मी अशी एकटी ना साथी ना सारथी ,

मी म्हणजे क गुलाब ,जग रूपी काटेरी झुडुपात वाढणारे .

भीती वाटते मला माझ्या सद्गुणांचा सुवास दरवळण्याची,

झाडाच्या देठा पासून तुटून पडण्याची .

भीती वाटते  मला थोड्याश्या दूरगुणांमुळे  कोमेजून जाण्याची

जागाव म्हटले तर जगातही येत नाही ,

मारावे म्हटले तर मरणही येत नाही ,

सर्वांसोबत असूनही मी मात्र एकटीच .

# एक कळी

पूनम पिंगळे

एक लहानशी कळी उमलली ,हळूहळू बहरू लागली.

हसली ती गालात ,मावत नव्हता आनंद तिचा गगनात.

मनमोहक सुगंधाने मंत्रमुग्ध केले तिने सर्वांना.

आकर्षित झाले लोक ,तोडून वाहिले देवाला.

हिरमुसली ती ,क्षणात तिचा अंत झाला .

जाता जाता ती म्हणाली,

जगायचं होत ,हसायचं होत ,अजून बहरायचं होत मला .

का? या मनुष्याच्या जगात माझ्या सौंदर्यानेच माझा घात केला.

# मुल्यशिक्षण

शुभांगी विठ्ठल गोरे

इथे माणुसच माणसाला खातो
इथे माणुसच माणसाला पुरतो
इथे माणुसच माणसाला जाळतो
इथे माणुसच माणसाला पाळतो

माणसाचं अस्तित्व
काही वर्षांपुरत असत
पण येणारया प्रत्येक क्षणाकडे
त्याच काहीतरी मागण असत

प्रत्येक गोष्ट,
प्रत्येक वस्तू
माझीच आहे
असंच प्रत्येकाचं म्हणणं असत

आपणच माणुसकीचे नियम करायचे
अन आपणच ते टाळायचे
कारण दुसऱ्यांनी केलेली ती अक्ष्यम्य चूक असते
तर आपण केलेली छोटीशी भुलचूक असते

समाज सुधारला समाज सुधारला
सारेजण गात सुटतात
स्त्री-पुरुष समानतेचे धडे
शाळांमध्येच शिकवले जातात

पण व्यवहारात त्याचा उपयोग नसतो
ही माझी आई, ही माझी बायको
म्हणून सारे जग पोवाडे गातात
पण त्याचं काम झाल्यावर
कोनाड्यात फेकून देतात

इथे रक्षकच भक्षक होतो
वर्दीतला पोलीस, जीवनदान देणारा डॉक्टर
ज्ञान देणारा शिक्षक आणि
ज्याने जन्म दिला तो बापही
स्वतःच्याच मुलीवर बलात्कार करतो

मग नकळतच मनात प्रश्न उभा राहतो
माणूस, माणूस म्हणजे तरी काय असतो?
जो अन्याय करतो तो माणूस, कि
जो अन्याय सहन करतो तो माणूस?

माणुसकीच युग आता संपल आहे
सैतानयुग  चालू झाल आहे
भ्रष्टाचाराने बोकाळलेल्या या समाजाला
पुन्हा एकदा समाजसुधारकाची गरज आहे

जिकडे-तिंकडे झेंडे दिसतात
निवडणुकीचे नगारे वाजतात
राजकारणी मंडळी घरोघरी भिका मागतात
निवडून आल्यावर मात्र सारकाही विसरतात
पैश्याच्या या तालावर जनतेला देखील नाचवतात

बॉम्बस्पोटाच प्रकरण काही नवं नाही

त्यातूनही मार्ग काढण्याचा प्रयत्न केला
हेही काही खोट नाही
पण किती दिवस असचं कऱ्हायचं
भितीच्या वातावरणात कुढत बसायचं
का दिवस आपण असेच जाणार
म्हणून त्याकडे दुर्लक्ष करायचं?
कुठेना कुठे हे सार थांबलच पाहिजे
मुक्तपणे आयुष्य जगायला शिकलंच पाहिजे

म्हणूनच मित्रहो झाल ते खूप झाल
आता तरी थांबवा सार
माणसाने माणसाशी माणुसकीने वागलं पाहिजे
मुल्यशिक्षणच महत्व आता
मोठ्यानाच शिकवलं पाहिजे

# सोनेरी क्षण !!
# तुझे आलिंगन !!!

अतुल उमाळे

अशा मिळाव्यात
आपल्या नजरा क्षणभर
लाजरे अलगुज
न सांगता कळावे मनभर

असा असावा
तुझा  ओझरता मखमली स्पर्श
कि उमजावे सर्व
शब्दांच्याही  पलीकडले अर्थ

तुझ्यासाठीच...
धरणीवर झुकलेल इंद्रधनुष्य
न्याहाळतो ...
नाजूक तुझे निर्मळ लावण्य

मखमली रात्रीत
तू एक रुपेरी चांदणी
अन तुझे असणे
म्हणजे मंतरलेले क्षण सोनेरी

का असावी
वेडी खूळ चिंता उद्याची
आहे या क्षणात जर
शाश्वती तुझ्या अलिंगनाची

# डोक्यात जाणाऱ्या चारोळया (Read @ your own risk)

प्रथमेश सुरेश शिरसाट

आयुष्य इतकं सोपं नसतं
सहज सांगून पटत नसतं
नवव्या पेग नंतर दहावा
रिजवा माझं आता पटतं

तुझ्या आयुष्यात मी
येऊन खरंच चुक केली
No entry च्या जागेवर
नेमकी आज गाडी लावली

खूप काही असतात ते शब्द
जरी असले फ़क्त तीन
मारी बिस्कीट खाल्ल्याने भुक होते
टिन टिन टिटिण .......

माझ्या हृदयात शिरून
सांग तुला काय मिळालं?
क्लोरेस्टरोल वाढल्याने
बायपास ओपरेशन झालं

तीन पत्ती लागली
की पर्वा कसलीच नसते
अगं, ऐक ना पैसे संपले
जरा दहा रुपये उधार देते

सकाळ जाहली सुर्य उगवला
आतातरी उठ ना रे साजणा
रात्रभर धिंगाणा केलास ना !
चल गुपचुप उचल तो चकणा

एकदा माझी बायको
चक्क मला म्हणाली सायको
नाही झेपत तर माझ्यासोबत
लग्नच केलं हीने कायको.....?

कोलेजात असतानाचे गुलाबी
दिवस आजही आठवतात ना
गालावरून माझ्या हात फ़िरवला
की सेण्डलचे नंबर जाणवतात

उजवीकडे वळता येत नव्हते
डाविकडे वळता येत नव्हते
जाम मारले तिच्या दादाने
कोण आहे मी मलाच कळत नव्हते

तुझ्याबरोबर संसार करून
मी खरंच खूप खुश आहे
मस्करी नाही करत ग मी आज
World Lieing Day आहे

तुझ्या हातचे जेवण खाण्यासाठी
मी रोजच तयार असतो
काय करणार महिन्याचा किराणा
कसातरी संपवायचा असतो

स्वप्नांत तू येतोस आणि हळूच
का रे निघून जातोस
'पेपरवाला' आरोळी देऊन
पुन्हा निवांत झोपी जातोस

# शब्द

जान्हवी सारंग

जेव्हा कुऱ्हाडीने घाव घातले गेले
तेव्हा भराभरा शब्द बाहेर येत राहिले
शब्दांनी जखमांवर केली मलमपट्टी
शब्द भिजत राहिले ,कोरडे झाले,पुन्हा भिजले.
आताही शब्द उभे राहिले आहेत
हल्ला परतविण्यासाठी कि तो सहन करण्यासाठी
माहित नाही
पण मी सुरक्षित आहे.

# शस्त्र

जान्हवी सारंग

आज ती उभी आहे
त्याच्या खांद्याला लावून खांदा
अनेक गोष्टी झेपवते
अंगवळणी पडल्यासारख्या.
तिच्या ह्या लीलांना जेव्हा
तो आक्रमण समजतो,
तेव्हा उपसली जातात शस्त्रे
ते नाही जमल कि मग
जमिनीवरही ठेवली जातात निमुटपणे.
पण शस्त्र बाळगणे अजूनही  अभिमानास्पदच.

# चारोळ्या

## सुनिल खांडेकर

पिंडाला कावळा शिवावा म्हणून
आपण आकांताने काव काव करतो
स्वतःची सुटका करून घेण्यासाठी
कावे बाज पणे वागतो

तुज्या भिजलेल्या देहाकडे मी
वेड्यासारखा पाहत होतो
ओघळणारा पाण्याचा थेंब ओठांनी
टिपण्याचा मोह मी स्वप्नात पाहत होतो

आज पुन्हा ठरवले
तुला नाही आठवायचे
इतरांना नाही जमले तरी
स्वतःला तरी फसवायचे

## प्रथमेश सुरेश शिरसाट

कोडेच सुटत नाही
अद्याप माझ्या आयुष्याचे
नुसतेच वक्राकार आहेत
पैलू माझ्या अंतरीचे

स्वत:च्या मनासारखे त्याला
तिने हवे तसे नाचवले
खोटेच हसू आणून ओठी
त्याच्या भावनांना चिरडले

मला कधी कविता
लिहिताच नाही आल्या
दडलेल्या भावना चुकूनपण
कागदावर नाही उमटल्या

## शुभांगी गोरे

मलाही तुला कधीतरी
शब्दात मांडायचं आहे,
आणि तुझ्याच नकळत
तुझ्यावर खूप प्रेम करायचं आहे

मलाही उंच उंच उडायचंय
नभातून खाली बरसायचंय
अव्यक्त अश्या प्रेमाला
मला मुक्त करायचंय

काळ बदलत जातो
नाती बदलत राहतात,
आयुष्याच्या सारीपटावर
आठवणीच साथ देतात

तुझी प्रत्येक आठवण
माझी कविता आहे
तु नाहीस सोबत
म्हणून ती ही पोरकी आहे

# पुन्हा नियतीने तिथेच आणले

प्रथमेश सुरेश शिरसाट

मैत्रीचे दिवस थोडेसेच होते
मैत्री टिकवायचे सोनेरी स्वप्न
मित्रांनीच पायदळी तुडवले
पुन्हा नियतीने तिथेच आणले

दोन दिवसांचे प्रेम मिळाले मला
दोन क्षणांचा स्पर्शही अनुभवला
अन दोन क्षणांत प्रेमच संपले
पुन्हा नियतीने तिथेच आणले

सप्तपदी घेणारी सोबत
दुसऱ्या साठी अर्ध्यावर परतली
एकटेच मन शिल्लक राहिले
पुन्हा नियतीने तिथेच आणले

मद्यधुंद झालो बेफ़ाम
सिगारेटचे पाकिट संपले
रम्मीने सारे लुबाडून नेले
पुन्हा नियतीने तिथेच आणले

क्षणभंगूर होते प्रत्येक सुख माझे
आसवे पुसणारे नामधारी होते
प्रत्येक फासे खेळाचे उलटेच पडले
पुन्हा नियतीने तिथेच आणले

एकट्याच्या प्रवासात परतलो नाही
चौघांचा खांदाही उसना मिळाला
जाळताना मला ओले लाकूड रडले
पुन्हा नियतीने तिथेच आणले

# ❋ उकडीचे मोदक

✍ सारिका भंडारे

साहित्य : तीन वाटी गर पाणी, दोन वाट्या तांदळाचे पीठ, चिमुटभर मीठ थोडे तेल, दोन वाट्या किसलेले ओले खोबरे, दोन वाट्या बारीक केलेला गुळ, वेलची पावडर, केळयाचे पान.

कृती:

पुरण/ सारण : दोन वाटी किसलेले ओले खोबरे व दोन वाटी बारीक केलेला गुळ एका पातेल्यात घेऊन मंद आचेवर गरम करण्यासाठी ठेवावा. गुळ वितळू लागल्यावर सतत त्याला चमच्याने हलवत रहावे पुरण आटंत आल्यावर त्यावर वेलची पूड टाकावी आणि हे मिश्रण बाजूला ठेवावे.

मोदकाचे पीठ : एका पातेल्यात तीन वाट्या गरम पाणी घेऊन त्यात मीठ घालावे व त्यावर दोन वाटी तांदळाचे पीठ पसरावे, एका चमच्याने हलवून मंद आचेवर हे मिश्रण २-३ मिनिटांसाठी ठेवावे. नंतर गॅस बंद करून एका वाट्ने तयार पीठातील गुठळया मोडाव्यात व गरमच पीठ मळावे. पीठ चांगले मळल्यावर त्याच्या छोटे छोटे गोळे करून, हाताला थोडे तेल लावून, मग एक-एक गोळा हातावर घेऊन त्याची वाटी बनवावी, त्यात पुरण भरून पीठाच्या गोळयाच्या पाळया/ पाकळया काढाव्यात. मोदकाचा आकार देऊन त्याचे वरील तोंड व्यवस्थित बंद करावे. मग तयार झालेले मोदक शिजवण्यासाठी एका पातेल्यात पाणी घेऊन ते गॅसवर उकळण्यास ठेवावे. त्यावर चाळणी ठेवून केळीचे पान पसरावे, त्या केळीच्या पानावर तयार मोदक ठेवून वरून झाकण बंद करावे. जेव्हा मोदक हाताने हलके दाबल्यावर चिकटणार नाहीत तेव्हा समजावे की मोदक व्यवस्थित शिजले आहेत. तयार उकडीचे मोदक गॅसवरून उतरवून खाण्यासाठी सर्व्ह करावेत.

# ❋ बटाट्याचे सॉंग

✍ श्रीमती. स्नेहल सुरेश शिरसाट

साहित्य : २ मध्यम आकाराचे उकडलेले बटाटे मध्यम चिरलेले, ४ मध्यम आकारचे कांदे बारिक चिरलेले, ४ सुक्या मिरच्या (बेडगी मिरच्या), चिमुटभर मीठ, १ मोठा चमचा तेल, सुपारीएवढी चिंच

कृती : तेलात बेडगी मिरच्या भाजून घेणे. तळलेल्या मिरच्या, मीठ, चिंच एकत्र मिक्सरमधून बारिक वाटून घेणे.

एका भांड्यात चिरलेले बटाटे, चिरलेला कांदा आणि वाटलेला मसाला घालून एकजीव करून घेणे. बटाट्याचे सॉंग खाण्यास तयार आहे.

# ❋ साबुदाणा वडा

✍ सारिका भंडारे

साहित्य : पाव किलो साबुदाणे, एक वाटी भाजलेले शेंगदाणे, २ मध्यम आकाराचे उकडलेले बटाटे, ७-८ वाटलेल्या हिरव्या मिरच्या, चवीपुरते मीठ व चटणीसाठी ओले खोबरे.

कृती : रात्री पाव किलो साबुदाणे धुवुन त्यात थोडेसे पाणी घालून रात्रभर ठेवावे. सकाळी उठल्यावर थोडे दाबून पहा बऱ्यापैकी मऊ झालेले असतील. एका पातेल्यात उकडलेले बटाटे वाटीने दाबून बारिक करावेत, त्यात बारिक वाटलेली मिरची घालून मिश्रण एकत्रित करावे, मग त्यावर भाजलेल्या शेंगदाण्याचे तुकडे आणि साबूदाणे घालून मिश्रण एकत्र करावे.

गॅसवर कढईत तेल ठेवून तेल चांगले गरम करायला ठेवून. साबुदाण्याचे मिश्रण हातात घेऊन त्याचे वडे बनवावेत. हाताला तेल लावावे त्यामुळे साबुदाणे हाताला चिकटंत नाही. मग वडे तेलात मध्यम आचेवर गुलाबी होईपर्यंत तळून घ्यावेत.

<u>चटणी</u>: ओले खोबरे, मिरची व मीठ यांचे मिश्रण मिक्सरवर बारिक वाटून चटनी तयार करावी.

तयार झालेले साबुदाणे वडे गरमगरमच चटणीसोबत खाण्यासाठी सर्व्ह करावेत! थंड झाले के ती चिवट होतात!

# ❋ गोयकार पाककृती: मडगणं (चण्याच्या डाळीची खीर)

✍ श्रीमती. स्नेहल सुरेश शिरसाट

साहित्य : एक वाटी चण्याची डाळ, एक मोठा चमचा तांदळाची पिठी, एक वाटी नारळाचा रस, पाव चमचा वेलची पूड, १०० ग्रॅम गूळ, एक वाटी तांदळाचं पीठ.

कृती : चण्याची डाळ शिजवून घेणे, त्यात तांदळाचे पीठ घालून हे मिश्रण नारळाच्या दुधात मिक्स करणे. नंतर त्यात गूळ घालून वेलची पूड घालणे. तांदळाचे पीठ घातल्याने खीर दाट होते.

# करंजी

सारिका भंडारे

साहित्य: पाव किलो रवा, पाव किलो किसलेले सुके खोबरे, पाव किलो दळलेली साखर, १ वाट अरारोट पीठ, मनूके, बेदाणे, १ किलो मैदा, वेलची पूड, डालडा तूप (बेताने)

कृती :

सारण :किसलेले सुके खोबरे तव्यावर थोडे भाजून घ्या. दुसऱ्या एका पातेल्यात तूप घालून रवा हलका भाजून घ्यावा. दोन्ही मिश्रण एकत्र करून त्यात मनुका, बेदाणे घालावेत हे मिश्रण थंड झाल्यावरच त्यात दळलेली साखर घालावी (नाहीतर सारणाच्या गुठळया होतील) वर वेलची पूड घालून मिश्रण चांगले एकत्रित करावे.

करंजी : एक किलो मैदा पुरेसे पाणी घेऊन चांगला मळावे व पीठ तयार झाले की त्याच्या मोठ्या चार चोळया लाटून बाजूला ठेवावी. अरारोटचे पीठ घेऊन त्यात डालडा घालावा मिश्रण एकत्रित करून पेस्ट तयार करावी ती पेस्ट चार पोळयांना एका बाजूने लावून पोळी एकावर एक ठेवून त्याचा रोल तयार करावा व बाजुने चाकूने कापून त्या वडी तिरप्या दिशेने हाताने दाबाव्यात व तशीच वडी लाटून त्यात सारण भरावे. असे केल्याने करंजीवर एकावर एक घडीची डिसाईन येते व करंज्या कुरकुरीत होतात. सारण भरून करंजीच्या साच्याने करंज्या कराव्यात व तेल कढईत ठेवून तेल चांगले गरम झाल्यावर तळून घ्याव्यात ( गुलाबी रंग होईपर्यंत ). चविष्ट व कुरकुरीत गरम करंज्या खाण्यास तयार.

# गोयकार पाककृती: कच्च्या केळयांची किसमूर (कोशिंबीर)

प्रथमेश सुरेश शिरसाट

साहित्य : तीन उकडून साली काढलेली कच्ची केळी, २ बारीक चिरलेले कांदे, २ चमचे चिंचेचा कोळ, चवीपुरतं मीठ, अर्धी वाटी ओला खवलेला नारळ, चवीपुरते मीठ, अर्धा चमचा लालतिखट आणि हळद.

कृती : एका पातेल्यात तीन उकडून कुस्करलेली कच्ची केळी, २ बारीक चिरलेले कांदे, २ चमचे चिंचेचा कोळ, चवीपुरतं मीठ, चवीपुरते मीठ, अर्धा चमचा लालतिखट आणि हळद इत्यादी मिश्रण एकजीव करून घेणे. तयार किस्मूरीवर खवलेला नारळ घालून खाण्यासाठी सर्व्ह करावे. ही किसमूर पोळी सोबत खाण्यास छान लागते.

# चकली

सारिका भंडारे

साहित्य : १ किलो तांदूळ, पाव किलो चणाडाळ, पाव किलो तुरडाळ, पाव किलो उडीद डाळ, ओवा, जिरं, काळी मिरी, मिठ, तेल, बडीशेप, चकलीचा मसाला, थोडा तिखट मसाला व तीळ.

कृती : तांदूळ व डाळी धुवून सुकत घालाव्यात. सुकल्यावर त्या हलके वेगवेगळया भाजून घ्यावात. मग ते मिश्रण एकत्र एकत्र करून त्यात थोडी काळी मिरी, जिरं, ओवा, बडीशेप व तीळ घालून दळून आणावे.

एका पातेल्यात जेवढे पीठ असेल तेवढेच, पाणी घेऊन. पाणी गरम करावे, त्यात थोडे तेल, मीठ, ओवा, चकलीचा मसाला, तिखट मसाला व तीळ घालून हलवावे. पाणी चांगले गरम झाले की त्यावर पीठ पसरवावे व चांगले हलवून एकत्रित करावे. नंतर गरमच पीठ मळून चकलीच्या साच्याने चकल्या तयार करून त्या मंद आचेवर तळयाव्यात. खुसखुशीत चकल्या खाण्यासाठी तयार !

# गोयकार पाककृती: सुजी (गुळवणी)

श्रीमती. स्नेहल सुरेश शिरसाट

साहित्य : एक वाटी लापशी गव्हाचा रवा किंवा खांडवा गव्हाचा रवा, १ छोटा चमचा तूप, अर्धी वाटी शिजवलेली मुगाची डाळ, १ वाटी खवलेल्या खोबऱ्याचे दूध/ नारळाचे दूध, १०० ग्रॅम गूळ, पाव चमचा वेलची पूड, एक वाटी तांदळाचे पीठ, थोडे बेदाणे किंवा काजू.

कृती : लापशी गव्हाचा रवा किंवा खांडवा गव्हाचा रवा तुपात भाजणे, त्यात शिजवलेली मूगाची डाळ घालणे. नंतर ओल्या नारळाचे दूध व गुळ घालून घोटणे, त्यात थोडे तांदळाचे पीठ घालून ते मिश्रण पुन्हा घोटावे. उकळी आल्यावर गॅस बंद करून तयार मिश्रणात वेलची पूड घालून गुळवणी थंड होऊ द्यावी.

# तांदळाची उकड

पूजा गद्रे

साहित्य : तांदुळाचे पीठ, आंबट ताक, तेल, कांदा, कोथिंबीर, कडीपत्ता, खोबरे, मीठ, तिखट

कृती : एक वाटी तांदळाचे पीठ, एक वाटी पाणी, थोडेसे आंबट ताक असे एकत्र करावे. या मिश्रणात, हळद, हिंग, तिखट, मीठ घालून ते नीट एकजीव करावे. नंतर कधाईला तेल लावून त्यात कडीपत्ता व कांद्याची फोडणी करावी, कडीपत्ता व कांदा लालसर परतून घ्यावा. नंतर तयार केलेले तांदुळाचे मिश्रण त्यात घालावे. त्याला चांगली वाफ येईपर्यंत ते ढवळावे व झाकून ठेवावे. नंतर त्यावर सजावटीसाठी कोथिंबीर घालावी.

# गुलाबी चिरोटे

पूजा गद्रे

साहित्य : २ वाट्या मैदा, पाव चमचा मीठ, पाव वाटी पातळ डालडा, पाव वाटी दूध, गुलाबी रंग.

साठा : पाव वाटी डालडा, २ टेबलस्पून कोर्नफ्लोर.

कृती :

<u>साठ्यासाठी</u> : पाव वाटी डालडा व २ टेबलस्पून कोर्नफ्लोर एकत्र करून चांगले फेटावे व ते चांगले फेटले गेले की त्याचे गोळे तयार होतात. एका भांड्यात पाणी घेऊन हे गोळे त्यात सोडावे. तयार गोळे पाण्यावर तरंगतात.

<u>पारीसाठी</u> : मैदा, मीठ, पातळ डालडा एकत्र करून, पीठ भिजवावे. तासाभराने पीठ पात्यावर चांगले कुटून घ्यावे. पिठाचा ६ भाग करून, २ भागाला गुलाबी रंग व दुधाचा हात लावून कुटावे. यामुळे रंग सारखा येतो. नंतर परत दोन भाग करून घ्यावेत. नंतर पिठाच्या ४ पांढऱ्या, २ गुलाबी पोळया लाटून घ्याव्यात. पोळपाटावर गुलाबी पोळी ठेवून त्यावर साठा व्यवस्थित लावावा. व पोळीची गुंडाळी करून घ्यावी. नंतर पांढर्या पोळीलाही असेच करावे. नंतर गुलाबी पोळी ह्या पोळीवर ठेवावी व गुंडाळावी. परत पांढर्या पोळीला साठा लावून वरील गुंडाळलेल्या ह्यावर ठेऊन गुंडाळी करावी. यानंतर सुरीने १ इंचाचे तुकडे करावेत. थोडी पिठी लावून कापलेला भाग वर घेऊन हलक्या हाताने लाटावे, असे सर्व चिरोटे तयार करून ओल्या कपड्याने झाकून ठेवावेत. काढैमध्ये तूप घेऊन तापवून चिरोटे त्यात सोडावे. व झाऱ्याने चीरोट्यांवर तूप उडवत राहावे, म्हणजे पदर सुटतील, मग चिरोटा उलटून दाबावा. हलक्या हाताने काढून ताटात ठेवावा व तो गरम असतानाच त्यावर पिठी साखर मध्यभागी पेरावी.

# ❋ अनारसे

✍ पूजा गद्रे

साहित्य : जुने तांदूळ, गूळ, तूप, खसखस आणि सायीचे दही

कृती : तांदूळ तीन दिवस भिजत घालावेत. नंतर ते उपसून ठेवावेत व कपड्यावर वाळत घालावेत. साधारण कोरडे झाले कि पाट्यावर वाटावेत किंवा मिक्सर वर बारीक करून घ्यावेत. नंतर मैद्याच्या चाळणीने चाळून घ्यावेत.

जेवडे तांदूळ भिजवण्यासाठी घेतले होते तेवढ्याच वजनाचा गुळ किसून घ्यावा व पिठात मिक्स करावा. १ वाटी पिठाला २ वाटी तूप या प्रमाणात तूप घालावे. सर्व पीठ कालवून, मोठे मोठे गोळे तयार करावेत. स्टीलच्या डब्यात ठेवावेत. ३-४ दिवसात अनारस्याचे पीठ तयार होते.

अनारसे करावच्या वेळी ताटात थोडे पीठ काढून घ्यावे. त्यात अर्धा चमचा सायीचे दही घालून पीठ मळावे. नंतर पिठाची पेढ्याएवढी गोळी घेऊन ती खसखाशीवर थापावी. खसखशीची बाजू वरती येईल अशा तऱ्हेने अनारसा जरा जास्त तुपामध्ये सोडावा. व त्यावर झार्याने तूप उडवत राहावे. म्हणजे छान जाळी पडते. अनारसा कधीही उलटून तळू नये. जाळी पडली कि अनारसा अलगद काढून पितळेच्या चाळणीवर ठेवावा. म्हणजे जास्तीचे तूप निथळून जाईल. निवाल्याशिवाय अनारसा कडक होत नाही, अनासारास फार जाड थापू नये.

# ❋ गोयकार पाककृती: कालइले फोव्ह (कालवलेले पोहे)

✍ श्रीमती. स्नेहल सुरेश शिरसाट

साहित्य : १ वाटी पातळ पोहे, अर्धी वाटी खवलेला नारळ, प्रत्येकी एक छोटा चमचा पिवळे धणे आणि जिरे, १०० ग्रॅम गूळ, चवीपुरते मीठ, २ बेडगी मिरच्या, ५-६ कडीपत्त्याची पाने, २ लहान कांदे बारिक चिरलेले, १ मोठा चमचा तेल, बारिक तिखट शेव.

कृती : २ बॅडगी मिरची तेलात भाजून घेणे, तेलात भाजल्यावर मिरच्या भाजून वर येतील. मिक्सरवर भांड्यात ओल्या नारळाचा चव (खवलेला नारळ), पिवळे धणे, जीरे, मीठ, गूळ घालणे, तेला तळलेल्या बॅडगी मिरच्या इत्यादी मिश्रण वाटून घेणे. एका पातेल्यात पातळ पोहे आणि बारिक चिरलेले कांदे घेणे, त्यात तयार मिश्रण (मसाला) घालणे व एकत्रित एकजीव करून घेणे. एका पातेल्यात तेल घेणे, त्यात कडीपत्त्याची पाने घालणे आणि तयारी मिश्रण त्या तेलात परतून घ्यावे. तयार पोह्यांवर बारिक तिखट शेव घालून खाण्यासाठी सर्व्ह करावे.

# भरली वांगी (२ व्यक्तिंसाठी)

सुष्मा कदम

वांगी - ४ (मध्यम आकाराची)

तेल - २ मोठे चमचे

कांदे - २ मोठ्या आकाराचे

शेंगदाण्याचे कूट - २ मोठे चमचे


लाल तिखट, हळद, मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर - चवीनुसार


कृती:-





प्रथम वांगी स्वच्छ धुऊन त्याच्या देठाचे टोक कापून घ्यावे व वांग्याला बाजूने असलेली देठे सोलून घ्यावीत. नंतर वांग्याला मध्ये २ हलक्या चिरा द्याव्यात जेणेकरून त्यात मिश्रण भरता येईल. हि चिरा दिलेली वांगी पाण्यात ठेवावीत म्हणजे ती काळी पडणार नाहीत. आता एका ताटात कांदे बारीक चिरून घ्यावेत व त्यात शेंगदाण्याचे कूट, हळद, मीठ व लाल तिखट चवीनुसार घालून व्यवस्थित एकत्र करून घ्यावे. आता हे तयार केलेले मिश्रण वांग्यात भरावे. उरलेले मिश्रण तसेच ताटात ठेवावे. नंतर कढईत तेल गरम करून त्यात हि भरलेली वांगी सोडावी व उरलेले मिश्रणही बाजूने घालावे आणि मंद आचेवर वांगी १५-२० मिनिटे शिजवून घ्यावीत. वांगी नरम पडली आणि बाजूने शेंगदाण्याचे तेल सुटले कि ग्यास बंद करावा आणि बारीक चिरलेली कोथिंबीर पसरावी.भरली वांगी खाण्यास तयार.


(तुम्ही हेच मिश्रण वापरून **भरली कारली** तसेच **भरली भेंडी** सुद्धा करू शकता)



नेहमी टाळाटाळ
करणाऱ्यांना
भजनात 'टाळ'
वाजवायला देऊ
नये !
प्र. कु. शिरसाट



लग्नात दोन
गोष्टी खणखणीत
वाजल्या पाहिजे
नाणे
आणि
उखाणे !



खिशात 'कंगवा'
नसेल तर
उगीचच
'कांगावा'
करू नये !



सुखांतिका आणि
शोकांतिका
अनुभवताना
मानवी मनाची मात्र
चांगलीच 'एकांकिका'
होते...
प्र. कु. शिरसाट



शब्द मोजून
वापरा म्हणजे
नंतर आयुष्यातली
'गणितं'
चुकत नाहीत!
प्र. सु. शिरसाट


सुखी संसाराची
फक्त पुरूषांसाठी
गुरुकिल्ली म्हणजे
'मौन पाळणे'...
प्र. सु. शिरसाट..




सौजन्य : प्रथमेश सुरेश शिरसाट









सौजन्य : प्रथमेश सुरेश शिरसाट










सौजन्य : किशोर कदम









सौजन्य : लोकेश बाळकृष्ण पाताडे
















































सौजन्य : सुरूचि राऊळ

पुन्हा भेट
पुढल्या वर्षी
तोपर्यंत
लोभ असावा...

